
मराठी अर्थशास्त्र परिषद

रुपया

# अर्थसंवाद



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

एप्रिल-जून २०१५ / खंड ३९ अंक १

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

**अविनाश रामलाल निकम**

**सहाध्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१२-१५)

तेजस्विनी मुडेकर

अरूण पिसे

राजेंद्र गव्हाळे

विजय भोपाळे

**संपादकीय पत्रव्यवहार**

**डॉ.अविनाश निकम**

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा

संपादकीय संवाद: ग्रीसवर ओढवलेलं अर्थसंकट............००१

साधना पाटील, नाशिक

शेतीआधारित उद्योगातील रोजगार व मूल्यवृध्दीचा अभ्यास.००३

रामचंद्र रसाळ, प्रवरानगर, सतीष गोंडे, प्रवरानगर

खासदार आदर्श ग्रामविकास योजना........................००९

ज्योती साठे, पुणे

ग्रामीण विकासात स्त्री कृषि श्रमिकांची भूमिका.............०१४

मंजुश्री बोबडे, पुणे

भारताच्या ग्रामीण विकासातील शेतीक्षेत्राची वाटचाल......०१९

दिलीप पाटील, देऊर, मोहन सदामते, कुंडल

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे योगदान........०२४

शिवाजी यादव, औरंगाबाद

नवीन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम....०३०

नीता वाणी, ऐनपूर

सामुदायिक विकास योजनेची भूमिका......................०३६

रामदास भांडवलकर, यवतमाळ

महाराष्ट्रातील आंतर-प्रादेशिक विषमता.......................०४४

दीपक भुसारे, पैठण

महाराष्ट्रातील ग्रामीण पायाभूत सुविधा.......................०५३

नामदेव बोरसे, जळगाव, श्रीराम जोशी, जळगाव

संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाचे योगदान.......०६१

मंगला धोरण, अमरावती

बँकींग क्षेत्र आणि ग्रामीण विकास...........................०६६

देविदास गवळी,किल्लेधारूर, शिवाजी अंभोरे,शिवाजीनगर

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकास योजना.................०७१

सिमा चव्हाण, श्रीरामपूर

ग्रामीण विकासात पायाभूत सुविधांची भूमिका.............०७९

भालचंद्र खुरद, राहुरी, संदिप अभंग, खंडाळा

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाची भूमिका..................०८५

मदन शिंदे, पाटोदा

ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन योजना.............०९१

मनिषा चौधरी, शिरपूर: ग्रामविकास........................०९७

मंजुषा मुसमाडे, पुणे : ग्रंथ परीक्षण.........................१०३

देवेंद्र रंगाचार्य, अमरावती : पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश... १०७

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ २०१४-१५**

**अध्यक्ष**

सुहास धोंडिबा आव्हाड (संगमनेर)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

मुक्ता जहागिरदार (अमरावती)

अर्जुन महाडिक (कोल्हापूर)

विनायक भिसे (औरंगाबाद)

**सदस्य**

राहुल म्होपरे (कोल्हापूर)

संजय तुपे (नाशिक)

बालाजी सुरवसे (फोंडा)

अशोक खाचणे (जळगाव)

राजेंद्र शिंदे (धुळे)

महादेव पाटील (मिरज)

हनुमंत नन्नवरे (अकलुज)

सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)

संजय धनवटे (कारंजा)

पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)

तुकाराम मुंडे (मानवत)

दिलीप पाटील (नंदुरबार)

आर. के. दातीर (नाशिक)

रामभाऊ खाडे (बारामती)



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

गजानन नगर, पिंपळगावरोड,

यवतमाळ - ४४५ ००१

भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६


**वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१४-१५ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.

**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.

## संपादकीय संवाद...

### ग्रीसवर ओढवलेलं अर्थसंकट...

गेल्या सात-आठ वर्षात अधून-मधून डोके वर काढणाऱ्या ग्रीस अर्थसंकटानं आता उग्र रूप धारण केलं आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जाचा १.६ अब्ज यूरोचा हप्ता देण्यास ग्रीस अपयशी झाला अन् युरोपीय समुदायातील कर्ज बुडविणारा तो पहिला देश ठरला. ग्रीस हा उत्पादक देश नाही. पर्यटन अन् जहाज बंदर व्यवसायावर हा देश प्रामुख्यानं अवलंबून आहे. ग्रीसमध्ये सामान्यपणे वर्षातील ३०० दिवस ऊन पडत असले तरी विविध वनस्पती पिके इथलं वैभव समजलं जातं. या देशाचा ९० टक्के भूभाग डोंगराळ आहे. विशेष म्हणजे या देशाची गणना विकसित देशांमध्ये केली जाते. येथील लोकांना उच्च राहणीमान पसंत आहे. सधन जीवनशैली असलेल्या देशाची आर्थिक स्थिती खूप काही बरी म्हणता येणार नाही. दैनंदिन वापरात लागणारे अन्न, पेय, औषधं, इलेक्ट्रॉनिक्स सामान, कपडे यांसारख्या वस्तूसाठी हा देश अन्य देशांवर अवलंबून आहे. पण आज आर्थिक संकटानं या देशातील आयात ठप्प झालीय. या बाजारात आवश्यक वस्तूंचा तुटवडा वाढतो आहे. दैनंदिन सामान घ्यायला लोकांजवळ इथला पैसा युरो नाही. राजधानी अथेन्ससह मोठमोठ्या शहरात अनेक दुकानांचे शटर्स ओढलेले आहेत. शोरूम्स्‌समोर आकर्षक डिस्काउंटचे फलक लावूनही ग्राहक फारसा फिरकत नाही. व्यापार-व्यवहार ठप्प होण्याच्या दिशेनं वाटचाल करताहेत. शहरं भकास होताहेत. कॅन्सर, ब्लडप्रेशर, डायबेटिस सारख्या आजारांवरील औषधीही मेडिकलमध्ये उपलब्ध नसल्यानं रुग्ण प्रचंड हादरले आहेत. शहरातील स्थानिक सार्वजनिक संस्थांजवळील कर महसुलात खूपच घट झाल्यानं नागरी सुविधांवर ताण येतो आहे. ही झाली दिवसाची स्थिती. रात्रीच्या वेळेस रस्त्यांवर दिवे लागत नाहीत. रात्रीच्या वेळी मार्केटमधील पूर्वीचा झगमगाट केव्हाच लुप्त झालेला आहे. अनेकांजवळ विजेची बिलं भरायला पैसा नाही. म्हणून अनेक घरं विजेविना आहेत. कित्येक ठिकाणी नव्या इमारतींचं बांधकाम अर्धवट अवस्थेत आहे. पुढचं काम करण्यास पैसा नाही. किरकोळ पैशात ब्रेड-सँडविच मिळणाऱ्या फूड-किचनसमोर लोकांची गर्दी आहे. तर अनेक चर्चजवळ असणाऱ्या सार्वजनिक अन्नछत्रासमोर लोकांच्या रांगा लागताहेत. अनेक एटीएम्स् पैशाअभावी बंद आहेत. बँकांकडेच युरो नाहीत. एखाद्या एटीएममधून ५० युरोच्या नोटा निघत असल्या तरी दहा-वीस युरोच्या नोटा गायब आहेत. एक यूरोची नाणीही चलनातून गायब असल्यानं बाजारात लोक क्रेडिट कार्डाच्या सहाय्यानं पैसा देताहेत. पण लोकांच्या खात्यातील पैसे संपल्यावर क्रेडिट कार्डही चालेनासी होतील. दोघातल्या एकाला काम नाही. ग्रीस तरुणांमधील बेरोजगारीचा दर ५०% इतका वाढला आहे. नोकरी नाही म्हणून अनेक युवक ग्रीसबाहेर कामाच्या शोधात जाताहेत. ज्यांना नोकरी आहे त्यांना चार-सहा महिन्यांपासून पगार मिळालेला नाही. देश दिवाळखोरीच्या वाटेवर उभा असल्यानं पेन्शन निम्म्यावर आलं आहे. पूर्वीच्या काळात घेतलेल्या किंमती कार लोकांजवळ असल्या तरी पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी पैसा नाही. जुनी वाहनं, फ्लॅट मोठ्या संख्येनं नागरिकांनी विक्रीस काढले असले तरी त्यासाठी ग्राहक लागणं दुरापास्त झालं आहे. ग्रीसमध्ये बहुसंख्य उद्योग रसातळाला लागले तरी काही निर्यातक उद्योग अद्यापही तग धरून आहेत. ग्रीसमध्ये उत्तम द्राक्षं होतात. तेथील माऊंट हेलेकॉन परिसरातील वाईन उत्पादक उद्योग मोठ्या प्रमाणावर निर्यात करीत असल्यानं या उद्योगाचं उत्तम चाललं आहे. माऊंट हलिनॉस परिसरात उत्तम दर्ज्याचं

ऑलिव्ह तयार होतं. या ऑलिव्ह तेलास युरोपात मागणी असल्यानं या उद्योगाचंही बऱ्यापैकी चाललं आहे. ग्रीसमध्ये सेवा-सुविधांवर ताण येत असल्यानं पर्यटन क्षेत्रावर त्याचा बराच परिणाम झालाय.

ग्रीसमध्ये हे सगळं नेमकं झालं तरी काय हे पहावं लागेल. सन २००१-०२ मध्ये युरोपीय संघाचा सदस्य झाल्यानंतर कर्ज मिळणं सुलभ झालं. त्यानंतर सन २००८ पर्यंत पतयोग्यता नसतानाही ग्रीसनं खोटे जमा-खर्च दाखवून युरोपीय संघाकडून कर्जेमिळवली. देशाची वाढती राजकोषीय तूट अन् सरकारी कर्जाची प्रचंड रकमेची आकडेवारी लपवून ठेवली. विशेष म्हणजे युरोपीय संघाचे नियम डावलून ग्रीसने हे सगळं केलं. या काळात ग्रीसचा सार्वजनिक खर्च ८५% वाढला. कर उत्पन्नात केवळ ३१% वाढ झाली. परंतु नंतरच्या कालावधीत जागतिक अरिष्टामुळे कर्ज मिळणं ग्रीससाठी सोपं नव्हतं. अवास्तव कर्ज व अवास्तव खर्चामुळे २०१० मध्ये ग्रीसचं क्रेडिट रेटिंग कोसळलं. कमी झालेली उत्पादन क्षमता, वाढता भ्रष्टाचार, ऐषारामी संस्कृती या ग्रीसच्या समस्यांची चर्चा जगभरात झाली. ग्रीस १९ राष्ट्रांच्या युरो झोनमध्ये असल्यानं चलनाबाबत उपाययोजना करण्यावरही ग्रीसवर मर्यादा आल्या. त्याला पर्यायही कमीच उरले. ग्रीसला कोणी किती कर्ज दिलं हे पाहिलं तर जर्मनी ६८ अब्ज युरो, फ्रान्स ४३.८ अब्ज युरो, इटली ३८.४ अब्ज युरो, स्पेन २५ अब्ज युरो, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी २१.४ अब्ज युरो, युरोपियन सेंट्रल बँक १८.१ अब्ज युरो, नेदरलँडस् १३.४ अब्ज युरो, अमेरिका ११.३ अब्ज युरो, युनायटेड किंगडम् १०.८ अब्ज युरो, बेल्जियम ७.५ अब्ज युरो, ऑस्ट्रीया ५.९ अब्ज युरो याप्रमाणे कर्ज रकमा आहेत. हे सगळं ३०० अब्ज युरोचे कर्ज ग्रीसच्या जीडीपीच्या तुलनेत १७७ टक्क्यांवर आहे. तसं पाहिलं तर ग्रीसला त्यांची विलासी जीवनशैली चांगलीच महागात पडली आहे. नेहमी मदत करणाऱ्या जर्मनीनंही आता ग्रीसकडे पाठ फिरवली आहे. ग्रीस सरकारला कर्जाचं व्याज फेडण्यासाठी आपलं ७० % उत्पन्न खर्ची घालावं लागतं. आर्थिक शिस्त न राखल्यानं ग्रीसनं स्वत:वर अर्थसंकट ओढवून घेतलं आहे. जून महिन्यात युरोपीय केन्द्रीय बँकेनं ग्रीसला पैसा पुरविणे थांबविले. ग्रीस बँकांचे व्यवहार तब्बल तीन आठवडे थांबविण्यात आले. एटीएम मधून पैसे काढण्यावर नियंत्रण आलं. आणखी मदतीसाठी बेलआऊट पॅकेजसाठी युरोपीय संघाने घातलेल्या कठोर आर्थिक अटी स्वीकारायच्या नाहीत या मागणीसाठी ग्रीस राजधानी अथेन्सच्या रस्त्यावर हजारो नागरिकांनी आंदोलन केलं. पुढच्या मदतीसाठी कर्जदारांनी ज्या काटकसरीच्या अटी घातल्या होत्या त्या ग्रीस जनतेने सार्वमतात ६१% बहुमतानं नाकारल्या. ग्रीस सरकारला खर्च कपातीचे इशारे युरोपियन युनियनने वारंवार दिले होते. पण काटकसर करून जनतेचा रोष ओढण्याची तयारी सरकारनं दाखविली नाही. तरीदेखील ग्रीसने युरोझोनच्या बाहेर पडू नये म्हणून त्यांनाच चुचकारण्याची वेळ युरोपियन देशांवर आज आली आहे. ग्रीसला युरोझोनमधून न काढता नव्याने पुन्हा एकदा अर्थदान अर्थात बेलआऊट पॅकेज देण्यावर युरोपियन युनियनमधील नेत्यांमध्ये एकमत झालं. त्यामुळे ८६ अब्ज युरोचे कर्ज ग्रीसला मिळालं आहे. कर्जसंकटातून बाहेर पडण्यासाठी योजना प्राप्त करून कठोर सुधारणा मान्य केल्या तरी अजूनही संकट टळलेलं नाही. ग्रीस अर्थसंकटाला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, अमेरिका, युरोपियन राष्ट्रे तोंड देत मार्ग काढण्याचा प्रयत्न करतील, ते त्यात यशस्वीही होतील पण त्यासाठी किमान ५-६ वर्षेलागतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्था विशेषांकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो. अर्थसंवाद अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

अविनाश रामलाल निकम,
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# शेती आधारित उद्योगातील रोजगार व मूल्यवृद्धीचा अभ्यास

**साधना वा. पाटील, नाशिक,**
अर्थशास्त्र विभाग,
के.एस.के.डब्ल्यु कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिडको.
भ्रमणध्वनी: ९६०४५६९१३१

शेती आणि उद्योग ही आतापर्यंत दोन पूर्णतः स्वतंत्र क्षेत्रे समजली जात असत. शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याविषयी अजूनही नुसती चर्चा होत असली तरी शेतीवर आधारित आणि शेतीला पूरक असलेल्या उद्योगांनी केलेल्या प्रगतीमूळे शेती आणि उद्योग या दरम्यानची सीमारेषा आता पुसट होऊ लागलेली आहे. भारतात आतापर्यंत शेती विकासामुळे शेतीची उत्पादकता वाढलेली आहे. परंतु त्याच्याशी मिळत्या जुळत्या अशा रोजगार संधी मात्र वाढू शकलेल्या नाहीत. त्यामूळे एकटे शेतीक्षेत्र आर्थिक प्रश्न सोडवू शकत नाही आणि ग्रामीण विकास करू शकत नाही. त्यासाठी ग्रामीण भागात शेती आधारित उद्योग, शेती प्रक्रिया उद्योग स्थापन होणे व विकसित होणे आवश्यक आहे. या उद्योगांमुळे कमी भांडवलात रोजगार संधी निर्माण होतील व या बहूतांश संधी ग्रामीण भागातील लहान आणि सिमांत शेतकरी आणि भूमीहीन शेतमजुरांसाठी असतील.

नियोजन आयोगाने शेती आधारित उद्योग व इतर उद्योग यात फरक करण्याच्या संदर्भात चार निकष निश्चित केले आहेत. जे नंतर राष्ट्रीय विकास परिषदेकडून (National Development Council) संमत करण्यात आले. हे निकष पुढीलप्रमाणे:

१) शेतीसाठी प्रभावी आदाने निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.
२) शेती मालावर प्रक्रिया करण्यासाठी व त्यांचे रूपांतर करण्यासाठी मदत करणे.
३) प्रक्रिया केलेल्या वस्तुंना चांगला मोबदला मिळवून देण्याची खात्री देणे.
४) शेतीचे उत्पादन वाढविण्यास मदत करणे.

वरील चार निकष पूर्ण करणाऱ्या उद्योगांना शेती आधारीत उद्योग असे

म्हणतात. वरील व्याख्येवरून असे दिसून येते की, भारतीय नियोजन आयोगाने शेती आधारित उद्योगांत केवळ शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा समावेश केलेला नाही तर शेतीतील आदाने व अवजारे उत्पादीत करणाऱ्या उद्योगांचाही समावेश केलेला आहे.

The National Council of Applied Economic Research - 1965 नूसार, शेती आधारित उद्योग म्हणजे असे उद्योग की जे शेतमाल कच्चामाल म्हणून वापरतात किंवा अशी उत्पादने निर्माण करतात की जी शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी गरजेची असतात.

### शेती आधारित उद्योगांचे भारताच्या आर्थिक विकासातील महत्त्व:

भारतासारख्या विकसनशील देशाच्या संदर्भात शेती आधारित उद्योग अतिशय महत्त्वाचे मानले जातात. हे उद्योग श्रमप्रधान तंत्राचा वापर करणारे व भांडवलाची बचत करणारे आणि मुख्य म्हणजे हे उद्योग शेती हंगामाव्यतिरीक्तच्या काळात अतिशय चांगल्या, लाभदायक रोजगार संधी निर्माण करतात. ग्रामीण भागातील लोकांना रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहराकडे घेऊन जाणे हा उपाय शेतीवर वाढत जाणाऱ्या लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी होऊ शकत नाही, तर देशातील ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी, राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी करण्यासाठी, ग्रामीण व शहरी भागाच्या विकासातील असमतोल दूर करता येणे शक्य होण्यासाठी, कमी भांडवलात नवीन रोजगार निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. *FAO* च्या (*Food and Agriculture Organisation*) हे उद्योग एकूण रोजगाराच्या जवळजवळ २/३ रोजगार निर्माण करतात. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशात या उद्योगामुळे ग्रामीण भागात उपलब्ध होणाऱ्या स्थानिक कच्च्या मालाचा तसेच स्थानिक संसाधनांचा उपयोग होऊन औद्योगिकरणास चालना मिळते. उदा. कापसाचा उपयोग करण्यासाठी सूतगिरण्या, ऊसासाठी साखर कारखाने, दूध, फळे-भाजीपाला यावर प्रक्रिया करणारे उद्योग, पेय उत्पादने, भातगिरण्या, वाइनरी इत्यादी शेती आधारित उद्योग शेतमाल संसाधनांचा पर्याप्त उपयोग करतात त्याचप्रमाणे अधिक रोजगार निर्माण करून आर्थिक विकासाला चालना देतात.

### शेती आधारित उद्योगांचे रोजगार निर्मिती व निव्वळ मूल्य वृद्धीतील महत्त्व :

केंद्रीय सांख्यिकीय संघटनेच्या औद्योगिक पहाणी अहवालानूसार भारतातील वस्तू उत्पादन क्षेत्रातील शेती आधारित उद्योगांचे रोजगार निर्मितीत नेहमीच वर्चस्व असलेले दिसून येते. एकूण वस्तू उत्पादन क्षेत्रात संघटीत क्षेत्रातील शेती आधारित उद्योगांनी पूरविलेला रोजगार १९८०-८१ मध्ये ५७.५४% इतका होता. हे प्रमाण १९९०-९१ मध्ये ५२.४९%, २०००-२००१ मध्ये ५४.३०% व २००६-०७ मध्ये ५०.०८% होते. याचा अर्थ वस्तू उत्पादन क्षेत्रातील एकूण रोजगार पैकी ५०% रोजगार या उद्योगांनी पुरविलेला दिसून येतो.

शेती आधारित उद्योगांमध्ये लागणारे भांडवल तुलनेने कमी असते त्यामानाने त्यांच्यात रोजगार निर्माण करण्याची क्षमता जास्त असते Indian Annual Survey of Industries : २००८-२००९ नूसार असे दिसून येते की, भारतात गुंतविण्यात आलेल्या एकूण औद्योगिक क्षेत्रातील

स्थिर भांडवल गुंतवणूकीपैकी शेती आधारित उद्योगांत गुंतविण्यात आलेले स्थिर भांडवल फक्त २१% असून या उद्योगात निर्माण झालेल्या रोजगाराचे प्रमाण स्थिर भांडवलाच्या तुलनेत प्रत्येकी १ लाख रूपयास ३०.८४% आहे. हेच प्रमाण बिगरकृषी उद्योगात १०.८३% म्हणजे कमी आहे. प्रत्येकी एक लाख रूपयाच्या स्थिर भांडवलामागे शेती आधारित उद्योगात ३१ लोकांना रोजगार दिला जातो तर इतर उद्योगात फक्त ११ व्यक्तींना रोजगार दिला जातो या आकडेवारीत शेतीतून निर्माण होणारा रोजगार व आदानांच्या पुरवठा साखळी द्वारे निर्माण होणारा रोजगार समाविष्ट नाही. इतर उद्योगांच्या तुलनेत शेती आधारित उद्योगांना स्थीर भांडवल कमी लागते व खेळते भांडवल जास्त लागते. याचा अर्थ हे उद्योग तूलनेने भांडवलाची बचत करणारे आणि श्रमप्रधान म्हणजेच अधिक रोजगार निर्माण करणारे असतात. एकूण मूल्यवृद्धीत कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनाचा हिस्सा या उद्योगांमध्ये ३५% असून हाच हिस्सा बिगर कृषी आधारित उद्योगांत २१% म्हणजे कमी आहे. शेती आधारित उद्योगांत निर्माण होणाऱ्या निव्वळ मूल्यवृद्धीचे मूल्य ४६.६६% आहे जे इतर उद्योगांत ५२.६३% असलेले दिसून येते. या उद्योगांमध्ये आदानांचे एकूण उत्पादनाशी असणारे प्रमाण ८०.६२% आहे तर बिगर शेती आधारित उद्योगांत हे प्रमाण ७५.८२% आहे. याचा अर्थ शेती आधारित उद्योगांमध्ये इतर क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या आदानांना सामावून घेण्याचे सामर्थ्य अधिक आहे.

केंद्रीय सांख्यिकीय संघटनेच्या पाहणी अहवालानूसार २००६-०७ मध्ये संघटित क्षेत्रातील शेती आधारित उद्योगाच्या वस्तु उत्पादन क्षेत्रातील एकूण रोजगारात राज्यनिहाय वाटा केरळ राज्यात सर्वात जास्त (७७%), त्याखालोखाल आंध्र प्रदेश (६६%), तामिळनाडू (६३.२८%), कर्नाटक (६०%) आणि पश्चिम बंगाल (५९.३७%) व सर्वात कमी वाटा ओरीसा (२९%) दिसून येतो. भारतातील एकूण वस्तू उत्पादन क्षेत्रातील स्थूल मूल्यवृद्धीत शेती आधारित उद्योगांचा वाटा १९८०-८१ मध्ये ३३.७५%, १९९०-९१ मध्ये ३१.१७%, २०००-०१ मध्ये ३०.४७%, २००६-०७ मध्ये २४% इतका होता. १९८०-८१ च्या तूलनेत हा वाटा १/३ वरून १/४ एवढा कमी झालेला दिसून येतो कारण या उद्योगांची उत्पादकता तूलनेने कमी असते. २००६-०७ च्या आकडेवारीनूसार शेती आधारित उद्योगांच्या वस्तू उत्पादन क्षेत्रातील एकूण मूल्यवृद्धीतील राज्यनिहाय वाटा सर्वात जास्त पंजाब (५६%), त्याखालोखाल केरळ (५०.६०%), तामिळनाडू (४०.२९%), उत्तरप्रदेश (३१%), महाराष्ट्र (३०%) दिसून येतो. या राज्यांमध्ये शेतीआधारित उद्योगांची उत्पादकता इतर राज्यांच्या तूलनेत जास्त आढळून येते. अर्थात बिगर शेती आधारित उद्योगांच्या तूलनेत ही उत्पादकता कमी आहे.

### शेती आधारित उद्योगांची रोजगार व मूल्यवृद्धी बाबतची तुलनात्मक स्थिती:

२०११-१२ या वर्षात भारतातील एकूण औद्योगिक युनिट्स मध्ये शेती आधारित उद्योगांचा वाटा ३५.३%, एकूण रोजगारातील वाटा ४०.३२%, एकूण औद्योगिक उत्पादन मूल्यातील वाटा २१.६९% व एकूण मूल्य वृद्धीतील वाटा १५.१८% होता. एकूण उद्योगांमध्ये शेती आधारित

उद्योगांमध्ये असलेल्या खेळत्या भांडवलाचा वाटा २१.२६% व स्थिर भांडवलाचा वाटा २०.३% इतका होता आणि या उद्योगांपासून मिळालेले निव्वळ उत्पन्न १३.९६% होते.

खालील तक्त्यात भारतातील शेती आधारित उद्योगांची वर्गवारी पाच विभागात करण्यात आलेली आहे. त्यांची २००७-०८ व २०११-१२ या काळातील संख्या, उद्योगांची वृद्धी प्रत्येक विभागाचा एकूण शेती आधारित उद्योगातील वाटा, रोजगार व मूल्यवृद्धीतील वाटा यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. शेती आधारित उद्योगांच्या वर्गवारीतील विभाग पुढीलप्रमाणे आहेत.

विभाग १) खाद्य आणि पेय उत्पादने यात अ)मांस आणि मासे, फळे, तेल आणि चरबीयूक्त पदार्थांचे उत्पादन प्रक्रिया आणि प्रिझरव्हेशन/साठवण. ब)दूध उत्पादने क) धान्य गिरण्या, पीठ व पिठापासूनची उत्पादने तयार पशूखाद्य उत्पादने. ड) इतर खाद्य उत्पादने इ) पेय उत्पादने इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे. विभाग २)तंबाखू उत्पादने विभाग ३) कापड उत्पादने - यात अ) सूत, विणकाम आणि तयार

**शेती आधारित उद्योगांची विविध विभागानूसार संख्या रोजगारनिर्मिती व निव्वळ मूल्यवृद्धी स्थिती (मूल्यवृद्धी लाख रूपयात)**

| अ.क्र. | विभाग | २००७-०८ | | | २०११-१२ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रोजगार निर्मिती | निव्वळ मूल्यवृद्धी | संख्या | रोजगार निर्मिती | निव्वळ मूल्यवृद्धी |
| ०१ | खाद्य आणि | २४२३८ | १२६५१२२ | १५६१२०० | ३०५१० | १४१०१०२ | १६८८३७९ |
| | पेय उत्पादने | (५१.५६) | (३८.०३) | (३८.६५) | (५१.८६) | (३८.००) | (३७.९६) |
| ०२ | तंबाखू | २५४१ | ४७५६९८ | ४९८६६१ | ४१५७ | ५६५९८७ | ५९४२८९ |
| | उत्पादने | (५.४०) | (१४.३०) | (१२.३४) | (७.०६) | (१५.२५) | (१३.३६) |
| ०३ | कापड | १३८५२ | १२६४५८९ | १४६६८२५ | १५६९८ | १३२५८०९ | १५२९७४३ |
| | उत्पादने | (२९.४७) | (३८.०१) | (३६.३०) | (२६.६८) | (३५.७५) | (३४.३९) |
| ०४ | लेदर | २८४२ | १४२९८८ | १४४८५६ | ३८९६ | १६५९०० | २१०५४२ |
| | उत्पादने | (६.०४) | (४.२२) | (३.५९) | (६.६२) | (४.४७) | (४.७३) |
| ०५ | कागद व | ३५२९ | १७७८९१ | ३६८२२५ | ४५६८ | २४२५६१ | ४२५१२६ |
| | कागद उत्पादने | (७.५०) | (५.३४) | (९.१२) | (७.७६) | (६.६९) | (९.५६) |
| | एकूण | ४७००२ | ३३२६२८८ | ४०३९७६७ | ५८८२९ | ३७१०३५९ | ४४४८०७९ |
| | | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

स्रोत: *1) Annual survey of Industries central statistical organisation, New Delhi (Different Issues)* व *2) www.indiastat.com*

*(टिप : कंसातील अंक एकूणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात)*

कापड उत्पादने ब) इतर कापड उत्पादने क) विणकाम भरतकाम आणि इतर फेब्रीक उत्पादने इत्यादी. विभाग ४) लेदर, (चामडी) उत्पादने विभाग ५) कागद व कागद उत्पादने इत्यादी पाच विभागांचा समावेश करण्यात आलेला आहे.

मागील पृष्ठावरील तक्त्यावरून असे दिसून येते की, २००७-०८ मध्ये वरील पाच विभागातील शेती आधारित उद्योगांची एकूण संख्या ४७००२ वरून २०११-१२ मध्ये ५८८२९ एवढी वाढलेली दिसून येते. ही वाढ २००७-०८ ते २०११-१२ या काळात २५.१६% एवढी आहे.

एकूण शेती आधारित उद्योगांत खाद्य आणि पेय उत्पादन करणाऱ्या विभागाचा वाटा एकूण संख्येत २००७-०८ मध्ये ५१.५६% व २०११-१२ मध्ये ५१.८६% म्हणजे निम्मा असलेला दिसून येतो. त्याखालोखाल कापड निर्मिती उत्पादनांचा क्रमांक लागतो. २००७-०८ मध्ये सगळ्यात कमी वाटा तंबाखू उत्पादनांचा असून २०११-१२ मध्ये लेदर उत्पादनांचा आहे.

२००७-०८ मध्ये शेती आधारित उद्योगातील वरील पाच विभागांनी निर्माण केलेला एकूण रोजगार ३३,६२,२८८ श्रमीक एवढा होता २०११-१२ मध्ये या उद्योगांनी ३७१०३५९ श्रमिकांना रोजगार पुरविलेला दिसून येतो. रोजगार निर्मितीतील एकूण वाढ ११.५५% व सरासरी वाढ २.३१% आहे. वरील विभागांपैकी खाद्य व पेय उत्पादने या विभागाचा रोजगार निर्मितीतील वाटा सर्वाधिक असलेला आढळून येतो. २००७-०८ ते २०११-१२ या कालखंडात हा वाटा ३८% असा कायम आहे. त्याखालोखाल कापड उत्पादने ३८% व ३५% आहे. सगळ्यात कमी वाटा लेदर उत्पादनांचा आढळतो. मागील पृष्ठावरील तक्त्यावरून असे दिसून येते की, भारतातील रोजगार निर्मितीत शेती आधारित उद्योगांची कामगिरी अत्यंत भरीव स्वरूपाची आहे.

२००७-०८ च्या तुलनेत २०११-१२ मध्ये शेती आधारित उद्योगातील उत्पादनाचे मूल्य ४२८७०६९२ लाख रुपयांवरून ५०३३६८८८ लाख रुपये असे वाढले. ही वाढ १७.४२% आहे. याच कालावधीत या उद्योगांच्या निव्वळ मूल्य वृद्धीचे मूल्य ४०३९७६७ लाख रूपयांवरून ४४४८०७९ लाख रुपये एवढे झाले. ही वाढ १०.११% असून सरासरी वाढ २.०२% अशी आढळते. खाद्य व पेये उत्पादने या विभागाने एकूण मूल्यवृद्धीत टाकलेली भर सर्वात जास्त असून त्याखालोखाल कापड उत्पादनाचा क्रमांक आहे. सगळ्यात कमी वाटा लेदर उत्पादनांचा दिसून येतो. अर्थात २००७-०८ च्या तूलनेत २०११-१२ मध्ये यात १.१५% वाढ दिसून येते.

भारतातील वरील पाच विभागातील उद्योगांची भारतातील संख्या, त्यांच्यातील रोजगार निर्मितीची क्षमता, त्यांनी उत्पादीत केलेल्या उत्पादनाचे मूल्य व निव्वळ मूल्यवृद्धीचे मूल्य पाहता खाद्य व पेय उत्पादने या विभागाचा प्रथम क्रमांक लागतो व त्याखालोखाल कापड उत्पादनाचे योगदान असलेले दिसून येते.

शेती आधारित उद्योगांमध्ये शेती व शेतीशी संबंधीत उत्पादने, शेती आदाने, शेती सेवा केंद्रे, शेती प्रक्रिया उद्योग या सर्वांचा समावेश होतो. भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६८.८% असून भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ५६% लोकसंख्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगारासाठी शेतीवर अवलंबून आहे. अशा

स्थितीत औद्योगिकरणाचा कार्यक्रम ग्रामीण भागाच्या विकासाला योग्य महत्त्व देणारा असला पाहीजे. यासाठी उद्योग स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या साधनांवर आधारित असावेत. कमी भांडवलात जास्तीत जास्त रोजगार निर्माण करून देशातील बेकारी कमी करणे, दारिद्र्य निवारण करणे, देशाला स्वयंपूर्णता व आत्मनिर्भरता प्राप्त करून देणे या दृष्टीने शेती आधारित उद्योग अत्यंत महत्त्वाचे आहेत.

**संदर्भसूची:**


1) Gaurav Datt, Ashwini Mahajan, *Indian Economy 2012*, 66th Edition, S. Chand Publication.
2) R.P. Kachru, *Report of Agro Processing Industries in India,* Growth status and prospects.
3) S.K. Gupta. *Development of Agro Industries, Problems and Prospects,* Deep and Deep Publication, New Delhi.
4) *Annual Survey of Industries, Summary Results for Factory sector central statistical organisation.* Department of Statisties, Ministry of Planning Govt. of India.
5) C. Laxmi Kantha Reddy, Prof. Rathna Kumari, *Performance of Agro Based Industries in India : A Critical Analysis*, IOSR Journal of Economics and Finance Vol. 2, Issue-4. Jan. 2014.
6) V. Vankaiah, *Impact of Agrobased Industries on Rural Economy*, First Edition 1987, Himalaya Publishing House.
7) *Food and Agriculture Organisation (FAO) The Agro Processing Industry and Economic Development*, http://www.go.org.//documents.

# खासदार आदर्श ग्राम विकास योजना विकासाचे नवीन पर्व

**रामचंद्र जी. रसाळ,** प्रवरानगर,
उपप्राचार्य, पी.व्ही.पी. कॉलेज,
लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी: ९८५००४४०८९
ई-मेल: ramrasal18@gmail.com

**सतिश आशिनाथ गोंडे,** प्रवरानगर,
पी.व्ही.पी. कॉलेज,
लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी: ९९२११३९३३९
ई-मेल : tushar.gonde@gmail.com

प्रास्ताविक:

भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. वर्तमान स्थितीत भारताच्या ६.३८ लाख गावांमध्ये एकूण लोकसंख्येच्या सुमारे ६८.८% लोकसंख्या निवास करते. स्थुल देशांतर्गत उत्पादनाच्या ३३%, निर्यात उत्पन्नाच्या २४% आणि एकूण महसुली उत्पन्नाच्या ४६% भाग ग्रामीण क्षेत्रापासुन प्राप्त होतो. त्यामुळेच कदाचित- भारताच्या आर्थिक विकासात ग्रामीण विकासाला अनन्यसाधारण महत्व आहेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणाले होते, 'दिल्ली भारत नही है, भारत तो गावो मे बसता है ।' अंत: आपल्या भारताची उन्नती करायची असेल तर गावाचा सर्वांगिण विकास करावा लागेल. त्यामुळेच त्यांनी नारा दिला होता, 'गावो को वापिस चलो।' राष्ट्रपिताचा हा नारा केंद्र बिंदू ठेवुन स्वातंत्र्य भारतात १९५० नंतर शासनाने ग्रामीण विकासाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. त्यात मनरेगा (१ डिसें. २००१), पंतप्रधान ग्रामसडक योजना (२५ डिसें. २०००), सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (१ एप्रिल १९९९), राष्ट्रीय

ग्रामीण अजिविका मिशन (जून २०११), स्वयं सहायता समुह, वीस कलमी योजना (१९७५) राष्ट्रीय ग्रामीण स्वच्छ पेयजल कार्यक्रम, निर्मल ग्राम योजना, इंदिरा आवास योजना (१९८०), इ. या योजनांमुळे ग्रामीण भागाच्या विकासाला मोलाची मदत झालेली आहे.

**अभ्यासाची उद्दीष्ट्ये आणि पद्धती:**

भारताच्या विकासामध्ये ग्रामीण विकासाची भुमिका समजुन घेणे ग्रामीण विकासाच्या विविध योजनांचा आढावा घेऊन खासदार आदर्श ग्राम विकास योजनेचे ग्रामीण विकासातील महत्व अभ्यासणे, खासदार आदर्श ग्रामविकास योजनेची पार्श्वभूमी, स्वरुप, त्यातील विविध कार्यक्रम या संबंधी माहिती मिळविणे ही प्रस्तुत शोध निबंधाची उद्दीष्ट्ये आहेत.

सदर शोध निबंध वर्णनात्मक पद्धतीचा आहे. त्यासाठी द्वितीय तथ्य संकलनपद्धतीचा अवलंब करुन तथ्य संकलित केलेले आहेत. एन.एस.एस.ओ. चे अहवाल, भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, केंद्रीय ग्रामीण विकास रिपोर्ट-२०१२-१३, शासनाच्या सुचना आणि प्रकाशन विभागामार्फत प्रकाशित होणारी ग्रामीण विकासात समर्पित मासिक 'कुरुक्षेत्र' आणि 'योजना' या साहित्यातून शोधनिबंधासाठी आधार सामग्री मिळविली आहे.

**खासदार आदर्श ग्रामविकास योजनेची पार्श्वभूमी:**

महात्मा गांधी यांचा असा दृढ समज होता की, भारतातील गावांचा विकास झाला नाही तर भारताचे अस्तित्वच धोक्यात येईल. म्हणूनच त्यांनी ग्राम स्वराज्याला महत्व दिले. 'वर्धाप्रयोग' याच उद्देशाचा एक मुलभूत भाग होता. रविंद्रनाथ टागोर देखील याच विचारांचे समर्थक होते. त्यांनी त्याच प्रयोजनार्थ श्रीनिकेतन परियोजना सुरु केली होती. सामूहिक विकास कार्यक्रमाचे मुख्य अधिकारी गांधीवादी एस. के. डे यांनी ग्रामीण विकासासाठी जिलोखेडी प्रयोग सुरु केला होता. त्यानंतर १९६०च्या दशकामध्ये केंद्रीयकृत गावांना आदर्श गावाच्या स्वरुपात ओळख दिली गेली. एन. एस. एस. योजनेच्या अंतर्गत प्रत्येक विश्वविद्यालय आणि महाविद्यालय द्वारा ग्राम दत्तक योजना कार्यक्रम सुरु केला होता. अशाच प्रकारचे प्रयोग विसाव्या शतकाच्या अंतिम दशकामध्ये आणि वर्तमान शतकामध्ये केले गेले.

वर्ष २००८ मध्ये मायावती सरकारने संशोधित आंबेडकर ग्राम विकास योजना सुरु केली होती. वर्ष २०१२ मध्ये याच योजनेचे अखिलेश यादव सरकारने राम मनोहर लोहिया समग्र विकास योजनेत रुपांतर केले. काँग्रेसने सुरु केलेले गांधीग्राम उत्तराखंड मध्ये बीजेपीच्या काळात अटल ग्राम झाले होते. वर्ष २०१० मध्ये केंद्र सरकारने ५०% पेक्षा अधिक दलित लोकसंख्या असणाऱ्या ४४,००० गावांमध्ये आदर्श ग्राम योजना सुरु केली होती. हे सर्व कार्यक्रम प्रशासनाची इमानदारी व निष्ठेचा अभाव यामुळे अपयशी ठरले. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ ऑक्टोबर २०१४ रोजी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या जयंतीचे निमित्त साधुन खासदार आदर्श ग्राम विकास योजनेचा शुभारंभ केला आहे. ज्या अंतर्गत खासदारांकडून १ गाव दत्तक घेण्याचे प्रयोजन आहे.

**खासदार आदर्श ग्राम योजनेचे स्वरुप:**

या योजनेअंतर्गत खासदारांना आपल्या मतदार क्षेत्रातील आपल्या पती अगर पत्नीशी

संबंधित नसणाऱ्या एका गावाची निवड करायची आहे. मैदानी क्षेत्रामध्ये ३००० ते ५००० आणि पर्वतीय क्षेत्रात १००० ते ३००० लोकसंख्या असणारे गाव निवडून वर्ष २०१६ पर्यंत आदर्श गाव म्हणून त्याचा विकास करावयाचा आहे आणि वर्ष २०१९ पर्यंत आणखी २ गावांना आदर्श गावाच्या स्वरुपात विकसीत करावयाचे आहे. या योजनेनुसार एका गावाचा विकास करावा व गावकऱ्यांना विकास कार्यक्रमासाठी प्रेरणा द्यावी अशी अपेक्षा खासदारांकडून केली आहे. रुपये ५ कोटींचा खासदार निधीचा वापर त्यांना संघटीत करण्याबरोबर निधीची कमतरता भरून काढण्यासाठी केला जाणार आहे.

**खासदार आदर्श ग्राम विकास योजनेतील मुलभूत घटक:**

मानवीय विकास: मानवीय विकासामध्ये आरोग्याच्या मुलभूत सुविधा ज्यामध्ये आरोग्यपत्रक, आणि वैद्यकीय तपासणी, लसीकरण, लिंग भेद प्रमाण, १००% संरक्षणात्मक बाळंतपण, लहान मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती स्त्रिया यावर विशेष लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. सर्वांसाठी १० वी पर्यंत शिक्षणाच्या सुविधा, शाळांचे स्मार्ट शाळेत रुपांतर, ज्यामध्ये आयटी समक्ष वर्ग, ई-लायब्ररी, सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण देण्याकरीता वेबवर आधारित शिक्षण, प्रौढ साक्षरता, ई-साक्षरता, आणि गावातील ग्रंथालये यासह ई-ग्रंथालय हे देखील मानव विकासाचा भाग असणार आहे.

सामाजिक विकास:

सामाजिक विकासा अंतर्गत वयस्कर लोकांचा आदर करणे तसेच स्थानिक आदर्श व्यक्तींचा मान राखणे विशेषत: स्त्रिया, स्वातंत्र्य सैनिक आणि हुतात्मे इत्यादी. हिंसाचार आणि गुन्हे मुक्त गाव निर्माण करण्यासाठी नागरिकांची समिती स्थापन करणे, विशेषत: तरुणांमध्ये सामाजिक संवेदनशिलता वाढविणे, लोकांमध्ये गावाप्रती आपुलकीची भावना निर्माण करण्यासाठी ग्रामगिताची निर्मिती करणे. ग्रामदिन साजरा करणे या व्यतिरिक्त उपेक्षित आणि मागास जाती जमातीतील लोकांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार आहे.

आर्थिक विकास:

आर्थिक विकास साधण्यासाठी या योजनेअंतर्गत शेती व शेती पूरक व्यवसाय ज्यामध्ये पशूधन, बागायती शेती, जैवीक शेती, यांच्या विकासावर भर राहणार आहे. तसेच मातीचे आरोग्यपत्रक, सखोल शेती, बीजबँकेची स्थापना, इमारती योग्य नसलेल्या लाकडाचे एकत्रीकरण व मुल्य निश्चिती, यांचाही विकास यावर भर असणार आहे. पशुधनामध्ये शेण, गुराचे गोठे, सुक्ष्मसिंचन, कृषी केंद्र, यांचा विकास अंर्तभुत आहे. त्याचबरोबर लघुउद्योग, दुध डेअरी विकास आणि प्रक्रियाकरण, खाद्य प्रक्रिया उद्योग आणि परंपरागत उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण औद्योगिकरण करण्यावर भर असणार आहे.

स्वयंरोजगार आणि रोजगारासाठी पात्र तरुणांचा कौशल्य विकास आणि पर्यावरण समवेत ग्रामीण पर्यटनाच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. स्त्रीयांचे स्वयंसहाय्यता समुह बनविणे, मजूरांना रोजगार मिळवून देणे. त्यांना आर्थिक प्रवाहात आणणे, यासारखी पावले उचलून गरीब लोकांचे राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

पर्यावरण विकास:

या योजने अंतर्गत गाव स्वच्छ, हिरवेगार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहे. त्यामध्ये सर्व घरांमध्ये आणि सर्व संस्थामध्ये शौचालय उपलब्ध करणे आणि त्यांचा योग्य वापर होतोय का ? यावर लक्ष ठेवणे. तसेच ओल्या आणि सुक्या कचऱ्याचे योग्य नियोजन करणे, रस्त्याच्या दुतर्फा झाडांची लागवड, घरी, शाळेत, सार्वजनिक ठिकाणी, वृक्षारोपण करणे, सामाजिक वनीकरण, पाणलोट व्यवस्था- विशेषत: जुन्या जलाशयाचे नुतनीकरण किंवा पुनरुजिवन करणे, पावसाच्या पाण्याची साठवण करणे यासाठी सरकार प्रयत्नशील असणार आहे.

सामाजिक सुरक्षा:

सामाजिक सुरक्षितेत पुढील गोष्टींवर लक्ष केंद्रीत करणे अपेक्षित आहे. वयस्कर लोक, अपंग आणि विधवांच्या सर्व पात्र कुटुंबियांना निवृत्ती वेतन, विमा योजना (आम आदमी विमा योजना, आरोग्य विमा, पी.डी.एस.), पात्र घरांकरीता मुलभूत सेवा सुविधा-घरे, पाणी पुरवठा, रस्त्याच्या बाजूला बंद गटारे, वाहतूकीसाठी खुले रस्ते विज पुरवठा, सौर उर्जा इ., सार्वजनिक संस्थेकरीता पक्के बांधकाम- अंगणवाडी, शाळा, हॉस्पीटल, ग्रामपंचायत कार्यालय, ग्रंथसंग्रहालय इ., नागरी पायाभूत सुविधा- कम्युनिटी हॉल, खेळासाठी मैदान, स्मशानभूमी, बाजार, छोट्या बँका, टपाल, ए.टी.एम., ब्रॉडबँन्ड जोडणी आणि सामुहिक सेवा केंद्र, सार्वजनिक ठिकाणी दूरध्वनी जोडणी आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे इ. कार्य अपेक्षित आहे.

चांगले प्रशासन:

यामध्ये विशेषत: खालील बाबींचा समावेश असणार आहे. जबाबदार ग्रामपंचायत व सक्रीय ग्रामसभा- सर्वांसाठी आधार कार्ड, प्रत्येक ग्रामसभेआधी महिला ग्रामसभेचे आयोजन, वर्षातून किमान ४ वेळा ग्रामसभेचे आयोजन, तीमाही बालसभेचे आयोजन इ., सार्वजनिक विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणी बाबत- सर्व माहिती स्वत:हून प्रकट करणे तसेच स्थानिक भाषेत सुचना फलक आणि भित्ती लेखन, प्रत्येक घटनेप्रमाणे खर्चाचे आयोजन इत्यादी, लोकांच्या समस्येचे तात्काळ निवारण यामध्ये लेखी स्वरुपात तक्रार, त्याची लेखी नोंद पावती मिळविणे आणि ३ आठवड्यांच्या आत समस्या निवारण केले जाणार आहे.

सारांश आणि समारोप:

खासदार आदर्श ग्राम विकास योजनेसाठी स्वतंत्र निधीची व्यवस्था नाही. फक्त खासदार विकास निधीचा उपयोग करावयाचा आहे आणि गरज वाटल्यास स्थानिक धर्मदाय संस्था व ग्रामवासियांची मदत घेऊन विकास कार्य करायचे आहे. त्यामुळे वाटते तितके हे काम सोपे नाही. शिवाय खासदार ग्राम विकास निधीकडून ग्रामीण विकास विभागाबरोबरच शासनाच्या इतर विभागानीही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. तसेच भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांच्या बहुतांशी खासदारांनी अशा गावांची निवड केली आहे. ज्यामध्ये मुस्लिम लोकसंख्या अल्प आहे. तसेच बऱ्याच खासदारांनी आपल्या सांप्रदायची लोकसंख्या अधिक असणाऱ्या गावांची निवड केली आहे. यामुळे धार्मिक अगर सांप्रदायिक द्वेष निर्माण होण्याची शंका व्यक्त केली जात आहे.

असे असले तरी संसदेच्या दोन्ही सभागृहातील ७९५ खासदार मिळून २०१६ पर्यंत ७९५ गावे आदर्श बनतील. प्रत्येक वर्षी एक यानुसार २०१४-२०२४ पर्यंत देशातील ६ लाख

गावांपैकी जवळपास ६,३६० गावे आदर्श बनतील. तसेच जनसामान्यांकडून ज्या ५ करोड रुपयांच्या खासदार विकास निधीबद्दल शंका उपस्थित केल्या जात होत्या, तो निधी विकास कार्यासाठी वापरला जाणार आहे. त्यामुळे खासदारांना देखील जनसामान्यामध्ये आपली प्रतिष्ठा उंचवण्याची संधी मिळणार आहे. परिणामी जिल्हा प्रशासन आणि इत्तर लोक प्रतिनिधींना देखील अशा प्रकारे कार्य करण्याची प्रेरणा मिळून या योजनेचा प्रभाव देशव्यापी ठरुन ही योजना ग्रामीण विकासाची नांदी ठरेल असे वाटते.

संदर्भ सुची:


१) *योजना (मराठी)*, वर्ष -४२, अंक-४, नोव्हेंबर २०१४ पृ. ५२-५३

२) *कुरुक्षेत्र (हिंदी)* वर्ष ६१, अंक-०१, नोव्हेंबर २०१४, पृ. -२२-२६

३) *कुरुक्षेत्र (हिंदी)* वर्ष -६१, अंक-०४,फेब्रुवारी २०१५, पृ. ८-११

४) *क्रॉनिकल (हिंदी)*- भारतीय आर्थिक समिक्षा, वर्ष -२४, अंक -०९, एप्रिल - २०१५, पृ. २१४-२१५


## मराठी अर्थशास्त्र परिषद: महत्त्वाची सूचना

## मतदारांसाठी ओळखपत्र आवश्यक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात संपन्न होणाऱ्या सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळातील रिक्त होणाऱ्या पदाकरिता (कार्यकारी मंडळ सदस्य, अध्यक्ष, कार्याध्यक्ष व कार्यवाह खजिनदार) मतदान घेतले जाते. या संदर्भात जळगाव येथील मुळजी जेठा महाविद्यालयात ११ एप्रिल २०१५ रोजी परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पुढील महत्त्वपूर्ण निर्णय झाला आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाच्या विविध जागांसाठी यापुढे घेतल्या जाणाऱ्या मतदानाकरिता परिषदेच्या आजीव सदस्यांनी (मतदानासाठी पात्र असलेले सभासद क्रमांक) आपले छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. यामध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड(शासनाचे), पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेले ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे याची कृपया सन्माननीय आजीव सदस्यांनी नोंद घ्यावी.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि.पुणे येथे होणाऱ्या ३९व्या (दि.१६, १७ व १८ नोव्हेंबर २०१५) अधिवेशनापासूनच ओळखपत्र सक्तीचे करण्यात येत आहे. ओळखपत्र नसल्यास मतदान करता येणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी. याकरिता आपणाकडून सहकार्य अपेक्षित आहे.

-कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद.

# ग्रामीण विकासात स्त्री कृषी श्रमिकांची भूमिका

**ज्योती वसंत साठे, पुणे,**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी,
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, पुणे.
भ्रमणध्वनी - ९८६०१८८४८१
ई-मेल: jyotisathe21@gmail.com

भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण अर्थव्यवस्थेला खूप महत्त्व आहे. कारण ग्रामीण क्षेत्राचा मुख्य व्यवसाय हा कृषी असून भारताच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. २०१३-१४ मध्ये कृषी क्षेत्राचा GDP मधील वाटा १४ टक्के तर रोजगारातील वाटा जवळपास ५० टक्के इतका होता. कृषी क्षेत्राचे वर्चस्व हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य असल्याने ग्रामीण विकासावरच भारताचा सर्वांगीण विकास अवलंबून असल्याचे दिसते. आज भारत हा जागतिक महासत्ता बनण्याच्या वाटेवर असताना ग्रामीण भागाची आर्थिक व सामाजिक उन्नती होणे गरजेचे आहे. कृषीक्षेत्राचा विकास झाल्यास पर्यायाने ग्रामीण आर्थिक क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते. ग्रामीण विकासाचा विचार केंद्रस्थानी ठेवून शाश्वत ग्रामीण विकासाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. ज्याप्रमाणे ग्रामीण भागाचा विकास हा कृषी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे, त्याचप्रमाणे कृषीचा विकासही अनेक घटकांवर अवलंबून आहे आणि त्यातही सर्वात महत्त्वाचा घटक कृषी श्रमिक हा होय. प्रस्तुत लेखात विशेषत: स्त्री कृषी श्रमिकांची ग्रामीण विकासातील भूमिकेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**ग्रामीण विकासाची संकल्पना:**

भारतासारख्या कृषीप्रधान देशात ग्रामीण विकास ही विकासाची पूर्वअट ठरते. सामान्यत: ग्रामीण विकास म्हणजे गरीब, लहान व मध्यम शेतकरी, कष्टकरी मजदूर इत्यादींचा सामाजिक आणि आर्थिक स्तर सुधारणे होय, असे मानले जाते. भारतीय नियोजन मंडळाच्या मते, *या प्रक्रियेमुळे ग्रामीण जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणली जाते. ती प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.* त्याचबरोबर कृषी, पशुपालन, जलसिंचन, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, वाहतूक व दळणवळण, उद्योगधंदे यांच्या विकासाचा समावेश ग्रामीण विकासात होतो.

## ग्रामीण विकास आणि स्त्री कृषीश्रमिक:

ग्रामीण विकासात कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु कृषी क्षेत्राच्या विकासात अनेक घटकांचे योगदान असते आणि त्या घटकांमध्ये महत्त्वाचा व मूलभूत असा घटक म्हणजे कृषी क्षेत्रातील श्रमिक होय. कृषी श्रमिकांचे स्थानही ग्रामीण विकासात महत्त्वाचे ठरते.

द्वितीय कृषीश्रमिक चौकशी समितीच्या (१९५६-५७) मते, *पीक उत्पादनात गुंतलेल्या श्रमिकांबरोबरच इतर शेतकी परिचलनात रोजंदारीवर काम करणाऱ्यांनाही कृषीश्रमिक समजण्यात येईल. म्हणजेच कृषीश्रमिक फक्त शेतमालाचे उत्पादन करणाऱ्याच व्यक्ती नव्हे तर पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व मधुमक्षिका पालन इ. पूरक व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तिंनाही कृषीश्रमिक म्हणता येईल.*

ज्यावेळी कृषीश्रमिकांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाविषयी विचार केला जातो. त्यावेळी स्त्री कृषीश्रमिकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. कारण स्त्री ग्रामीण अर्थव्यवस्थेत सामाजिक, आर्थिक तसेच कौटुंबिक पातळीवर महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. स्त्री कृषी श्रमिक आपल्या कुटुंबात पर्यायी उत्पन्न मिळवून कुटुंबाची राहणीमान पातळी उंचावण्यास मदत करते. स्त्री कृषी श्रमिकांचे त्यांच्या कार्यपद्धतीवरून वर्गीकरण केल्यास एकूण दोन प्रकार पडतात. १. भूमिहीन कृषीश्रमिक, २. नैमित्तिक, नियमित व संलग्न कृषीश्रमिक, अ.नैमित्तिक / प्रासंगिक कृषीश्रमिक ब.नियमित किंवा संलग्न कृषीश्रमिक ज्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची जमीन नसते व हे श्रमिक इतरांच्या शेतात काम करतात, ते भूमिहीन कृषीश्रमिक असतात व ज्यांना कायमस्वरूपी काम मिळत नाही ते प्रासंगिक किंवा हंगामी कृषीश्रमिक असतात.

कृषीक्षेत्रातील श्रमिकांमध्ये इतर क्षेत्रातील श्रमिकांपेक्षा भिन्न वैशिष्ट्ये असल्याचे आढळते. उद्योग व सेवा क्षेत्रातील श्रमिकांपेक्षा कृषीश्रमिकांची आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी वेगळी असते. त्यांची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

१. भारतीय कृषी श्रमिकांमध्ये शिक्षणाचा अभाव आढळतो.
२.कृषीक्षेत्र हे मुळातच असंघटित असल्याने कृषीश्रमिकही असंघटित असतात.
३. कृषीश्रमिकांना मिळेल ते काम करावे लागते. त्यांना कामाची शास्वती नसते.
४.उद्योगक्षेत्र व सेवाक्षेत्रातील श्रमिकांपेक्षा कृषीक्षेत्रातील श्रमिकांना मिळणारा मोबदला कमी असतो.
५.तसेच कृषीश्रमिकांमध्ये इतर कौशल्यांचा अभाव असल्याने त्यांना इतर क्षेत्रात कामाची उपलब्धता कमी असते इत्यादी.

## स्त्री कृषीश्रमिकांची विकासातील भूमिका:

२०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६८.९ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते, तर महाराष्ट्रात ५४.८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ४८.५३ टक्के स्त्रिया व पुरुषांचे प्रमाण ५१.४७ टक्के इतके आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण अनुक्रमे ४८.१७ टक्के व ५१.८३ टक्के इतके आहे. भारतातील कृषीक्षेत्रात कार्यरत लोकांपैकी कृषीश्रमिकांची संख्या तक्ता क्र.१ मध्ये व महाराष्ट्रातील कृषीश्रमिकांची संख्या तक्ता क्र.२ मध्ये दर्शवली आहे.

## तक्ता १: भारतातील कृषी श्रमिकांची संख्या २००१ व २०११

| प्रकार | भारत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण कृषीश्रमिक | | पुरुष कृषीश्रमिक | | महिला कृषीश्रमिक | |
| | २००१ | २०११ | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| मुख्य कृषीश्रमिक | ६३४९७ (५९.४७) | ८६१६७ (५९.७०) | ४११११ (३८.५१) | ५५२५५ (३८.२८) | २२३७८ (२०.९६) | ३०९१२ (२१.४१) |
| सीमांत कृषीश्रमिक | ४३२७८ (४०.५३) | ५८६१३ (४०.३०) | १६२१० (१५.१८) | २७४८५ (१९.०४) | २७०६८ (२५.३५) | ३०६७८ (२१.४५) |
| एकूण कृषीश्रमिक | १०६७७५ (१००) | १४४३३० (१००) | ५७३२९ (५३.६९) | ८२७४० (५९.३२) | ४९४४६ (४६.३१) | ६१५९० (४२.६८) |

स्रोत: Economic Survey (2006-07 and 2013-14)
*टिप: कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.*

## तक्ता २: महाराष्ट्रातील कृषी श्रमिकांची संख्या २००१ व २०११

| प्रकार | महाराष्ट्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण कृषीश्रमिक | | पुरुष कृषीश्रमिक | | महिला कृषीश्रमिक | |
| | २००१ | २०११ | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| मुख्य कृषीश्रमिक | ७६४२ (७०.५५) | ११०६९ (८२.०८) | ३९४२ (३६.४४) | ५८४७ (४३.३५) | ३७०० (३४.२१) | ५२२२ (३८.७२) |
| सीमांत कृषीश्रमिक | ३१७४ (२९.३५) | २४१७ (१७.९२) | ९८२ (९.०७) | ९२८ (६.८८) | २१९२ (२०.२७) | १४८९ (११.०४) |
| एकूण कृषीश्रमिक | १०८१५ (१००) | १३४८६ (१००) | ४९२४ (४५.५२) | ६७७५ (५०.२३) | ५८९१ (५४.४८) | ६७११ (४९.७७) |

स्रोत: Economic Survey (2006-07 and 2013-14)
*टिप: कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.*

तक्ता १ व २ नुसार भारतात व महाराष्ट्रात २००१ व २०११ च्या मध्ये कृषीश्रमिकांच्या संख्येत कशाप्रकारे बदल झाला आहे, हे लक्षात येते. यात एकूण कृषीश्रमिकांचे मुख्य कृषीश्रमिक आणि सीमांत कृषीश्रमिक असे विभाजन केले आहे. मुख्य कृषीश्रमिक म्हणजे जे वर्षातील १८३ दिवसांपेक्षा जास्त दिवस कृषीत काम करतात व सीमांत कृषीश्रमिक म्हणजे वर्षातील १८३ दिवसांपेक्षा कमी दिवसांचे काम ज्यांना मिळते. भारताच्या संदर्भात विचार केल्यास एकूण शेतमजुरांच्या संख्येत २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये वाढ झाली आहे. त्यात मुख्य कृषीश्रमिक,

सीमांत कृषीश्रमिक, पुरुष कृषीश्रमिक व महिला कृषीश्रमिक या सर्वच पातळ्यांवर वाढ झालेली दिसून येते, आणि एकूण कृषीश्रमिकांशी असणारी टक्केवारी २००१ प्रमाणेच २०११ मध्ये जवळपास समान आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केल्यास (तक्ता क्र.२) २००१च्या तुलनेत २०११ मध्ये एकूण कृषीश्रमिकांची संख्या वाढली आहे आणि ही वाढ मुख्य शेतमजुरांमध्ये झालेल्या वाढीमुळे दिसून येत आहे. सीमांत कृषीश्रमिकांच्या संख्येत मात्र महाराष्ट्रात २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये घट झाली आहे. सीमांत स्त्री कृषीश्रमिकांची संख्या पाहिल्यास ती देशपातळीवर व राज्यपातळीवर २००१ मध्ये ही आणि २०११ मध्येही पुरुष सीमांत कृषी श्रमिकांपेक्षा जास्त आहे. याचाच अर्थ असा होतो की, पुरुष कृषी श्रमिकांपेक्षा स्त्री कृषी श्रमिकांमध्ये कामाच्या बाबतीत अनिश्चितता आढळते. स्त्री कृषीश्रमिकांना कृषीक्षेत्रात असणाऱ्या सहभागाचे वर्गीकरण एकूण दोन भागात करता येते.

१. कृषीतील उत्पादन प्रक्रियेमध्ये असणारा सहभाग-

   स्त्री कृषी श्रमिकांचा कृषी उत्पादन प्रक्रियेत महत्त्वाचा वाटा असतो. कारण पिकांचे उत्पादन घेण्यापासून धान्याची विक्री होईपर्यंत असणाऱ्या विविध प्रकारच्या कामांमध्ये स्त्रियांचा सहभाग मोलाचा असतो. स्त्री कृषी श्रमिक धान्य पेरणे, खुरपणे, पिकांची निगा राखणे, पाणी देणे, खत घालणे, धान्याची कापणी करणे, त्यांची साठवणूक करणे इ. कामे करतात.

२. कृषी संलग्न व्यवसायामध्ये असणारा सहभाग-

   ग्रामीण विकासात जितका कृषी क्षेत्राचा वाटा महत्त्वाचा आहे तेवढाच कृषी संलग्न व्यवसायाचाही वाटा महत्त्वाचा आहे. यात पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इ. चा समावेश होतो. या सर्व व्यवसायात स्त्रीयांचा सहभाग महत्त्वाचा आहे. जनावरांची काळजी घेणे, चारा आणणे इ. महत्त्वपूर्ण कामे स्त्रिया करताना दिसतात.

या दोन महत्त्वाच्या कामांव्यतिरिक्त स्त्री कृषी श्रमिकांचा आपल्या कुटुंबात गृहिणी व माता म्हणून असणारी भूमिका वठवावी लागते. घरातील कामातून मूल्यनिर्मिती करीता त्यांचे प्रत्यक्षपणे श्रम खर्ची पडतात. अशाप्रकारे स्त्री कृषीश्रमिक विविध प्रकारे ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असते.

**स्त्री कृषी श्रमिकांच्या समस्या:**

स्त्री कृषी श्रमिकांना ग्रामीण विकासात महत्त्वाचे स्थान असले तरी आजही त्यांना दुय्यम दर्जा दिला जातो. त्यामुळे त्यांना काही समस्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्या पुढीलप्रमाणे-

१. पुरुष कृषी श्रमिकांच्या तुलनेत स्त्री कृषी श्रमिकांना मिळणारा मोबदला ३०-५० टक्के कमी असतो.
२.घरातील किंवा समाजातील महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग अल्प असतो.
३. कृषी श्रमिकांसाठी असणाऱ्या शासकिय योजनांविषयी माहिती कमी असते.
४. कौशल्याचा अभाव असल्याने इतर क्षेत्रातील पर्यायी संधी कमी असतात.
५. स्त्री कृषी श्रमिकांची स्थिती सुधारण्यासाठी अनिश्चिततेला सामोरे जावे लागते.

स्त्री श्रमिकांची स्थिती सुधारण्याचे उपाय:

भारताला आर्थिक विकास साध्य करताना ग्रामीण विकास तसेच ग्रामीण स्त्रियांच्या विकासावरही भर देणे गरजेचे आहे. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत कृषीविकासाबरोबरच स्त्री कृषी श्रमिकांची स्थिती सुधारणे आवश्यक आहे. यासाठी सरकारने पुढीलप्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक आहे-

१. रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात. त्यासाठी ग्रामीण भागात महिला श्रमप्रधान लघु व कुटीरोद्योगांच्या विकासावर भर देण्यात यावा.
२. ग्रामीण भागातील स्त्री साक्षरतेचा दर पाहिल्यास तो कमी आहे. जर शिक्षणावर भर दिला गेला तर ग्रामीण स्त्रियांचा विकास होऊ शकेल.
३. कृषीक्षेत्राचा विकास करण्यावर जोर देणे गरजेचे आहे. त्यामुळे स्त्री कृषीश्रमिकांची स्थिती सुधारण्यास मदत होईल.
४. पुरुष कृषीश्रमिक व स्त्री कृषीश्रमिक यांच्या वेतनात जी विषमता आढळते. ती दूर करण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.
५. कृषीश्रमिकांची संघटना स्थापन करुन त्यांची नोंदणी करण्याची व्यवस्था केली गेली पाहिजे.

सारांशरुपाने, ग्रामीण विकासात स्त्री कृषीश्रमिकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे मात्र त्यांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते. जर ग्रामीण विकास साधावयाचा असेल तर ग्रामीण स्त्रियांच्या विकासाशिवाय पर्याय नाही. विशेष करुन कृषीश्रमिकांचा विकास आवश्यक आहे. त्यांची संख्या वाढते, मात्र त्याप्रमाणात त्यांना रोजगार प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे दारिद्र्य, बेकारी अशा समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. यासाठी उपाय म्हणून केवळ शासकीय पातळीवरच नव्हे तर सामाजिक पातळीवरही प्रयत्न होणे गरजेचे आहे. तरच भारताचा सर्वांगीण आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

## संदर्भसूची:


1. Parmar, H. Ramesh. *An empirical study of status of women agricultural labour in India* PARIPEX-Indian Journal of Research-July 2013.
2. SOFA Team and Cheryl Dose. *The role of women in agriculture ESA working paper, Agricultural Development,* Economics Division, The food and agriculture organization of United Nations-March 2011

३. जगताप डी.आर. व इतर. *भारतीय अर्थव्यवस्था: एक दृष्टीक्षेप* (२०११) प्रशांत पब्लिकेशन

४. पाटील जे.एस. व कदम बी.जे., *महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात ग्रामपंचायतीचे योगदान: पन्हाळा तालुक्याचा अभ्यास* (जुलै-सप्टेंबर २०११) अर्थसंवाद खंड.३५ अंक २ पृ.१६४.

५. पाटील सुभाष व नगराळे विरेंद्र, *ग्रामीण विकासात स्त्रियांचे स्थान* (डिसेंबर २००३) यशदा- यशमंथन, पुणे.

६. *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी* (२०१३-१४) अर्थ व सांख्यिकी संचलनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७. *महाराष्ट्र वार्षिकी,* द युनिक ॲकॅडमी, पुणे. २०१०.

# भारताच्या ग्रामीण विकासातील शेती क्षेत्राची वाटचाल

**मंजुश्री विलासराव बोबडे, पुणे,**
प्राचार्य,
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
औंध, ४११००७
भ्रमणध्वनी: ९०४९३८७९५०

भारत हा खेड्यांचा देश आहे, ६ लाखापेक्षा जास्त खेडी असणाऱ्या देशात २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी ६०% पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. २०१२-१३ मध्ये एकूण देशांतर्गत उत्पादनातील कृषिक्षेत्राचा वाटा १३.७ % पर्यंत कमी झालेला आहे. तरी अर्थव्यवस्थेतील कृषि क्षेत्राचे प्राधान्य (वर्चस्व) आजही आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाने शेतीविकासासाठी विविध धोरणात्मक उपाययोजना अंमलात आणल्या. परिणामी शेती- विकासाला आणि ग्रामीण भारतातील परिस्थितीत सकारात्मक बदल होण्यास निश्चितच मदत झाली. शेतीचा विकास तीन महत्वाच्या घटकांवर आधारित असतो. उत्पादन, विक्रीव्यवस्था आणि वित्तपुरवठा या अनुषंगाने शासनाने नियोजनकाळात शेतीतील तांत्रिक सुधारणा आणि संस्थात्मक सुधारणांवर भर दिला.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये गेल्या सहा दशकातील भारतीय कृषि क्षेत्राची वाटचाल, शेती विकासासाठी शासनाचे प्रयत्न आणि ग्रामीण समाजजीवनावर त्याचे झालेले चांगले वाईट परिणाम इ.चा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत शोधनिबंध पूर्णपणे दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. ह्यासाठी क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, वेबसाईट, सर्वेक्षण अहवाल इ.च्या आधारे माहिती संकलित केली आहे. भारतातील शेतीक्षेत्राची वाटचाल पुढील पाच टप्प्यांच्या आधारे विचारात घेता येईल.

१)पहिला टप्पा (१९५१ ते १९६१): या काळात नियोजनात उद्योगांना

केंद्रस्थानी ठेवून विकासात्मक धोरणाला प्राधान्य दिले. पहिल्या ३ पंचवार्षिक योजनांमध्ये उद्योगांना महत्व दिले त्यामानाने कृषिक्षेत्राकडे फारसे लक्ष नव्हते. अन्नधान्याची गरज अमेरिकेतून PL ४८० याद्वारे गहू आयात करुन भागवली. कृषिमधील पायाभूत सुविधा पाटबंधारे वीज यामध्ये काही प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली. अन्नधान्याबाबत परावलंबित्व हा प्रश्न गंभीर होता.

२) दुसरा टप्पा (१९६१ ते १९८०): १९६० च्या दशकातील अन्नधान्याचा तुटवडा, गहू आयातीमधील अडथळे यामुळे अन्नधान्य उत्पादनातील स्वयंपूर्णता हे नियोजनाचे मुख्य उद्दिष्ट होते. पाण्याच्या सोयी, सुपीक जमीन, पोषक हवामान असणाऱ्या प्रदेशात शेतीचे नवीन तंत्रज्ञान व उच्च पैदास असणारे बियाणे (HYV कार्यक्रम) वापरात आणले, पाणी, खते, वीज, कर्ज इ.साठी सवलती देण्यात आल्या. याचकाळात शेतमालासाठी हमी भाव निश्चिती, कृषि उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना (शेतकऱ्यांना खात्रीलायक बाजारपेठ) गरिबांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून आवश्यक वस्तू वाटपाची व्यवस्था, धान्य व्यापारावर निर्बंध, कृषि खर्चमूल्य आयोगाची स्थापना, भारतीय अन्नमहामंडळ आणि दुग्धविकास महामंडळाची स्थापना, कृषिक्षेत्रातील संशोधन व विकासासाठी गुंतवणूक इ.शासकीय उपाययोजनांमुळे शेतीविकासाला चालना मिळाली. एकूणच शेतीतील तांत्रिक सुधारणा (हरितक्रांती), संस्थात्मक सुधारणा (विक्री सोयी, वित्तपुरवठा सोयींचा विस्तार, जमीन सुधारणा इ.) मुळे अन्नधान्य उत्पादनाबाबत देश स्वयंपूर्ण झाला. दुध आणि साखर उत्पादनात नेत्रदीपक वाढ घडून आली.

३) तिसरा टप्पा (१९८१ ते १९९१): या काळात धान्य उत्पादनाबरोबरच तेलबिया आणि डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी तंत्रज्ञान मोहीम हा कार्यक्रम १९८६ पासून सुरु केला. परंतु या उत्पादनात भरीव वाढ करता आली नाही.

४) चौथा टप्पा (१९९२-२००४) :- नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रम स्वीकारला तसेच खाद्यतेलाबाबत आयात उदारीकरण धोरण ही या काळातील धोरणाची मुख्य उद्दिष्टये होती. १९९७ ते २००४ या काळात शेतीतील भांडवली गुंतवणूक कमी झाली (१९८१-८२ - ७१३० कोटी रु. १९९०-९१, ४९९२ कोटी रु. २०००-०१ - ४५२० कोटी रु.) यामुळे पाटबंधारे, ग्रामीण विद्युतीकरण, ग्रामीण रस्ते, बाजारपेठ इ. पायाभूत सुविधा विकासाला फटका बसला. १९९० च्या दशकात कृषिक्षेत्राच्या वाढीवर विपरित परिणाम झाला. कृषि क्षेत्रातील स्थूल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर १९८० च्या दशकात ३.५ टक्के होता तो १९९०

च्या दशकात ३.१ टक्केपर्यंत उतरला.

शेतीतील हरितक्रांतीमुळे अन्नधान्य टंचाईवर मात करता आली. परंतु याची नकारात्मक बाजू म्हणजे बीज, खते व धान्यावरील सबसीडीमध्ये झपाट्याने वाढ झाल्याने व हा खर्च वाढल्याने कृषिक्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वेगाने कमी झाली. शेतीव्यवसायाचा खर्च वाढला आणि शेतकऱ्यांना व्यावसायिक फायदा कमी होवू लागला. १९९७ पासून पेचप्रसंग निर्माण झाला. सदोष सार्वजनिक वितरण व्यवस्थेमुळे अन्नधान्य स्वयंपूर्णता असूनही धान्य परवडणाऱ्या किंमतीला सार्वत्रिकरित्या पोहचवणे हे उद्दिष्ट साध्य होवू शकले नाही, अन्नसुरक्षा धोक्यात आली.

५) पाचवा टप्पा (२००५ ते २०१३): कृषिमधील सार्वजानिक गुंतवणूक घसरण थांबवून शेती व्यवहार्य बनवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सुधारणा, धान्य उत्पादनात वाढ आणि बहुसंख्य समाजाला परवडणाऱ्या किंमतीला धान्य पुरवणे या समस्यांवर मार्ग शोधण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

**शेती क्षेत्राच्या विकासाचे प्रयत्न :**

राष्ट्रीय कृषि विकास योजना - ही योजना २००७ मध्ये सुरु करण्यात आली. या योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये कृषिक्षेत्रातील गुंतवणूक वाढवणाऱ्या व तिचा उपयोग करुन शेतकऱ्यांच्या गरजा भागवणाऱ्या राज्यांना प्रोत्साहनपर मदत देणे ही आहेत. त्यानुसार जिल्हा कृषि योजना तयार करण्यात आल्या परंतु त्यामध्ये लोकसहभाग कमी राहीला.

राष्ट्रीय अन्नसूरक्षा मोहीम - ११ व्या योजनेअखेर अन्नधान्य (तांदूळ, गहू, डाळी) उत्पादनात वाढ करण्याचे उदिष्ट ठरवले होते. त्यासाठी २००७ पासून अन्नसूरक्षा मोहीम देशातील निवडक जिल्ह्यांसाठी हा कार्यक्रम राबवला आणि तो यशस्वी झाल्याचे अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रीयअन्नसूरक्षा कायदा (NFSA) National Food Security Act - या कायद्याचा मुख्य उद्देश गरिबांना परवडणाऱ्या किंमतीत धान्य पुरवणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना दरमहा ३५ किलो धान्य पुरवण्याचे उद्दिष्ट आहे. ७५ टक्के ग्रामीण व २५ टक्के शहरी भागातील लोकसंख्या यात समाविष्ट असून माता, मुले, निराधार व बेघरांना मदत करण्याची तरतूद या कायद्यात केली आहे. अर्थात या कार्यक्रमाची अंमलबजावणी व यश हे अन्नधान्याचे मुबलक उत्पादन सरकारकडून धान्यखरेदी, बाजारपेठेतील किंमतीचा संभाव्य परिणाम, आयातीची लवचिकता, अनुदान खर्चाची पातळी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता इ. घटकांवर अवलंबून असेल.

**शेती क्षेत्रावरील परिणाम:**

योजना काळातील शेतीविकास योजनांमुळे ग्रामीण भागाच्या विकासाला काही प्रमाणात गती मिळाली. शेतकरी, शेतमजूर, कारागीर इ.ना सरकारच्या विशिष्ट गटासाठीचे कार्यक्रम (SFAL) आणि विशिष्ट भागासाठीच्या कार्यक्रमामुळे रोजगार संधी उपलब्ध झाल्या. काही प्रमाणात आर्थिक दुर्बलता कमी होण्यास मदत झाली.

भारतातील बहुसंख्य ग्रामीण जनतेचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ग्रामीण विकासामध्ये शेतीचा विकास अभिप्रेत आहे. सध्या भारताचे कृषिक्षेत्र आणि शेतकरी अनेक प्रकारे अडचणीत आहेत. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीपुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यात प्रामुख्याने नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान (अवकाळी पाऊस, दुष्काळ, भूकंप, गारपीट इ.) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व आत्महत्या, शेती क्षेत्रातील घटती सार्वजनिक गुंतवणूक, शेतमजुरांचा प्रश्न, वीजेच्या भारनियमनाचा प्रश्न, विक्रीसोयींची कमतरता, जमिन अधिग्रहणाचे प्रश्न इत्यादीचा समावेश होतो. यामुळे अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांसाठी शेतीव्यवसाय अकिफायतशीर ठरतो आहे.

१. हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्य उत्पादनाबाबत स्वयंपूर्ण झाला.
२. पाणीपुरवठा सोयींच्या विस्तारामुळे शेती उत्पादकतेत वाढ आणि नवतंत्रज्ञान वापरामुळे विविध शेतमाल उत्पादनात वाढ झाली.
३. नियंत्रित बाजारपेठांची स्थापना आधारभूत किंमत धोरण, शेतमाल सहकारी खरेदी-विक्री, गोदाम उभारणी कार्यक्रम, सार्वजनिक वितरण (नाफेड) व्यवस्था इ.मुळे शेतकऱ्यांचे नुकसान कमी होवून त्यांचे उत्पन्न वाढण्यात व राहणीमान उंचावण्यास मदत झाली.
४. कृषि-वित्तपुरवठा सोयींचा विस्तार यासाठी सहकारी बँकांची स्थापना, अग्रणी बँक, प्रादेशिक ग्रामीण बँका, नाबार्ड इ.मुळे शेतीसाठी अल्प, मध्यम, दीर्घ मुदती कर्जे उपलब्धता यामुळे शेतीतील अल्पकालीन व दीर्घकालीन सुधारणा शक्य झाल्या.
५. कृषिपूरक व्यवसायांसाठी शासनाने ज्या उपाययोजना केल्या (पशुपालन, दुग्धव्यवसाय, रेशीम व मध उत्पादन, मासेमारी, फलोत्पादन, फुल उत्पादन इ.) त्यामुळे ग्रामीण लोकांना रोजगार संधी आणि उत्पन्नाचे साधन मिळाले. अर्थात व्यावसायिक अडचणींमुळे या योजना पुरेशा यशस्वी झाल्या नाहीत.
६. जागतिकीकरणानंतर भारताने स्वीकारलेल्या (खाऊजा) नवीन आर्थिक धोरणांमुळे शेतीक्षेत्राच्या विकासाला नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. परंतु काही आव्हाने निर्माण झाली आहेत. उदा- करारशेती, शेतीसाठीच्या अनुदानांवरील कपात, आदानांच्या वाढत्या किंमती, शेतमाल आयातीबाबत उदारीकरण धोरण इत्यादीमुळे शेतीव्यवसाय शेतकऱ्यांसाठी अकिफायतशिर ठरु लागला आहे.

एकूण देशाच्या आर्थिक विकासामध्ये ग्रामीण भारतातील शेतीचा शाश्वत व चिरंतन विकास घडवून आणण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी उपाययोजना सूचवल्या आहेत:

**शेती क्षेत्र विकासासाठी उपाययोजना :**

१) ग्रामीण औद्योगिकरण व ग्रामीण मजुरांचे कौशल्य विकसित करुन शेतीतील छुपी बेकारी कमी करता येईल. कृषिउत्पादकता वाढवण्यासाठी धोरणात्मक सुधारणा करण्याची गरज आहे.
२) गेल्या दशकात कृषि विकास धोरणात

कृषिबाजार सुधारणा आणि पायाभूत सुविधांचा विचार झालेला नाही. परंतु कृषिमाल विक्रीसाठी नवीन तंत्रज्ञान आणि ग्रामीण पायाभूत सुविधांचा विस्तार (वीज, पाणी, रस्ते, वाहतुक इ.) यामध्ये गुंतवणूक वाढवल्यास कृषिक्षेत्रात रोजगार संधींची मोठ्या प्रमाणात निर्मिती होऊन ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी करणे तसेच ग्रामीण बेरोजगारी, गरिबी इत्यादी समस्यांचे निराकरण शक्य होईल.

३) शाश्वत शेतीविकासातून ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी विविधांगी आणि व्यापक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक असेल. उदा.- कोरडवाहू शेतीतंत्र विकसित करणे, गावांच्या भौगोलिक अभ्यासातून पिकांचा आकृतीबंध निश्चित करणे, जलसमृध्दीतून गावसमृध्दीकडे वाटचाल इत्यादी सूक्ष्मपातळीवरील योजना बाबत गावातील सेवाभावी नेतृत्व व गावकऱ्यांचे सहकार्य निश्चितच उपकारक ठरेल.

४) कृषिपूरक व्यवसायांना पाठबळ दिल्यास ग्रामीण विकासाला मदत होईल. ग्रामीण विकासाबाबत केवळ शासन नव्हे तर स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, युवक, महिला, सामाजिक संस्था इत्यादी सर्वांचा सक्रीय सहभाग असायला पाहिजे.

**संदर्भ सूची:**


१) डॉ.निर्मल भालेराव, श्री. मु. देसाई, *ग्रामीण अर्थशास्त्र*, निराली प्रकाशन, पुणे.

२) एन्. एल्. चव्हाण, *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रशांत प्रकाशन, जळगाव.

३) डॉ. भालेराव, डॉ. देसाई, *कृषि अर्थशास्त्र व भारतातील शेती व्यवसाय*, निराली प्रकाशन, पुणे.

४) डॉ. विनायक देशपांडे, डॉ. श्रीधर देशपांडे, *भारतीय अर्थव्यवस्था*, हिमालय प्रकाशन.

५) महाराष्ट्र पाहणी अहवाल - २०११-१२

६) विजय कवीमंडन, *कृषि अर्थशास्त्राची मूलतत्त्वे*

७) *योजना* - जुलै २०१४ - अंक -११

८) *अर्थसंवाद*, जाने-मार्च-२०१३, खंड ३६ अंक ४; जूलै-सप्टे. - २०१३ - खंड ३७ अंक २.

९) *en.m.wikipedia.org/wiki/minist.* ministry of Rural Development (India)

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे रोजगार वाढीतील योगदान

**दिलीप खंडेराव पाटील**, देऊर,
प्राचार्य, प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय,
ता.कोरेगांव, जि.सातारा.
भ्रमणध्वनी : ९८२२२७५४४१
ई-मेल : drdilipkpatil@gmail.com

**मोहन गोविंद सदामते**, कुंडल,
क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय,
ता.पलूस,जि.सांगली.
भ्रमणध्वनी : ८०५५४१५५३७
ई-मेल : sadamatemg@gmail.com

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी (मनरेगा)कायद्याचा मसूदा ५ सप्टेंबर २००५ रोजी मंजूर करण्यात आला. ग्रामीण भागातील मजूरांना वर्षातील किमान १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देणे हा या कायद्याचा मुख्य हेतू होता. सुरूवातीला भारतातील २७ राज्यामधील २०० जिल्ह्यामध्ये मनरेगा ही योजना फेब्रुवारी २००६ पासून राबविण्यात आली. या योजनेत ग्रामीण भागातील दूष्काळी प्रदेश,अवर्षण प्रवण क्षेत्र, गरीब प्रदेश अशा मागास भागातील मजूरांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या हेतूने विकास प्रकल्प हाती घेतले जातात. त्याला परवानगी देण्यात येते त्यामुळे ग्रामीण भागाचा शाश्वत विकास होऊन व लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पंचायतराज निर्माण होण्यास या योजनेमुळे मदत झाली आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात भारतातील ४.१६ कोटी कुटुंबातील ७० लाख मजूरांना १४१ कोटी दिवस एवढा रोजगार देण्यात आला असून त्यासाठी २५ हजार कोटी रु. इतका खर्च करण्यात आला आहे.

प्रस्तुत निबंधामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची

भारतातील रोजगार वाढीतील योगदान आणि या योजनेचे फलित याची चर्चा करण्यात आली आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा चा मसूदा ५ सप्टेंबर २००५ रोजी जाहीर केला. ग्रामीण भागातील अकूशल मजूरांना वर्षातील किमान १०० दिवस रोजगाराची हमी देणे हा उद्देश होता. सुरूवातीला ही योजना भारतातील २०० जिल्ह्यांमध्ये फेब्रुवारी २००६ पासून राबविण्यात आली. सन २००६-०७ ते सन २०११-१२ पर्यंत रुपये ६५ वरून रु.११५ एवढा वेतन दर झाला आहे. महिलांचा या योजनेत सुरूवातीस ३३% एवढा सहभाग होता. नंतर तो ४८ % एवढा महिलांचा सहभाग वाढलेला आहे. सन २०१२-१३ पर्यंत १.१६ कोटी कुटुंबातील ७०,००० लाख कामगारांना १४१ कोटी श्रमदिवस एवढा रोजगार देण्यात आला आहे. या रोजगारासाठी एकूण रु.२५,००० कोटी इतका खर्च आला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना कायदा हा पहिला एक अभिनव उत्तम योजना आहे की ज्यामुळे ग्रामीण भागातील श्रमिकांना रोजगाराची हमी देण्यात आलेली आहे. या योजनेतून गरीबी, दूष्काळ, अवर्षण असलेल्या भागामध्ये कामास परवानगी देण्यात येते. त्यामुळे ग्रामीण भागातील शाश्वत विकासाला चालना मिळत आहे. तसेच या योजनेअंतर्गत लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पंचायतराज निर्माण होण्यास मदत झाली आहे.

सन २००६ पासून १,२९,००० कोटी रुपये श्रमिकाच्या वेतनासाठी ग्रामीण कुटुंबासाठी खर्च केले आहेत. १३४८ कोटी श्रमदिवस रोजगार निर्माण झाला आहे. सन २००८ पासून सरासरी प्रतिवर्षी ५ कोटी कुटुंबाना रोजगार पूरवला आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचा ५१% इतका सहभाग आहे. एकूण श्रमदिवसामध्ये ४७% अनुसूचित स्त्रियांचा सहभाग आहे. या योजनेमुळे स्त्रियांना रोजगाराची हमी मिळाल्याने सामाजिक विकासात भर पडली आहे. योजनेच्या सुरूवातीपासून १४६ लाख कामे या योजनेअंतर्गत करण्यात आलेले आहेत. सरासरी वेतनाबाबत भारतातील राज्यामध्ये विविधता दिसून येते. या योजनेअंतर्गत काही राज्यामध्ये उदा. बिहार १२२ रु. किमान वेतन तर हरियानामध्ये १९१ रु. किमान वेतन दिले जाते.

**महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायद्याची वैशिष्ट्ये:**

१) अधिकारभूत संरचना - ग्रामीण कुटुंबातील अकुशल प्रौढ मजूरांना रोजगाराचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे रोजगाराची हमी असणारा अधिकार या कायद्याने प्राप्त झाला आहे.

२) वेळेबाबतची हमी - बेकारांना किमान १५ दिवसांचा रोजगार (वेतन) हमी प्राप्त होते. प्रत्येक कुटुंबाला १०० दिवसांचा रोजगार पूरविण्यात येतो.

३) श्रमप्रधान कामे - ६० : ४० वेतन आणि साहित्य प्रमाण ग्रामपंचायत कंत्राटदार यांच्या कडून कामाला परवाना दिला जातो.

४) नियोजनाचे विकेंद्रीकरण -

अ) निर्धारित कामे किमान ५० % कामे ही ग्रामपंचायतीने ठरवून दिलेले असतात.

ब) नियोजन आखणी अंमलबजावणी व

नियंत्रणामध्ये प्राथमिक समितीची महत्वाची भूमिका असते.

५) कामाच्या ठिकाणी सुविधा - कामाच्या ठिकाणी पाण्याची सुविधा, प्रथमोपचार, निवारा शेड इ. सुविधा पुरविण्यात येतात.

६) महिला सक्षमीकरण - एक तृतीयांश महिला लाभधारक येतात.

७) पारदर्शकता - सूचनाफलकावरती माहिती आणि सामजिक परिक्षण करण्यात येते.

८) निधी - अकुशल वेतनावर केलेल्या निर्धारित निधीपैकी ७५% अंशत कुशलतेसाठी आणि साहित्यासाठी केंद्रसरकार कडून तर २५% राज्याकडून निधी देण्यात येतो.

**मनरेगाचे रोजगार वाढीतील योगदान:**

सन २००६-०७ या वर्षामध्ये राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे अंतर्गत भारतात १.७० कोटी कुटुंबांनी रोजगाराची मागणी केली होती. या वर्षात १.६५ कोटी कुटुंबांना रोजगार देण्यात आला. त्यासाठी केंद्र सरकारकडून ७३८२ कोटी रूपये तर राज्यसरकारकडून ५९८.६५ असे एकूण ७९८०.७३ कोटी रूपये निधी देण्यात आला होता. जलसंवर्धन,सूक्ष्म जलसिंचन, दुष्काळ निवारण, जमीन विकास, पूरनियंत्रण, ग्रामीण दळणवळण, अनुसूचित जाती जमातीसाठी सिंचन सुविधा इ.

**तक्ता क्र.१: मनरेगा आणि रोजगार वाढ**

| वर्ष | रोजगार पुरविलेली कुटुंबे | अनुसूचित जाती | रोजगार निर्मित जमाती (लाख) | श्रमदिवस महिला | इतर |
|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | १७८८१११२ | १५४.१८ | ६३.२ | २६४.८५ | २६५.६४ |
| २००७-०८ | २७२१६३६३ | २५८९.११ | २१४०.३ | ४१५१.८८ | ४०३३.३१ |
| २००८-०९ | ३५७१४४७ | १६४.१८ | १०३५.१८ | ६५७.४५ | --- |
| २००९-१० | ३४४१७१२ | १२२.२७ | ८५०.३४ | ५५७.८८ | ४४३.७४ |
| २०१०-११ | --- | --- | --- | --- | --- |
| २०११-१२ | ५०४२४४७२ | ४७६१.६१ | ३९५९.०५ | १०३८०.७७ | १२९०५.६१ |
| २०१२-१३ | ४१५७००२० | ३१४२.०७ | २२१४.२२ | ७४७३.८५ | ८७०९.७६ |

*Ref. Annual report of Ministry of Rural Development, Government of India 2006-07 to 2012-13.*

घटकावर खर्च करण्यात आला होता.

सन २००६-०७ या वर्षात ६२.१ कोटी व्यक्तीगत श्रमदिवस रोजगार पूरविण्यात आला त्यामध्ये अनुसूचित जातीसाठी २५.१३% म्हणजेच १५.८८ कोटी श्रमदिवस,अनुसूचित जमातीसाठी ३७.३% म्हणजेच २३.४६ कोटी श्रमदिवस आणि महिलांसाठी ३९.१३% म्हणजेच २४.२६ कोटी श्रमदिवस रोजगार पुरविण्यात आला होता.

मनरेगा योजनेमध्ये सन २०१२-१३ या वर्षाअखेरीपर्यंत ४.१६ कोटी कुटुंबांना १४१ श्रमदिवस रोजगार पूरविण्यात आला आहे. यामध्ये ३१४२.७ लाख श्रमदिवस अनुसूचित जातीसाठी म्हणजेच २२.३४% अनुसूचित जातीमधील कुटुंबे सहभागी होतील तर २२१४.२२ लाख श्रमदिवस अनुसूचित जमातीसाठी म्हणजेच १५.७४% एवढा रोजगार देण्यात आला. तसेच महिलांसाठी ७४७३.८५ लाख श्रमदिवस म्हणजेच ५३.१३% रोजगार पुरविण्यात आला आहे. मनरेगाचे रोजगार वाढीतील योगदान तक्ता क्र.१ मध्ये दर्शविले आहे.

**सरकारचे परिणामकारक अंमलबजावणी करिता उपाय:**

केंद्रसरकारने भारतात मनरेगा अधिक परिणामकारक होण्यासाठी अलिकडील कालखंडात नव्याने उपाययोजना केलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे:

अ) पारदर्शकता व लोकजबाबदारी वाढवणे:

१) देशातील ९३% जिल्ह्यांनी राज्यसरकारला सामाजिक अंकेक्षण रिपोर्ट सादर केलेले आहेत. २.४१ लाख सामाजिक अंकेक्षण अहवाल मनरेगाच्या संकेतस्थळावर ठेवलेले आहेत. सन २००९-१० पर्यंत संकेत स्थळावरून ४५४२८ लाख कागदपत्रे सामाजिक अंकेक्षणासंबंधीची तपासली आहेत.

२) नवीन योजनेनुसार प्रतिष्ठित नागरिकांच्याकडून नियंत्रण केले जाते. ६१ उच्च दर्जाचे प्रतिष्ठित नागरिक नियंत्रणासाठी कार्यरत आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी मनरेगाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रथम प्रतिक्रिया घेतल्या जातात.

३) प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रशासकीय यंत्रणेमध्ये लोकआयुक्त नेमण्यात आला आहे.

ब) प्रभावी प्रशासन आणि वित्तीय व्यवस्थापन

१) मजूर अर्थसंकल्प-कलम १४(६) नुसार मनरेगाच्या जिल्हा कार्यक्रमासाठी समन्वयक मंजूर अर्थसंकल्प डिसेंबर महिन्यात पुढील आर्थिक वर्षासाठीचे तयार करतो.

२) राज्य रोजगार हमी निधी - नरेगाच्या कलम २१(१) नुसार राज्यसरकार रोजगार हमी निधी निर्माण करते राज्य सरकारचा निधी हा लवचिक असतो. राज्यसरकार निधीचे व्यवस्थापन आणि अंमलबजावणी करण्याचे काम करते. ११ राज्यांनी मनरेगासाठी निधी उभा केला आहे. राजस्थान, आंध्र प्रदेश, कर्नाटक, हिमाचल प्रदेश,ओरिसा इ.चा समावेश होतो.

मनरेगाचा आंतरक्षेत्रीय संबंधीत दृष्टीकोन आहे की, ज्यामध्ये टिकाऊ मालमत्ता निर्माण करणे. प्राणी जीवनाची सुरक्षितता सुधारणे सोई सुविधा जास्तीत जास्त लवचिक करणे या संबंधी कामगारांची निवड करून राज्य आणि सामान्य उद्दिष्टीत गटाच्या पूर्ततेसाठी मनरेगाच्या सहाय्याने विकास कार्यक्रम हाती

घेऊन त्यासंबंधीची मार्गदर्शक सुचना विविध योजना विशेष कार्यक्रम केंद्र सरकारने विकसित केले आहेत. त्यामध्ये इंडियन कौन्सील ऑफ ॲग्रीकल्चर रिसर्च (IARC) व नॅशनल अफॉरेस्टेशन प्रोग्राम आणि वन व पर्यावरण मंत्रालयाचे इतर कार्यक्रम पाणी संसाधन मंत्रालयाच्या योजना, ग्रामविकास मंत्रालयाच्या योजना, कृषी आणि मत्स्य मंत्रालयाच्या योजना इत्यादी योजना केंद्रीकृत करून एक पथदर्शी प्रकल्प देशात राबविण्यात आला आहे. सध्या ११५ जिल्ह्यात २३ राज्यामध्ये विविध मंत्रालयामार्फत मनरेगाची अंमलबजावणी होत आहे.

फलनिष्पत्ती:

१) रोजगार निर्मिती:

सन २०१२-१३ या वर्षामध्ये ४.१६ कोटी कुटुंबाना रोजगार पूरविला आणि १४१ कोटी श्रमदिवसाचा रोजगाराची हमी देण्यात आली.

२) सीमान्त आणि गरीबाचा वाढता सहभाग:

नैसर्गिक स्वत: उद्दिष्टात घटकांचा या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त सहभाग होता. गरीब अनुसूचित जाती आणि अनुसुचित जमाती, सिमान्त महिलांचा ५३% सहभाग होता.

३) नैसर्गिक स्त्रोत आधारित मजबूती:

मनरेगा अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये ७० लाख कामगार कार्यरत होते. ज्यापैकी ६०% जलसंवर्धन व १२% सिंचन सुविधेवरती तरतुद १७% अनुसूचित जाती जमाती दारिद्र्य रेषेखालील ८% ग्रामीण दळण वळणासाठी व जमिन विकास यासाठी मनुष्यबळ कार्यरत होते.

४) वित्तीय समावेशन:

वैश्विकरण करण्याच्या दृष्टीकोनातून कामगारांचे वेतन देयक प्रणाली संस्थात्मक खाती उघडून करण्यात आलेली आहे. वेतनाचे वितरण करण्यासाठी बँकिंग प्रणालीनुसार बँकखाते उघडून पोस्ट ऑफिसद्वारे वेतन अदा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. त्यामार्फत ८.५४ कोटी बँक आणि पोस्ट ऑफिसमध्ये श्रमिकांच्या खातेदारांची नोंद झाली आहे.

पश्चिम बंगाल, तमिळनाडू, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, पंजाब व गुजरात केंद्रांचा मनरेगासाठी मिळणारा निधी प्रत्यक्षपणे राज्य सरकारच्या निधीमध्ये जमा केला जातो.

५) मजबूत प्रशासकीय साहाय्यभूत योजना:

एकूण निधीच्या ९% एवढा निधी राज्यांना अर्थ संकल्पात प्रशासकीय कार्यासाठी वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या शिफारशीनुसार ग्रामीण रोजगार सेवक, सहाय्यक प्रत्येक पंचायतीला एक तांत्रिक सहाय्यक संगणक सहाय्यक, प्रत्येक कार्यक्रमासाठी एक पूर्णवेळ कार्यक्रम अधिकारी नेमण्याच्या सूचना दिल्या आहेत.

६) मार्गदर्शक पुढाकार:

चालू कार्यक्रमाच्या अमलबजावणीसाठी आणि शाश्वत विकास यासाठी केंद्र सरकार कडून मार्गदर्शक पुढाकार घेतलेले प्रकल्प प्रशिक्षण आणि कौशल्य मनरेगाच्या कामगारांना दाखविले जातात. मूलभूत साक्षरता, संगणक, वित्तीय साक्षरता आणि

वेतन सुविधा, व्यवसाय कौशल्य आधारित कार्यक्रम मार्गदर्शनपर पुढाकार घेतला जातो.

७) केंद्रीकरण:

मनरेगाची गरज टिकाऊ मालमत्ता प्राणीजीवनाची सुरक्षितता सुविधा व लवचिकता यांच्याविषयी कामगारांची परिस्थिती ओळखून आंतरक्षेत्रीय निर्धारित गटामध्ये विकसित करण्यासाठी कार्यक्रम केंद्रीकृत करण्यात आला.

**सारांश:**

भारतामध्ये मनरेगाच्या योजनेमुळे रोजगार निर्मितीमध्ये वाढ घडून आली आहे व ग्रामीण भागातील अनुसुचित जाती जमातीचे मनरेगामुळे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. तसेच ग्रामीण भागाचा कायापालट करण्यात मनरेगा ही प्रभावशील योजना ठरली आहे.

**संदर्भ सूची:**

1) Ruddar Datt & K.P.M.Sundharam *Indian Economy* Edition 2010.
2) *Annual Report of Ministry of Rural Development*, Government of India 2006 -07 to 2012-13.

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### उपक्रम थोडक्यात

### पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानमाला

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत धुळे येथील सनदी लेखापाल प्रकाश पाठक यांचे *नीति आयोग स्वरूप आणि महत्त्व* या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हे व्याख्यान २४ एप्रिल २०१५ रोजी सायंकाळी धुळे शहरातील मा. ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालयात संपन्न झाले. प्रमुख वक्ते मा.प्रकाश पाठक यांनी या प्रसंगी योजना आयोग आणि नीति आयोग यांच्यातील साम्य आणि भेद यासह विविध पैलूंचा आढावा घेतला. या कार्यक्रमास परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.श्रीराम जोशी, कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले, अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम, मा.ध.पालेशा वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.पी.छाजेड, कार्यकारी मंडळ सदस्य डॉ.अशोक खाचणे, प्राचार्य डॉ.दिलीप पाटील, अर्थसंवाद सल्लागार मंडळ सदस्य प्रा.अरुण पिसे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विलास चव्हाण यांनी केले. यशस्वितेसाठी मा. ध. पालेशा वाणिज्य महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नविन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम

**शिवाजी भ. यादव, औरंगाबाद,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
शिवछत्रपती कला महाविद्यालय, पाचोड, ता.पैठण.
भ्रमणध्वनी : ९४२१३१४६९८.

दुसऱ्या जागतिक महायुध्दाने सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेचा विकास कुंठित झाला होता. प्रत्येक देशाला यातून बाहेर पडावे असे वाटत होते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार झाल्याशिवाय कोणत्याच देशाच्या विकासाला चालना मिळणार नाही. जगातील सर्व देशांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून ३० ऑक्टोबर १९४७ रोजी जिनिव्हा येथे २३ देशांनी प्रशुल्क आणि व्यापारावरील सर्वसामान्य करार म्हणजे गॅट संमत केला. या करारात भारताचाही समावेश होता. पूर्वीपासून भारत ग्रामीण भागाचा देश म्हणून जगात ओळखला जातो. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासाशिवाय देशाला विकासाचे उद्दिष्ट शक्य नाही म्हणून भारताने ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाकडे नेहमीच जास्तीचे लक्ष दिलेले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर एक टक्क्यांपेक्षा कमी होता. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे, असे पंडित जवाहरलाल नेहरुंना वाटत होते. भारताला अनेक आव्हाने पेलण्यासाठी व जलद गतीने विकास व्हावा म्हणून १५ मार्च १९५० रोजी नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. आज देशाने नियोजन मंडळाच्या माध्यमातून ११ पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या असल्या तरी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचे लक्ष्य पूर्ण करता आलेले नाही. २०११ च्या जनगणनेनुसार देशाच्या १२१ कोटी लोकसंख्येपैकी फक्त जवळपास ४९ कोटी लोक श्रमाचे काम करतात तर ग्रामीण भागात एकूण लोकसंख्येपैकी ८३ कोटी पेक्षा जास्त म्हणजे ६८.८४ टक्के लोक राहतात. पर्यायी ग्रामीण अर्थव्यवस्थेवर नविन आर्थिक धोरणाचे अनेक परिणाम झालेले आहेत.

१९९१ च्या नविन आर्थिक धोरणाचा जन्म देशात उद्‌भवलेल्या आर्थिक संकटातून झालेला आहे. नविन आर्थिक धोरणाने भारतीय अर्थव्यवस्थेची सांगड जागतिक अर्थकारणाशी घातली गेली. देशात आर्थिक संकटे अचानक उद्‌भवलेली नव्हती, तर ते अनेक वर्षाच्या बेशिस्तीचा परिणाम होते. १९८० नंतर भारत

सरकारची वित्तीय तूट व महसूली तूट मोठ्या प्रमाणात वाढली. १९७५-७६ मध्ये समग्र राजकोषीय तूट जीडीपीच्या ४.१ टक्के होती. ती १९९०-९१ मध्ये ८.४ टक्के इतकी वाढली. यामुळे देशात कर्जाचा डोंगर वाढायला सुरुवात झाली. १९८०-८१ मध्ये देशांतर्गत कर्जाचे प्रमाण जीडीपीच्या ३५ टक्के होते, ते १९९०-९१ मध्ये ५३ टक्के इतके वाढले. १९८०-८१ मध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारातील चालू खात्याची तूट जीडीपीच्या १.३५ टक्के होती. ती १९९०-९१ मध्ये ३.७ टक्क्यांपर्यंत वाढली. यातून देशाला विदेशी कर्जाच्या प्रमाणात वाढ करावी लागली. विदेशी कर्जाचे प्रमाण जीडीपीच्या १९८०-८१ मध्ये १२ टक्के होते. ते १९९०-९१ मध्ये २३ टक्क्यांनी वाढले. विदेशी कर्जाचे व्याज, युध्द आणि आखाती संघर्षाचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला. विदेशी गंगाजळी १५ दिवसाच्या आयातीला पुरेल इतकीच राहिली. या कोंडीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग होता तो म्हणजे *आंतरराष्ट्रीय नाणेनिधी* (IMF) किंवा जागतिक बँक यांच्याकडून कर्ज घेतलेल्या कर्जाने देशाला नविन आर्थिक धोरणाचा म्हणजेच उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (LPG) यांचा स्वीकार करावा लागला. १९९१ च्या नविन आर्थिक धोरणाचे गंभीर परिणाम देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झाल्याचे दिसतात. नविन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम झाले याचा शोध या अभ्यासात घेण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) नविन आर्थिक धोरणापूर्वीची देशातील स्थिती अभ्यासणे.

२) नविन आर्थिक धोरणानंतरची स्थिती अभ्यासणे.

३) नविन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पध्दती:**

देशातील बहुसंख्य जनता आजही ग्रामीण भागात राहते. देशात शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाचे प्रमाण दुप्पटीपेक्षा जास्त आहे. यामुळे नविन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर कोणते परिणाम झाले याची माहिती व्दितीय स्त्रोतांतून घेतलेली आहे. यात विविध संदर्भ पुस्तके, शासनाचे अहवाल, सांख्यिकीय कार्यालयाचा अहवाल, मासिके, इंटरनेट व वृत्तमानपत्रे इ.चा आधार घेवून शोध विषयाच्या अनुषंगाने विश्लेषण केलेले आहे.

**नविन आर्थिक धोरणापूर्वीची स्थिती:**

जगातील जपान, दक्षिण कोरिया, मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया, थायलँड इत्यादी देशांनी जागतिकीकरणाशी संलग्न अर्थव्यवस्था भारतापूर्वी जोडल्या होत्या. या देशातील विकासाचे प्रारुप चिरस्थायी उच्च आर्थिक वृध्दीदर साध्य करण्यात आणि लोकांचे राहणीमान वेगाने घडवून आणण्यात यशस्वी झाले होते. १९८० पासून देशाची वित्तीय तूट मोठ्या प्रमाणात वाढली होती. भाववाढीचा दर १२ टक्क्यांपेक्षा जास्त झाला होता. देशाकडे परकीय चलन २.२ बिलियन अमेरिकन डॉलर्स हे १५ दिवस आयातीला पुरेल एवढेच होते. यामुळे देशाला अंतर्गत व परकीय कर्ज मोठ्या प्रमाणात द्यावे लागले. याचा परिणाम म्हणून देशाची ग्रामीण अर्थव्यवस्था उध्वस्थ होण्याकडे वाटचाल सुरु झाली होती. देशापुढे संकटामागून संकटे उभे होते.

## नविन आर्थिक धोरणानंतरची स्थिती:

देशाचा प्रतिकूल व्यवहारतोल, परकीय व देशांतर्गत वाढते कर्ज, आखाती युध्दामुळे (Gulf War) पेट्रोलजन्य पदार्थांच्या वाढत्या किंमती, तुटपुंजे २.२ बिलियन अमेरिकन डॉलर्स परकीय चलन, देशात भाववाढीचा दर उच्च पातळीला, राजकीय अस्थिरता, अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दरातील अनिश्चितता व नैसर्गिक संकटे या आव्हानामुळे १९९१ मध्ये अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंह यांनी नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करुन देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थकारणाशी जोडली. यातून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाकडे (LPG) देशाच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरु झाली.

उदारीकरण याचा सर्वसाधारण अर्थ देशात कोणत्याही उद्योजकांना गुंतवणूक करण्यास शासनाच्या परवानगीची गरज पडणार नाही. तर व्ही.जे. बामोल यांच्या मते, *अर्थव्यवस्थेतील कोणत्याही क्षेत्रास उत्पादन, गुंतवणूक व वितरण यासाठी प्रवेश करण्यास व कोणत्याही उद्योगांना उत्पादनातून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य म्हणजे उदारीकरण होय.* उदारीकरणाची उद्योगांना परवाना पध्दतीतून सूट, किंमतीवरील शासनाचे नियंत्रण कमी करणे, नव्या उद्योगांना देशात परवानगी देणे, विदेशी कंपन्या बाबतचे निर्बंध कमी करणे, वित्तीय क्षेत्रात उदारीकरण आणणे व विनिमय दरात उदारता आणणे ही उद्दिष्टे होती.

खासगीकरणाचा सर्वसाधारणत: अर्थ नविन आर्थिक धोरण असा घेतला जातो. देशातील सार्वजनिक उद्योगाचे व्यक्ती व संस्था यांच्याकडे हस्तांतरण करणे, तर डी.आर.पेंडसे यांच्या मते, *आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे म्हणजे खासगीकरण.* सार्व. मालकी हक्काचे खासगीकरण करणे, संघटनात्मक उपाय योजना व कार्यकारीतून खासगीकरण ही उद्दिष्टे होती.

जागतिकीकरण हा आर्थिक सुधारणेचा तिसरा महत्वाचा भाग आहे. जागतिकीकरण म्हणजे देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडणे होय. जागतिकीकरणाची आंतरराष्ट्रीय खुल्या व्यापाराला चालना देणे, भेदभावविरहीत व्यापार करणे, जकातीचे निर्बंध कमी करणे, बहुराष्ट्रीय कंपन्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे, निर्यातीतील प्रोत्साहन देणारे धोरण बंद करणे, आंतरराष्ट्रीय व्यापार जागतिक व्यापार संघटने प्रमाणे करणे, बहुराष्ट्रीय कंपन्याच्या प्रवेशाला प्रोत्साहन देणे ही उद्दीष्टे होती.

## आर्थिक धोरणाचे अर्थव्यवस्थेतील परिणाम:

देशात १९९१ पूर्वी निर्माण झालेल्या आर्थिक संकटातून नविन आर्थिक धोरणाचा उदय झाला. नविन आर्थिक धोरणाने उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरणाला तत्वत: मान्यता दिली. नविन आर्थिक धोरणाचे देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अनुकूल व प्रतिकूल परिणाम झालेले आहेत, ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) शेती आदानाच्या खर्चात वाढ :

भारत हा कृषी प्रधान देश आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. शेती व्यवसायासाठी सुधारित बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, आधुनिक अवजारे, सिंचन व इतर हे शेतामधील खर्चाचे घटक असून नवीन आर्थिक धोरणाने खासगी क्षेत्राची मक्तेदारी निर्माण केल्याने शेती आदानाच्या प्रचंड किंमती वाढल्या व शेतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे ग्रामीण

भागातील शेतकरी वर्ग रोजगारासाठी शहराकडे येत आहे. शेतीचे वारसा हक्काने होणारे तुकडीकरण, निसर्गाची प्रतिकूलता, मजुरांची टंचाई, आदानाचा वाढता प्रचंड खर्च, हवामानातील बदल, ग्रामीण भागातील लोकांची नकारात्मक वृत्ती, कुटूंबाचा मोठा आकार, अल्प शिक्षण, आरोग्याच्या अपुऱ्या सोयी, दळणवळणाची अपुरी व्यवस्था व लघुउद्योगांचा ऱ्हास यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकासाचा दर अपेक्षित वाढला नाही.

२)ग्रामीण भागामध्ये बेरोजगारीत वाढ:

ग्रामीण भागातील शेती क्षेत्र १९९९-२००० मध्ये एकुण रोजगारापैकी ५९.९८ टक्के रोजगार पुरवित होते. ते सन २०११-१२ मध्ये ४८.९ टक्के इतकेच रोजगार पुरविणारे क्षेत्र राहिले आहे. ६८ व्या सर्वेक्षण रिपोर्टनूसार १ जानेवारी २०१२ नुसार ४७२.९ मिलियन बेरोजगारापैकी ग्रामीण पुरुष २३४.६ मिलियन व ग्रामीण महिला १०१.८ मिलियन तर शहरी पुरुष १०९.२ मिलियन व शहरी महिला २७.३ मिलियन याप्रकारे बेरोजगारी देशात होती. नविन आर्थिक धोरणामुळे ग्रामीण भागात शेती व उद्योगाचे यांत्रिकीकरण झाले. शेती नापिकी व वाढत्या कर्जामुळे या क्षेत्रात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली तसेच ग्रामीण भागात चालणाऱ्या उद्योगांच्या यांत्रिकीकरणाने कामगार बेकार केले. अर्थात नविन आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून ग्रामीण भागात बेरोजगारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

३) शेतजमिनीच्या पर्यायी वापरात वाढ:

नविन आर्थिक धोरणापूर्वी शेतीचा उपयोग फक्त शेती उत्पादनासाठी होत असे. पण या धोरणामुळे शेतीचा उपयोग राहण्यासाठी, कंपन्यांसाठी, शाळा, गोदामे अशा विविध कारणासाठी दिवसेंदिवस वाढत चालला आहे. देशाची लोकसंख्या अतिरिक्त वाढल्याने शेतीचे सन २०११-१२ मध्ये दरडोई प्रमाण ०.१५१ हेक्टरपर्यंत खाली आले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी देशाने डिसेंबर २०१३ पर्यंत विदेशी कर्ज ४२७.० अरब डॉलर एवढे प्रचंड वाढले आहे. हा परिणाम नवीन आर्थिक धोरणाने पुढे आणला आहे.

४) आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण:

देशाने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) दबावाखाली केलेला आहे. या धोरणाने उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण यांच्या वाढीला प्रोत्साहन दिल्याने गरीब व श्रीमंत अशा दोन भारतांचा जन्म झाला. देशामधील श्रीमंत वर्ग फार संपत्तीवान झाला. ग्रामीण भागात राहणारा गरीब वर्ग गरिबीतच राहिला. एकीकडे अन्नासाठी भटकणारा समाज वाढत चालला आहे. ही वास्तव स्थिती देशापुढे निर्माण झाली आहे.

५) ग्रामीण भागात शिक्षणाचे महत्व:

भारतात अनेक धर्म, जातीचे लोक राहतात. नविन आर्थिक धोरणापूर्वी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार फारच कमी होता. नविन आर्थिक धोरणाने बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या बऱ्याच प्रमाणात वाढल्याने या कंपन्यांना लागणाऱ्या कौशल्याचा कामगार वर्ग ग्रामीण भागातून येऊ लागला आहे. नविन आर्थिक धोरणाचा अनुकूल परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेला काही प्रमाणात दिसतो.

६) बौध्दिक संपदा अधिकाराची मक्तेदारी:

उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरणामुळे बौध्दिक संपदा अधिकार कोणत्याही देशातील क्षेत्राला लागू झाला आहे. या कायद्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या बियाणे संग्रहण व विनिमय करण्याचा हक्क संपुष्टात आला आहे. या बाबतीत डॉ.वंदना शिवा म्हणतात की, *बेभरवशाचे आणि पुन:निर्मिती शक्य नसलेले बियाणे पुरवून खाजगी कंपन्यांनी ग्रामीण भागात असणाऱ्या शेतकऱ्यांना परावलंबी, कर्जबाजारी बनविले आहे.* नविन आर्थिक धोरणाने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर इतर काही परिणाम केलेले आहेत. यात ग्रामीण भागात राहणारा समाज ही भौतिक चंगळवादी, भौतिक सुख-सोयीच्या वस्तुची मागणीत वाढ, कूटीर उद्योगाचा ऱ्हास, बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून कामगाराची वाढती पिळवणूक असे अनेक परिणाम केलेले आहेत.

**निष्कर्ष व उपाय:**

नविन आर्थिक धोरणाची सुरुवात देशापुढे निर्माण झालेल्या आर्थिक संकटातून झालेली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या अर्थव्यवस्थेची दारे यामुळे खुली झालेली आहेत. देशात ज्या ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध आहेत, अशा ठिकाणीच उद्योगाचे केंद्रीकरण झाल्याने ग्रामीण भागात पुर्वीप्रमाणे आजही मागासलेलाच राहिलेला आहे. या भागाच्या विकासाशिवाय देशाला आर्थिक महासत्ताक होण्याचे स्वप्न पूर्ण करता येणार नाही. तेंव्हा सरकारने ग्रामीण भागात पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करुन द्याव्या म्हणजे उद्योगधंदे ग्रामीण भागात उभे राहतील.

देशातील शहरीकरणाचे प्रमाण ग्रामीण भागाच्या प्रमाणापेक्षा कमी आहे. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेती व्यवसाय महागडी बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, सिंचन व अवजारे यामुळे तोट्यात गेला आहे. देशात दिवसेंदिवस अवेळी पडणारा पाऊस, शेतीचा आकार कमी, वाढते कर्ज, कुटूंबातील अल्प साक्षरता, हवामानाची प्रतिकूलता अशा अनेक कारणांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र थांबता थांबण्यास तयार नाही. तेव्हा सरकारने शेतीमध्ये पिकांच्या होणाऱ्या नुकसानीचा अंदाज घेवून विम्यापोटी सर्व रक्कम शेतकऱ्यांना द्यावी.

**संदर्भ सूची:**


१) Mistra, Puri, *Indian Economy*, 2009, Himalaya Publication House, New Delhi.

२) Deshpande P.P., *Indian Economy*, 2009, A.P.H. Publishing Corporation, New Delhi.

३) Ruddra Datt & K.P.M. Sundharam, *Indian Economy*, 2005, S.Chand & Company Ltd., Ram Nayar, New Delhi.

४) डॉ.डोळे ना.य., *नवे आर्थिक धोरण*, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

५) डॉ.सोळूंके आर.एस., डॉ.ककडे व्ही.बी., *भारतीय अर्थव्यवस्था*, २००३, श्री विद्या प्रकाशन, पुणे-३०.

६) भोगे कृष्णा, *भारतीय अर्थव्यवस्था*, २०१३, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

७) भारतीय अर्थव्यवस्था, *प्रतियोगिता दर्पण*, २०१२-१३ व २०१३-१४.

८) डॉ.कविमंडन विजय, *कृषी व ग्रामीण*

*अर्थशास्त्र*, २०१२, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

९) साठे मधुसुदन दत्तात्रय, *जागतिक अर्थव्यवस्था*, २००७, मेहता पब्लिशिंग हाऊस.

१०) योजना (मासिक), जूलै २०१२.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा

### जुलै - सप्टेंबर २०१५ अंकासाठी त्वरित लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्डकॉपीज् व एक सॉफ्टकॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठवणे आवश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे: कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# सामुदायिक विकास योजनेची ग्रामीण विकासातील भूमिका

नीता सुधाकर वाणी, ऐनपुर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय
ता. रावेर जि. जळगाव.
भ्रमणध्वनी: ९८२३७४९५५६

भारतातील जवळ जवळ ७०% भाग हा ग्रामीण भाग आहे. आणि ३०% भाग शहरी आहे. इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे. जगात घडणारी कोणतीही घटना, लागणारे शोध संशोधन काही क्षणात देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचत आहे. माहिती प्रसार माध्यमामुळे जग जवळ आले आहे. ग्रामीण भाग,शहरी भाग असा फरक राहिलेला नाही असे बोलले जाते पण हे तितकेसे बरोबर नाही. ग्रामीण भाग आणि शहरी भाग यात आजही अनेक बाबतीत फरक दिसून येतो. शहरी माणसाच्या घरात जे आले ते ग्रामीण माणसाच्या घरात आले पण शहरी माणसाला जे बाह्य फायदे मिळतात मूलभूत सोयी सुविधा विनासायास मिळतात. त्या ग्रामीण माणसाला मिळू शकत नाही. शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील सोयी सुविधांच्या दर्जात भरपूर फरक असतो. विकासाच्या बाबतीत ग्रामीण भाग अजूनही बराच मागे आहे. देशाचा सर्वांगिण विकास ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. कारण देशातील ग्रामीण भागाचे प्रमाण सर्वाधिक आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण विकासासाठी शासनाने अनेक प्रयत्न केले आहेत. प्रत्येक पंचवार्षीक योजनेत ग्रामीण विकासाठी भरघोस अशी खर्चाची तरतूद करण्यात आली त्याप्रमाणे खर्च करण्यात आला परंतु ग्रामीण भागाचा विकास अद्यापही अपेक्षेइतका झालेला नाही.

कोणत्याही योजनेची यशस्विता केवळ शासकीय प्रयत्नावर अवलंबून नसते तर जनतेच्या सहभागावर अवलंबून असते, हे लक्षात घेऊन भारतात २ ऑक्टोंबर १९५२ पासून सामुदायिक विकास योजना सुरु करण्यात आली.

सामुदायिक विकास योजना हा कार्यक्रम लोकांचा कार्यक्रम आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी तेथे उपलब्ध असलेल्या मानवी श्रमाचा उपयोग केला तर ग्रामीण भागाचा विकास करणे कठीण नाही हा हेतू या योजनेमागे आहे.

**सामुदायिक विकास योजनेचा अर्थ:**

सामुदायिक विकास योजनेचा अर्थ व व्याख्या अनेक तज्ज्ञांनी पुढील प्रमाणे केल्या आहेत.

१) भारतीय नियोजन मंडळ - भौतिक आणि मानवी संसाधनाचे क्षेत्रीय आधारावर पूर्ण विकास करणे आणि त्या द्वारे लोकांचीच प्रेरणा व सहभाग यांच्या माध्यमातून ग्रामीण समाजाचे जीवनमान उंचावणे हे सामुदायिक विकास कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे.

२) श्री. मुखर्जी - ग्रामीण समाजाच्या परंपरागत जीवन पध्दतीमधे प्रागतिकता आणण्याची प्रक्रीया म्हणजे सामुदायिक विकास.

वरील व्याख्यांवरुन असे स्पष्ट होते की, सामुदायिक विकास योजना हा विस्तृत विकासाकडे नेणारा संघटित आणि आयोजीत प्रयत्न आहे. सामुदायिक विकास योजना हा कार्यक्रम लोकांचा आहे. लोकांचा लोकांकरीता लोकांनीच राबवायाचा हा कार्यक्रम आहे. सरकारची भूमिका फक्त प्रेक्षकाची मार्गदर्शकाची असते.

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे त्यासाठी विविधांगी कार्यक्रम राबवून शेतीच्या उत्पादनात वाढ करणे, लोकशाही पध्दतीने समुदायाच्या आर्थिक विकासाचा प्रयत्न करणे, ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे, हस्तकला व ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण स्त्री व युवकांसाठी कार्यक्रम राबविणे हे उद्देश सामुदायिक विकास योजनेमागे आहेत.

**युनेस्कोने सांगितलेली तत्वे:**

सामुदायिक विकास योजनेंतर्गत जे कार्यक्रम राबविले जाणार आहेत त्यासाठी युनेस्कोने सर्व सभासद देशांना मान्य होतील अशी तत्वे सांगितली आहेत ती तत्व पुढीलप्रमाणे आहेत.

१) समुदायाच्या मुलभूत गरजा विचारात घेउन कार्यक्रम आखले जावेत.

२) सामुदायिक प्रश्नांमधे लोकांचा सहभाग वाढविणे.

३) स्थानिक नेतृत्वाचा शोध घेणे.

४) सामुदायिक विकास कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी स्त्रिया व युवकवर्ग यांना सहभागी करून घेणे.

५) सामुदायिक विकास योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सरकारचे साहाय्य असावे.

**भारतातील सामुदायिक विकास योजनांची अंमलबजावणी:**

भारतात म.गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोंबर १९५२ रोजी सामुदायिक विकास योजनांची अंमलबजावणी सुरु करण्यात आली सुरवातीला प्रयोगा दाखल ५५ प्रकल्प हाती घेण्यात आले. या प्रकल्पांची यशस्विता पाहून देशाच्या इतर भागातही या योजना लागू कराव्यात असे ठरले. परंतु संसाधनाच्या मर्यादांमुळे सामुदायीक विकासापेक्षा कमी व्यापक पण त्याच स्वरुपाचा कार्यक्रम राष्ट्रीय विस्तार सेवा कार्यक्रम सुरु करण्यात आला. दोन्ही कार्यक्रमांची मुळ उद्दीष्टे सारखी होती म्हणून केंद्र आणि राज्य स्तरावर त्यांचे संचलन एकत्रित करण्यात आले.

सामुदायिक विकास कार्यक्रम हा जरी लोकांचा कार्यक्रम असला तरी त्यासाठी शासकीय सहभाग आवश्यक आहे. भारतात पंचायत राज व्यवस्था स्थापन होण्यापूर्वी प्रशासकीय रचनेचे राष्ट्रीय स्तर, राज्य स्तर, जिल्हा स्तर, खंड स्तर, ग्रामीण स्तर असे पाच भाग होते. महत्वाचे स्तर असूनही नागरिकांनी त्याला पुरेसा प्रतिसाद दिला नाही. बलवंतराय मेहेता यांच्या अध्यक्षेखाली नेमेलेल्या अभ्यासगटाला सामुदायिक विकास योजनेमधील ही कमतरता जाणवली व त्यांनी लोकांना खऱ्या अर्थाने सहभागी करुन घेण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाची शिफारस केली. केंद्र सरकारने अभ्यासगटाच्या शिफारशी स्विकारुन १९५८ मध्ये राज्य सरकारकडे पाठविल्या या शिफारशीच्या अंमलबजावणीतून पंचायत राज्याची कल्पना साकारली भारतात १९६४ पर्यंत बहुतेक राज्यांनी पंचायतराज व्यवस्था स्वीकारली. पंचायत राज्यात सामुदायिक विकासाची प्रशासकीय रचना पुढील प्रमाणे आहे.

१) जिल्हा परिषद - जिल्हा पातळीवर विकास कामांचा समन्वय साधण्याचे कार्य जिल्हा परिषद करते. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी यात असतात. जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या सोयीसाठी विविध समिती, आरोग्य समिती, शिक्षण समिती, बांधकाम समिती,महिला बालकल्याण समिती, सहकार समिती इ. समित्या गठीत केल्या जातात. जिल्हा परिषदेला विविध कार्ये करावी लागतात.

२) पंचायत समिती - प्रत्येक जिल्ह्याचे गट पाडले जातात. या गटाच्या पातळीवर कार्य करणारी संस्था पंचायत समिती होय. पंचायत समिती निरनिराळी कार्ये करते. अंदाजपत्रक तयार करणे, शेती व इतर व्यवसायाच्या विकासाला मदत करणे प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन व नियंत्रण करणे, मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या योजना आखणे इ. कार्य पंचायत समिती करते.

३) ग्राम पंचायत-खेडे हा विकासाच्या योजनेतील मुलभुत घटक असून त्या पातळीवर कार्य करणारी संस्था म्हणजे ग्रामपंचायत होय. गावातील लोक निवडणुकीद्वारे आपले प्रतिनिधी निवडतात. स्त्रिया आणि अनुसूचित जाती जमातीच्या लोकांसाठी राखीव जागा असतात. सरपंचाच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत त्या गावाचा कारभार पाहते व विविध विकासात्मक व कल्याणकारी कार्य करते. या कार्याच्या अंमलबजावणीत ग्रामसेवक आणि कृषीसहाय्यक यांची भूमिका महत्वाची असते. ग्राम स्वच्छता, पाणीपूरवठा, आरोग्य विषयक सोयी, रस्त्यांचा सोयी प्रथामिक शिक्षण नोंदी ठेवणे इ.कामे ग्रामपंचायत करते.

**सामुदायिक विकास योजनेंतर्गत राबविण्यात येणार कार्यक्रम:**

सामुदायिक विकास योजना ही ग्रामीण जनतेला स्वयंपूर्ण करणारी योजना आहे. सामुदायिक विकास योजनेतंर्गत पुढील विविध कार्यक्रम हाती घेतले जातात.

१) शेतीचा विकास - सामुदायिक विकास योजनेंतर्गत शेतीचा विकास करण्यासाठी पडीत जमीन लागवडीसाठी आणली जाते. पडीत जमिनीत जलसिंचनाच्या सोयी करण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेच्या

सहकार्याने रस्ते,तलाव व विहिरी तयार केल्या जातात. एकूण उत्पादनात वाढ होण्यासाठी चांगल्या प्रतीचे बियाणे, किटक नाशके खते व कृषी योग्य आदाने यांची व्यवस्था केली जाते. ग्रामीण भागातील जनतेत सहकाराची भावना निर्माण केली जाते. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना वित्त पूरवठा केला जातो. विपणन व्यवस्थेत सुधारणा केली जाते. जोडधंदयाचा विकास केला जातो.

२) शिक्षण - सामुदायिक विकास योजनेत शिक्षणाला महत्वाचे स्थान दिलेले आहे. शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे साधन आहे. शिक्षणामुळे विचारशक्ती बदलते. व्यक्तीचा आर्थिक सामजिक, बौध्दीक विकास होतो. म्हणून ग्रामीण बालकांसाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करणे. प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम राबविणे स्त्री शिक्षण व्यवसाय प्रशिक्षण देणे, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्राचे शिक्षण देणे इ. कार्यक्रम सामुदायिक विकास कार्यक्रमात येतात.

३) आरोग्य- ग्रामीण भागात आरोग्य विषयक सोयी पुरेशा व समाधानकारक नसतात. म्हणून सामुदायिक विकास योजनेअंतगर्त ग्रामीण भागात आरोग्य विषयक सोयी पूरविण्यावर भर दिला जातो. स्वच्छता, रोगांच्या निर्मूलनार्थ उपाय व पिण्याच्या पाण्याची सोय, वैद्यकीय उपचाराची सोय, कुटुंब कल्याण कार्यक्रमाची अंमलबजावणी, रोगप्रतिबंधक लसी टोचणे इ. कार्यक्रम आयोजित केले जातात.

४) लघू व कुटीरोद्योगांचा विकास - लघू व कुटीरोद्योगांच्या ऱ्हासामुळे ग्रामीण भागात अनेक समस्या निर्माण झाल्या. दारीद्र्य, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, आर्थिक विषमता, या समस्या लघु व कुटीरोद्योग बंद पडल्यामुळे निर्माण झाल्या या समस्या दूर करण्यासाठी ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठी लघू व कुटीरोद्योगांचा विकास केला पाहिजे. शेतीवर प्रक्रिया करणारे निरनिराळे उद्योग स्थापन करुन ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न सामुदायिक विकास योजनेतंर्गत दूर करता येतो.

५) सामाजिक कल्याण - सामुदायिक विकास योजनेंतर्गत सामाजिक कल्याणाचा कार्यक्रम हाती घेतला जातो. या कार्यक्रमांतर्गत सामाजिक कल्याणसाठी वेगवेगळया सोयी उपलब्ध करुन दिल्या जातात. बालक, स्त्रीया, युवक, वृध्द, अपंग , निराधार, दारीद्र्यरेषेखालील लोक, मागासवर्गीय यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात.

६) गृहनिर्माण -ग्रामीण भागातील लोकांचा राहणीमाणाचा दर्जा उंचावण्यासाठी सामुदायिक विकास योजना महत्वपूर्ण आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहे. अन्न, वस्त्राबरोबर निवारा ही मनुष्याची आवश्यक गरज आहे परंतु ग्रामीण भागात निवाऱ्याच्या सोयी योग्य नसतात. त्यामुळे जनतेच्या आरोग्यावर त्याचा विपरित परिणाम होतो. सामुदायिक विकास योजनेतंर्गत घरबांधणीला प्रोत्साहन दिले जाते. दारिद्र्य रेषेखालील लोकांना मोफत घरकुले पुरविणे किंवा कमी दरात घरे बांधून देणे

अशी कार्ये सामुहिक विकास योजनेंतर्गत केली जातात.

७) वाहतूक दळणवळण व्यवस्था - शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात वाहतूक व दळवळणाच्या सोयी योग्य पुरेशा व समाधानकारक नसतात. सामुदायिक विकास योजनेंतर्गत वाहतूक व दळणवळणाच्या साधनांचा विकास करणे, रस्त्यांचे रुंदीकरण करणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे, नद्यांवर, रेल्वे लाईनवर पूल बांधणे, वाहतुक व दळणवळणाच्या सोयी उपलब्ध करणे इ. कार्ये केली जातात. वाहतूक व दळवळणाच्या सोयी उपलब्ध करुन दिल्यामुळे शेतमालाची वाहतूक करणे आणि बाजारपेठेत नेऊन विकणे सोपे जाते. वाहतूक व दळणवळणाच्या सोयीमुळे खेडी शहरांशी जोडली जातात. त्यामुळे खेडयांचा विकास होण्यास मदत होते. शहरी भागातील सोयी सुविधांचा लाभ ग्रामीण भागातील लोकांना होऊन त्यांच्या राहणीमानात सुधारणा होते.

### सामुदायिक विकास कार्यक्रमावरील खर्च:

सामुदायिक विकास कार्यक्रम हा विविधांगी कार्यक्रम आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्यामुळे प्रत्येक पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमावर मोठया प्रमाणावर खर्च करण्यात आला.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत फक्त ४५ कोटी रु. सामुदायिक विकास कार्यक्रमावर खर्च करण्यात आले होते. त्यानंतरच्या योजनेत या रकमेत वाढ झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत १८७ कोटी रुपये खर्च करण्यात आले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत २६९ कोटी रु. खर्च करण्यात आले. चौथ्या पंचवार्षिक योजनेत ही रक्कम कमी झाली. ११६ कोटी रु. खर्च करण्यात आले. पाचव्या पंचवार्षिक योजनेत खर्चाच्या रकमेत पुन्हा थोडी वाढ झाली. ती १३० कोटी रु. झाली. मात्र सहाव्या पंचवार्षिक योजनेत पुन्हा खर्चात वाढ झाली. तो ३५२ कोटी रु. करण्यात आला.

### सामुदायिक विकास योजनेचे मूल्यमापन:

सामुदायिक विकास योजनेतंर्गत कार्यक्रम राबविण्याकरीता प्रत्येक पंचवार्षिक योजनेत मोठया प्रमाणावर खर्चाची तरतूद करण्यात आली आणि तसा खर्चही करण्यात आला त्यामुळे ग्रामीण विकास होण्यास निश्चित मदत झाली परंतु तरीही पाहिजे तसे यश या योजनेला आलेले नाही. ग्रामीण भाग आणि शहरी भाग यातील अंतर आजही कमी झालेले नाही. ग्रामीण भागात अनेक समस्या आजही जशाच्या तशा टिकून आहे. पुढील कारणांमुळे किंवा दोषांमुळे सामुदायिक विकास योजनेला अपेक्षित यश प्राप्त झाले नाही.

१) कल्याणकारी कार्यावर जास्तीचा भर:

सामुदायिक विकास योजनेत आर्थिक विकासापेक्षा आर्थिक कल्याणाला अधिक महत्व देण्यात आले .शाळा, आरोग्य केंद्र यांच्या स्थापनेवर भर देण्यात आला पण उत्पादन क्षमतेत वाढ व्हावी, रोजगारात वाढ व्हावी, लघू व कुटीरोद्योगांचा विकास व्हावा या उद्दिष्टावर भर देण्यात आला नाही.

२) लाभाचे विषम वितरण:

सामुदायिक विकास योजनेचे लाभ खेड्यांना निश्चित मिळाले पण सर्वच खेड्यांना सारखे मिळाले नाही, गरीब लोकांना व मागासलेल्या खेडयांना व प्रदेशांना या योजनेचा

लाभ फारसा मिळाला नाही. त्यामुळे लक्षावधी गोर गरीब लोकांसाठी असलेली ही योजना केवळ ग्रामीण श्रीमंत लोक, श्रीमंत खेडी आणि श्रीमंत प्रदेश यांच्यापुरती मर्यादीत राहिली.

३) लोकांचा प्रतिसादः

या योजनेमागे लोकांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करणे हा प्रमुख उद्देश होता. पण सामान्य जनता त्यापासून दूर राहीली ग्रामीण भागात वातावरणही राजकारणामुळे दुषित झाले आहे. गावात अनेक वेगवेगळया विचाराचे गट असतात. त्यांच्यात संघर्ष व मतभेद असतो. त्यामुळे योजना कितीही चांगली असो राजकारणामुळे तीला विरोध होतात. विरोधी पक्षाकडून या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत नाही व लोकांच्या प्रतिसाद अभावी एकतर ही योजना स्थगित करावी लागते किंवा ती यशस्वी होत नाही.

४) अधिकाऱ्यांमधील मतभेदः सरकारकडून नियुक्त केलेले ग्रामसेवक, कर्मचारी व विकास अधिकारी सरपंच यांच्यात मतभेद असतात. ते एकमेकांची मते खोडून काढतात. त्यामुळे कार्य योग्य रीतीने होऊ शकत नाही.

५) सरकारी साहाय्यः सामुदायिक विकास कार्यक्रमातील योजना कितीही चांगल्या असल्या तरी त्या पूर्ण करण्यासाठी आर्थिक सहाय्याची आवश्यकता असते. सरकारी कारभारातील दोषांमुळे कामचुकारपणा, दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार यामुळे वेळेवर आर्थिक सहाय्य पुरविले जात नाही. त्यामुळे योजना राबविण्यात अडचणी येतात. ह्र

६) कार्य क्षेत्राची व्यापकताः हा कार्यक्रम फार मोठा महत्वाकांक्षी आहे. शेती विकास, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, लघु व कुटीरोद्योगांची स्थापना इ. सर्व कार्य या कार्यक्रमात समाविष्ट आहे. पण ही सर्व कार्ये या कार्यक्रमात समाविष्ट आहे. पण ही सर्व कार्ये एकाच वेळी पूर्ण होऊ शकत नाही. एकाच वेळेस सर्व कार्य पूर्ण करण्याच्या प्रयत्नामुळे एक कार्यही समाधानकारकपणे पूर्ण होऊ शकत नाही.

७) माध्यमाचा प्रश्नः सामुदायिक विकास कार्यक्रम राबविणारी माध्यमे कोणती आहेत कशी आहेत? यावर या कार्यक्रमाचे यश अवलंबून आहेत. सामुदायिक विकास कार्यक्रम राबविण्यासाठी जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली. खेड्यांच्या पातळीवर योजना राबविण्याचे काम ग्रामपंचायतीकडे आले. गटपातळीवर पंचायत समित्यांकडे आले या संस्था लोकशाही पध्दतीच्या आहेत. परंतु निवडणूकांमध्ये श्रीमंत वर्गाचा प्रभाव असतो. श्रीमंत लोकच निवडणूका लढवू शकतात व जिंकू शकतात. त्यामुळे त्यांच्याकडून वरील वर्गाला न्याय दिला जाईल याची शक्यता कमी असते.

८) प्रत्येक खेडयापर्यंत योजना पोहचली नाहीः सामुदायिक विकास योजनेंतर्गत ग्रामीण भागाचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला, अनेक अत्यावश्यक सोयी सुविधांची निर्मिती ग्रामीण भागात करण्यात आली परंतु अनेक खेडी या योजनेच्या लाभापासून वंचित राहीली आहे. अनेक खेडी अशी आहेत की, त्यांची शासन दरबारी नोंद नाही अनेक खेडयांमध्ये शासनाची एक बसही दिवसातून एकदाही जात नाही तेथे शाळा, दवाखाना, बँक, आवश्यक वस्तूंची दुकाने, भाजीबाजार, पोलीस स्टेशन, पोष्ट ऑफीस, ग्रामपंचायत नाही.

९) पायाभूत सुविधांच्या दर्जाचा प्रश्नः सामुदायिक विकास योजनेतर्गत ग्रामीण भागात वाहतूक

दळणवळणाच्या सोयी करण्यात आल्या विजपूरवठा, पाणी पूरवठा, शिक्षण, आरोग्य यांच्या सोयी करण्यात आल्या. गरीब लोकांसाठी घरे बांधण्यात आली. शौचालय बांधण्यात आले. पण या सोयी सुविधांचा दर्जा कसा आहे हा महत्वाचा प्रश्न आहे.या सोयी सुविधांची शहरी भागाशी तुलना केली तर ग्रामीण भागातील सोयी सुविधांची अवस्था दयनीय आहे. रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. आरोग्यकेंदात डॉक्टर उपलब्ध नसतो, शाळेत शिक्षक असेल तर विद्यार्थी नसतो आणि विद्यार्थी असेल तर शिक्षक नसतो. पाणी पूरवठा केले जाणारी पाणी पिण्यास योग्य नसते, विजेचे भारनियमनही जास्त वेळ केले जाते. अशा रितीने मानवाला मानव म्हणून जगण्यायोग्य स्थिती ग्रामीण भागात नाही.

**निष्कर्ष:**

सामुदायिक विकास योजनेचा अभ्यास केला असता पुढील निष्कर्ष निघतात.

१) सामुदायिक विकास योजनेमुळे ग्रामीण भागांचा विकास होण्यास काही प्रमाणात मदत झाली आहे.

२) सामुदायिक विकास योजनेच्या लभापासून देशातील काही भाग वंचित राहिलेला आहे.

३) सामुदायिक विकास योजना ही लोकांची योजना असूनही लोकांनी या योजनेला फारसा प्रतिसाद दिला नाही.

४) लोक निर्वाचित प्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यात सामंजस्य नसल्यामुळे ही योजना फारशी यशस्वी झाली नाही.

५) सामुदायिक विकास योजनातंर्गत ग्रामीण भागात ज्या सोयी सुविधा पूरविण्यात आल्या त्यांचा दर्जा निकृष्ट प्रतीचा आहे.

६) राजकारण आणि भ्रष्टाचारी वृत्ती यामुळे सामुदायिक विकास योजनेच्या यशस्वितेत अडचणी निर्माण झाल्या आहेत.

शिफारशी - सामुदायिक विकास योजनेचा अभ्यास केला त्यातून या योजनेच्या यशस्वितेसाठी पुढील शिफारशी सुचविण्यात येत आहे.

१. सामुदायिक विकास योजनेंतर्गत योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जे अनुदान पुरविले जाते ते संबंधित भागाला प्रत्यक्ष पुरवण्यात यावे. जिल्हा परिषदेकडून पंचायत समितीकडे, पंचायत समितीकडून ग्रामपंचायतीकडे असे पूरविण्यात येवू नये. यामुळे जास्तीत जास्त अनुदानाचा वापर त्या संबधीत भागात करता येईल. भ्रष्टाचाराच्या मार्गाने अनुदानाला गळती लागणार नाही.

२. ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीप्रधान असली तरी ती उद्योग प्रधान करता येते. कृषी व कृषीवर आधारित उद्योगांची स्थापना करून रोजगार निर्मितीत वाढ करता येते त्यासाठी ग्रामीण युवकांना प्रोत्साहीत करणे त्यांना आर्थिक मदत पूरविणे आवश्यक आहे.

३. सिमांत शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांच्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात. शेतमजूरांसाठी कायद्यात विशेष तरतूद करण्यात यावी. कारण शेतमजूराची अवस्था दयनीय आहे. त्याला रोजगाराची शाश्वती नसते .

४. ग्रामीण भागात वैचारिक क्रांती होणे आवश्यक आहे. अजुनही ग्रामीण भागात समाज रुढीप्रिय, परंपरावादी आहे आणि ही

बाब ग्रामीण भागाच्या प्रगतीत अडथळा निर्माण करीत आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील समाजाने आपली मानसिकता बदलविणे आवश्यक आहे. वैचारिक बदल झाल्याशिवाय सामुदायिक विकास योजनांना अनुकूल प्रतिसाद दिला जाणार नाही.

५. सामुदायिक विकास योजनेच्या यशस्वितेसाठी लोकांच्या सहकार्याची व प्रतिसादाची गरज आहे शासकीय कार्यावर जनतेचा अंकूश असेल तर आपोआपच भ्रष्टाचाराला आळा बसणार आहे आणि भ्रष्टाचार नष्ट झाला की लोकांना अत्यावश्यक सोयी, सुविधा उत्तम दर्जाच्या मिळतील त्यासाठी जनतेने शासकीय कार्याची पाहणी करणे आवश्यक आहे

६. भारतात ग्रामीण भागाचे प्रमाण ७०% असल्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून आहे. म्हणून देशाच्या कानाकोपऱ्यातील खेड्यांपर्यंत विकासाच्या योजना पुरविणे गरजेचे आहे.

७. त्या भागातील आर्थिक परिस्थितीवर त्या भागाचा विकास अवलंबून असतो. म्हणून सामुदायिक विकास योजनेत दारीद्र्य निर्मुलनासाठी कसोशीने प्रयत्न केले पाहीजे. मात्र लोकांना पंगू न करता त्यांच्या हाताला व डोक्याला काम देणे आवश्यक आहे. फुकटचे आर्थिक अनुदान पुरविल्यामुळे लोक आळशी, कामचुकार बनतात शिवाय सरकारकडून त्यांच्या अपेक्षा वाढत जातात. म्हणून लोकांना काम पुरवून रोजगारात वाढ केली पाहिजे.

८. ग्रामीण भागातील बहुसंख्य समाज निराशावादी, आत्मविश्वास नसलेला असल्यामुळे हा समाज उद्योग, व्यवसायाकडे वळत नाही म्हणून शासकीय स्तरावर काही उद्योग, प्रकल्प सुरु करण्यात आले तर लोकांना रोजगार मिळून बेरोजगारी व दारीद्र्याचा प्रश्न मिटण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची:**


१) विजय कवीमंडन, *कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र*, सहावी आवृत्ती २०१२. श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर.

२) स. श्री. मु. देसाई डॉ. सौ. निर्मल भालेराव, *भारतीय अर्थव्यवस्था* २०११, निराली प्रकाशन, पुणे.

३) R. K. Govil, B. B. Tripathi, *Agricultural Econony of India*, Kitab Mahal, Allahabad 2010.

# महाराष्ट्रातील आंतर - प्रादेशिक विषमता

(विशेष संदर्भ : विदर्भ प्रदेश)

रामदास भांडवलकर, यवतमाळ,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६.

भारताला जागतिक महासत्ता म्हणून प्रस्थापित करण्याचे प्रयत्न अगदी जोरात सुरू आहेत. भारत हा विपुल नैसर्गिक साधन सामग्रीने नटलेला एक विकसनशील देश आहे. जगातील बहुसंख्य समाज शेतीप्रधान असून भारतात शेती व शेतीसंबंधित व्यवसाय हा आर्थिक विकासाचा कणा आहे. म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे हे भारताचे प्रथम कर्तव्य मानले जाते. आर्थिक विषमता हा एक गहन विषय आहे. आर्थिक विषमता ही समाज जीवनातील नैसर्गिक आणि मानवनिर्मित्त रचनेशी जोडलेली असते. विशिष्ट व्यक्तीसमुह किंवा प्रदेश जर माघारलेला असेल तर ते माघारलेपण त्याची दुर्बलता ठरते. बहुतेक वेळा प्रादेशिक असंतुलनाचे कारण राजकीय किंवा आर्थिकेत्तर असते. मुक्त अर्थव्यवस्थेत प्रादेशिक विषमता एक अपरिहार्य परिणाम दिसून येतो. सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ मिर्डाल यांच्यामते, विकसित केंद्रे अधिक विकसित होतात तर अविकसित केंद्रे अधिक माघारतात. विकसित केंद्रे विकसित होण्यामागे, भांडवलदाराचा स्वार्थ असतो. ज्यावेळी संसाधनाचा वापर जनहितासाठी, सामाजिक हितासाठी होत नाही तर व्यक्ती आपल्या स्वार्थासाठी तो करतो त्यावेळी विषमता निर्माण होते. तसेच एखाद्या भागात एखाद्या मार्गाने विकास झाला म्हणून दुसऱ्या भागात तसाच विकास होईलच असे नाही.

आर्थिक विकासासाठी कृषी, औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास करण्याचा प्रत्येक देश आणि राज्याचा प्रयत्न असतो. परंतु एकाच देशात किंवा राज्यात वेगवेगळ्या प्रदेशामध्ये नैसर्गिक साधनसामुग्रीचे असमान वितरण झालेले असते. त्यामुळे प्रदेशाच्या विकासाचा दर व आर्थिक विकासाचा आकृतीबंध वेगवेगळा असतो. ज्या प्रदेशात अधिक नैसर्गिक साधनसामुग्री असते किंवा

विकासासाठी अनुकूल वातावरण असते अशा प्रदेशाचा विकास अधिक होतो. परिणामतः विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर साधन सामग्री असलेले प्रदेश आणि साधनसामग्री नसलेले प्रदेश यांच्यातील अंतर वाढतच जाते अशा प्रकारे वेगवेगळ्या प्रदेशाच्या वाढीच्या वेगवेगळ्या दरामुळे व आकृतीबंधामुळे आंतर-प्रादेशिक विषमता निर्माण होते.

देशातील विभिन्न लोक, समाज व प्रदेश यांच्यामध्ये आर्थिक विकासाच्या यशाचे असमान वितरण आणि त्यामुळे आर्थिक विकासात (भेदभाव) असमानता आणि अंतर निर्माण होणे म्हणजेच प्रादेशिक विषमता होय.

प्रादेशिक विषमतेची समस्या जगातील विकसित व अविकसित अशा दोन्हीही प्रकारच्या देशामध्ये आढळून येते. एवढेच नव्हे तर रशिया आणि चीनसारख्या समाजवादी देशामध्येही प्रादेशिक विषमतेची समस्या असल्याचे दिसून येते. भारतात राज्याराज्यामध्ये तसेच विविध प्रदेशामध्ये विषमता मोठ्या प्रमाणात आहे. देशात उत्तरप्रदेशच्या खालोखाल महाराष्ट्र हे लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३०७६९० चौ.कि.मी. असून वनक्षेत्र ६३८४२ चौ.कि.मी. आहेत. भौगोलिक क्षेत्राच्या ९.४ टक्के आहे. भारतात क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी असून एकूण ३६ जिल्हे आहेत. ३९३५४ गावे, २७८०५ ग्रामपंचायती, ३३ जिल्हा परिषदा, ३५४ तालुके आणि पंचायत समित्या, २२४ नगरपरिषदा, १९ महानगर पालिका कार्यरत आहेत. बृहन्मुंबई, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भ हे सामाजिक व सांस्कृतिक विभाग आहेत तर नवी मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, लातुर, नागपूर आणि अमरावती महसूल विभाग आहेत. महाराष्ट्राच्या विविध विभागात आर्थिक विकासाच्या बाबतीत असणारा असमतोल हा विकासाचे फायदे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत सारख्याच प्रमाणात पोहचू न शकल्याचा परिपाक आहे. दुसरीकडे दुष्काळ आणि दारिद्र्य निर्मूलन हा महाराष्ट्रासमोरील अव्वल क्रमांकाचा प्रश्न आहे. तसेच ती एक गंभीर समस्या सुद्धा आहे.

प्रादेशिक असमतोल सत्यपरिस्थिती जाणून घेण्यासाठी जुलै-१९८३ मध्ये महाराष्ट्र शासनाने सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व गोखले इन्स्टीट्युट ऑफ इकॉनॉमिस या आंतरराष्ट्रीय संस्थेचे संचालक डॉ.वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची एक तज्ज्ञ समिति नियुक्ती केली. दांडेकर समितीने एप्रिल १९८४ मध्ये सादर केलेला अहवाल हा विभागीय असमतोलसंबंधी शास्त्रशुद्ध चिकित्सक स्वरूपाचा पहिलाच व्यापक प्रयत्न होता. त्यापूर्वी सन १९८१ मध्ये नरोत्तम शहा यांच्या *महाराष्ट्रातील जिल्ह्याचे आर्थिक विकासाचे स्तर* हा अभ्यास प्रसिद्ध झाला होता. दांडेकर समितीचा अहवाल १९८२-८३ च्या किंमतीवर आधारित असून जलसिंचन, रस्ते, पाणी पुरवठा, आरोग्य, सेवा, विद्युतीकरण, मृदसंधारण, सामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण, पशुवैद्यकिय सेवा इत्यादी क्षेत्रातील राज्याच्या विकासाचा एकुण अनुशेष ३१७७.७८ कोटी रुपयांचा होता. त्यापैकी एकट्या विदर्भाचा विकासाचा अनुशेष १२४६.५५ कोटी रुपयांचा होता. म्हणजेच एकूण अनुशेषाच्या

३९.२ टक्के विदर्भाचा, २३.६ टक्के मराठवाड्याचा, २७.८ टक्के मध्य महाराष्ट्राचा तर मुंबई वगळून कोकणचा ९.३ टक्के आहे. यामध्ये सर्वात जास्त अनुशेष जलसिंचनाचा (१३८५.९२ कोटी रुपये) असून विदर्भात तो अधिक आहे आणि आजही तो कायमच आहे. हा प्रादेशिक असमतोल नष्ट किंवा कमी करून भविष्यात राज्यातील सर्व विभागाचा समतोलित विकास साध्य करण्यासाठी मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र (कोकण व मध्य महाराष्ट्र) यांच्याकरीता स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यासंबंधी घटनेत ३७१(२) कलमाप्रमाणे असलेल्या तरतूदीनुसार सन १९९४ मध्ये राष्ट्रपतींनी आदेश काढून राज्यपालावर अनुशेष दूर करून राज्यातील सर्व विभागाचा समतोल विकास, निधीचे समन्यायी वाटप इत्यादी जबाबदाऱ्या सोपविल्यात. परंतु सन २००० पर्यंत समाधानकारक प्रगती न झाल्यामुळे राज्यपालांनी दि. १५ डिसेंबर,२००१ ला राज्यशासनास निर्देश दिलेत त्यामध्ये १९९४ पर्यंतचा शिल्लक अनुशेष सन २००५-०६ पर्यंत दूर व्हावा अशी अपेक्षा आहे. परंतु या आदेशाचे पालन करणे घटनेप्रमाणे बंधनकारक असून सुद्धा आजपावेतो या आदेशांची अंमलबजावणी झाली नाही.

तक्ता क्र.१ वरून विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचा सन १९९४ चा अनुशेष २०११ पर्यंतसुद्धा पूर्ण झाला नाही तर ७३९.७३ कोटी रूपये शिल्लक आहे. अनुशेषाचे मूल्यांकन तीन वेळा करण्यात आले त्यावेळी अनुशेष वाढल्याचे सन २००० आणि २००५ च्या अनुशेष स्थितीवरून दिसून येते. यामध्ये विदर्भाचा अनुशेष तीव्र स्वरूपाचा आहे. सन १९८४ च्या दांडेकर समितीच्या अहवालानुसार १२४६.५५ कोटी रूपये, सन १९९४ मध्ये अनुशेष आणि निर्देशांक समितीच्या अहवालानुसार ४०८३ कोटी रुपये, मराठवाडा २४०१ कोटी रुपये तर उर्वरित महाराष्ट्र ९३४ कोटी रुपये सिंचन क्षेत्राचा अनुशेष होता म्हणजेच सिंचन क्षेत्राचा एकूण अनुशेष महाराष्ट्रात ७४१८ कोटी रुपये होता. तर इतर क्षेत्राचा एकूण अनुशेष ६५८८.७७ कोटी रुपये होता. १ एप्रिल १९९४ रोजी गणना केलेल्या अनुशेषापैकी जून २००९ मध्ये २७३७२० हेक्टर

तक्ता क्र.१(अ)
महाराष्ट्रातील वित्तीय अनुशेष स्थिती (रुपये कोटी)

| अ. क्र. | महसूल विभाग | १९८४ नुसार अनुशेष | १९९४ नुसार अनुशेष | १९९४ ते २००५ पर्यंत अनुशेष निर्मूलन |
|---|---|---|---|---|
| १. | विदर्भ | १२४६.५५ | ६६२४.०२ | ५२९४.३६ |
| २. | मराठवाडा | ७५०.८६ | ४००४.५५ | ३१५०.४२ |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | ११८९.३८ | ३३७८.२० | १६५२.९९ |
| | एकूण | ३१८६.७९ | १४००६.७७ | १००९७.७७ |

### तक्ता क्र.१(ब)
### महाराष्ट्रातील वित्तीय अनुशेष स्थिती (रुपये कोटी)

| अ. क्र. | महसूल विभाग | २००५ ला शिल्लक अनुशेष | २०११ ला शिल्लक अनुशेष | एप्रिल २००० ला अनुशेष स्थिती | एप्रिल २००५ ला अनुशेष स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १. | विदर्भ | १३२९.६६ | ६५.३६ | ५७७८.६३ | ४६७४.१० |
| २. | मराठवाडा | ८५४.१३ | २७५.०९ | ३५४७.०६ | २१३१.५० |
| ३. | उर्वरित महाराष्ट्र | १७२५.२१ | ३९९.२८ | २६४८.७५ | १७३३.३४ |
| | एकूण | ३९०९.०० | ७३९.७३ | ११९७४.४४ | ८५३८.९४ |

एवढा सिंचन अनुशेष शिल्लक होता हा अनुशेष राज्यातील रत्नागिरी, बुलढाणा, अकोला, वाशिम आणि अमरावती या जिल्ह्यामध्ये अस्तित्वात होता. १ जुलै २०१२ रोजी बुलढाणा, अकोला, वाशिम व अमरावती या जिल्ह्याचा भौतिक अनुशेष २३४०१९ एवढा शिल्लक आहे तर रत्नागिरी जिल्ह्याचा अनुशेष दूर झाला आहे. सन १९९४ चा सिंचनक्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रामधील एकंदरीत अनुशेष रुपये ६५८८.७७ कोटी होता. जानेवारी २०१३ अखेर शिल्लक अनुशेष ५९९.०८ कोटी रुपये होता. यामध्ये सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील अनुशेष मोठ्या प्रमाणात आहे. सिंचन क्षेत्राचा अनुशेष हा विदर्भाचा सर्वात जास्त आहे. दि. १ एप्रिल २००० ला रु.३९५६.५० कोटी, दि. १ एप्रिल २००२ ला रु.३४२२.११ कोटी. दि. १ एप्रिल २००७ ला रु.२४९०.०९ कोटी, दि. १ एप्रिल २००८ ला रु.१८७४.१९ कोटी आणि दि. १ एप्रिल २००९ ला रु.७८८.७६ कोटी रुपये शिल्लक होता. याच वेळी सन १९९४ मध्ये मराठवाड्याचा २४०१ कोटी रुपयाचा अनुशेष १ एप्रिल २००९ रोजी १५९.२० कोटी रुपये होता तर उर्वरित महाराष्ट्राचा सिंचन अनुशेष दि. १ एप्रिल २००७ ला शून्य झाला होता. वास्तविक राज्यपालांच्या आदेशानुसार अनुशेष व सिंचनाकरिता नियत व्यय सोडून शिल्लक निधीचे वाटप प्रत्येक विभागाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठरल्यानंतर हा शिल्लक निधी १६१४.३६ कोटी रुपये होता. त्यापैकी उर्वरित महाराष्ट्रास १४६६.३४ कोटी रूपये आणि बाकीचा निधी मराठवाड्यास देण्यात आला. विदर्भाला मात्र काहीच निधी मिळाला नाही. याऊलट सन २००१-०२ ह्या वर्षात अनुशेषाकरिता विदर्भात रुपये ८६१.०३ कोटी नियतव्ययापैकी फक्त रुपये ३६३.४३ कोटी (४३.२० टक्के) मराठवाड्यात रुपये ४९०.५५ कोटी पैकी ३५२.०६ कोटी (७१.०६ टक्के) तर उर्वरित महाराष्ट्रात रुपये ३६८.४२ कोटीपैकी रुपये २३२.५४ कोटी (६३.१२ टक्के) खर्च झालेत. हिच स्थिती अनुशेष सोडून बिगर अनुशेषाच्या खर्चाची आहे. राज्य महामार्ग या प्रकारातील रस्ते वगळता राज्याच्या रस्त्याच्या सरासरी विभागावर क्षेत्रफळात विदर्भातील रस्त्याची लांबी सर्वात कमी

आहे. राज्यात ३३४ खेडी कोणत्याही प्रकारच्या रस्त्याने जोडलेली नाहीत. यापैकी १७३ खेडी विदर्भातील आहेत. तसेच १३ खेडी डांबरी रस्त्याने जोडलेली नाहीत. विदर्भातील ग्रामीण रस्त्यांची स्थिती फार वाईट आहे. त्याच प्रमाणे कृषिसाठी अर्थसहाय्यीत दराने केलेल्या विजेच्या पुरवठ्याचे अर्थसहाय्य हे पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त उपभोगण्यात आले आहे. विदर्भ यामध्ये फार कमी आहे. पुणे जिल्ह्यातील कृषीसाठी वापरण्यात आलेली वीज ही विदर्भातील एकूण जिल्ह्याच्या वापराहून अधिक आहे. त्याचा परिणाम विकास प्रक्रियेत विकसित भाग अधिक विकसित आणि अविकसित भाग अधिक अविकसित होत जातो. रुपये १५०० कोटीच्या वर अनुशेष असलेले महाराष्ट्रात एकूण सहा जिल्हे असून त्यापैकी चार जिल्हे पश्चिम विदर्भातील (अमरावती महसूल विभाग) आहेत. या विभागाकरीता सन २००२ ते २००७ या कालावधीत सिंचनासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण फक्त २८.३९ टक्के आहे. तर जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यामध्येच ग्रामीण आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.

महाराष्ट्रात एकूण सकल पीक क्षेत्राच्या १३ टक्के सिंचनक्षेत्र आढळते त्यापैकी ६.९ टक्के एकट्या मध्य महाराष्ट्रात आहे. विदर्भात केवळ २.६ टक्के तर मराठवाड्यात ३.१ टक्के सिंचन क्षेत्र आहे. मराठवाडा, विदर्भ व कोकण मिळून जेवढे सिंचन क्षेत्र होते त्याहून एक टक्का अधिक सिंचन क्षेत्र एकट्या मध्य महाराष्ट्रात दिसून येते. दुसरीकडे वनखात्यातर्फे वैधानिक मंडळांना पाणी व माती संधारण करून वनीकरण करण्याकरीता जे पैसे दिले गेले त्यात २००७-०८ आणि २००८-०९ ही दोन वर्षे मिळून उर्वरित महाराष्ट्राला रु. ४५८.०३ कोटी, मराठवाड्याला रु.२४८.८८ कोटी तर विदर्भ वैधानिक मंडळाला काहीच दिले गेले नाही. कृषी पंपांना वीज जोडणीचा व सिंचनाचा अनुशेष दरवर्षी विदर्भात वाढतच आहे. १ एप्रिल २०१० रोजी विदर्भात सिंचनाचा अनुशेष १०,९३,७३० हेक्टरचा आहे. तसेच कृषी पंपांना वीज जोडणीचा २४२७१५ इतका अनुशेष शिल्लक आहे. थोडक्यात संयुक्त महाराष्ट्र होण्याच्या आधी पश्चिम महाराष्ट्र व कोकण हे अवर्षणग्रस्त व दुष्काळी प्रदेश होते आणि विदर्भ हा आश्वासित पर्जन्याचा सधन प्रदेश होता. परंतु ५४ वर्षात उलट झाले विदर्भ हा सततचा दुष्काळी व ग्रामीण आत्महत्याग्रस्त प्रदेश बनला आहे. विदर्भामध्ये दर १०० चौ.कि.मी. साठी केवळ ३२.८७ कि.मी. लांबीचे रस्ते आढळतात तर उर्वरित महाराष्ट्र कोकण आणि मराठवाडा या तीनही प्रदेशात ही लांबी ५२, ५१ व ४८ कि.मी. आहे. विदर्भाच्या रस्त्याची लांबी उर्वरित महाराष्ट्राच्या ६३.४३ टक्के आहे. विजेचा दरडोई वापर उर्वरित महाराष्ट्रातील वापराच्या केवळ ६१.१९ टक्के विदर्भात आहे. वास्तविक विदर्भ हा वीज उत्पादनाचे प्रमुख केंद्र आहे. सर्व बाबतीत विदर्भातचा अनुशेष वाढत्या महागाईबरोबर वाढत जातो. तसेच खर्च त्याला अनुसरून होत नाही. पर्यायाने अनुशेष वाढत जातो. विदर्भात आदिवासी भागातील अर्भक मृत्यूदर ८३ आणि बालमृत्यूदर १०५ आहे. तसेच दलित व आदिवासी समाजाची लोकसंख्या जास्त आहे. आणि त्यांच्या गरजा व समस्यासुद्धा वेगळ्या आहेत. विदर्भात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत शेतीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या अधिक आहे. पश्चिम

महाराष्ट्रात एक लाख लोकसंख्येमागे १२३२१ तर विदर्भात २२८१७ शेतमजूर शेतीवर अवलंबून आहेत. वास्तविक विदर्भाचा निसर्ग उद्योगधंद्यांना पोषक असाच आहे. शेतीतून, जंगलातून आणि जमिनीतून भरपूर कच्चामाल उपलब्ध करून देणारा विदर्भ प्रकिया करणाऱ्या उद्योगधंद्यांअभावी मागासलेला असल्याचे दिसून येते. नव्हे तर उद्योजकांना आकर्षित करण्यात राज्यकर्त्यांना अपयश आले आहे. उर्वरित महाराष्ट्रात आवळा, बोर, द्राक्षे, आंबा, चिक्कु, डाळींब, कांदा यावर प्रकिया करणारे उद्योग धंदे सहकारी व खासगी स्वरूपात उभे राहिले आहेत. परंतु विदर्भाचे बलस्थान असलेल्या कापूस आणि धान यावर आधारित प्रक्रिया उद्योग विकसित झाले नाही. सोयाबीन पासून उपउत्पादने काढण्यास भरपूर वाव असतांना सोयाबीनवर आधारित प्रक्रिया उद्योग उभे झाले नाही. संत्र्यावर प्रक्रिया उद्योग निर्माण करण्यात विदर्भाला अपयश आले आहे. दुसरीकडे विदर्भात अंगीकारण्यात आलेल्या वनधोरणामुळे येथील खनिज उद्योग, पाटबंधारे प्रकल्प आणि वनावर आधारित उद्योगाच्या विकासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. उलट विदर्भाच्या या श्रीमंतीचा उपयोग पश्चिम महाराष्ट्राने श्रीमंत होण्याकरिता करून घेतला आहे. विदर्भातील खजिनसंपती (कोळसा, मॅगनीज, चुनखडी) व वनसंपत्ती कच्च्या मालाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात निर्यात केली गेली आहे. यातून पुढे ती नामशेष होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

तक्ता क्र.२ वरून महाराष्ट्रातील अनुशेष अभ्यासाव्यतिरिक्त इतर काही बाबींची महसूल विभागनिहाय स्थितीवरुन असे लक्षात येते की, विदर्भातील अमरावती आणि नागपूर विभागात स्त्री-पुरूष प्रमाण हे इतर विभागापेक्षा आणि महाराष्ट्राच्या सरासरीपेक्षा जास्त आहे. तसेच साक्षरतेचे प्रमाण नाशिक, पुणे व औरंगाबाद विभागापेक्षा जास्त आहे. परंतु सहकार व औद्योगिक क्षेत्रातील रोजगारामध्ये विदर्भ मागे आहे. तसेच सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगधंद्यांमध्ये विदर्भात मोठा वाव असतांना सुद्धा स्थिती समाधानकारक नाही. विदर्भातील सहकार क्षेत्र पुणे, नाशिक, औरंगाबाद व कोकण विभागपेक्षा मागासलेले आहे. औद्योगिक क्षेत्रात उभारण्यात

**तक्ता क्र.२(अ) महाराष्ट्रातील महसूल प्रादेशिक विभागाची स्थिती**

| अ. क्र. | महसूल विभाग | लोक-संख्या (लाख) | स्त्री-पुरूष प्रमाण | लोक-संख्या घनता | साक्षरता | पशुधन (लाख) | सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योगधंदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोकण | २८६ | ८९४ | ९३१ | ८७ | २१.३६ | २१६०३ |
| २. | नाशिक | १८६ | ९३८ | ३२३ | ७८ | ८४.१६ | २१४६७ |
| ३. | धुळे | २३४ | ९४१ | ४०९ | ८३ | ८२.५२ | ७५०८० |
| ४. | औरंगाबाद | १८७ | ९३१ | २८९ | ७६ | ७७.९९ | ३०३३५ |
| ५. | अमरावती | ११३ | ९४४ | २४५ | ८५ | ४५.६८ | ७४२९ |
| ६. | नागपूर | ११८ | ९६४ | २२९ | ८५ | ४९.८४ | १७२०८ |

*(स्त्रोत : महाराष्ट्र राज्य आर्थिक पाहणी २०१३-१४)*

## तक्ता क्र.२(ब) महाराष्ट्रातील महसूल प्रादेशिक विभागाची स्थिती

| अ. क्र. | महसूल विभाग | विशेष आर्थिक क्षेत्र SEZ | सेझकरिता प्रस्तावित गुंतवणूक (कोटी) | सहकार उद्योग | | उद्योग धंदे (औद्योगिक क्षेत्र) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भाग भांडवल कोटी | रोजगार | युनिट | गुंतवणूक (कोटी) | रोजगार (लाख) |
| १. | कोकण | ६० | ८२८१४ | १.०१ | ११९५५ | ११६४२ | २०३०२ | २.८७ |
| २. | नाशिक | ०६ | २८८२ | ४.९२ | ४२२९५ | ७००० | १६२७७ | ०.७१ |
| ३. | धुळे | ३७ | ४२८४३ | ७.८४ | ५७१५० | ९११८ | ३९०३१ | ३.७४ |
| ४. | औरंगाबाद | ११ | ३६५५ | १.०३ | २२४९० | ६४७९ | ९८४४ | १.१४ |
| ५. | अमरावती | २ | २३६० | ०.२३ | ६७७ | १८१० | ३१२६ | ०.२४ |
| ६. | नागपूर | ८ | ९२३५ | ०.९७ | ३३१५ | ३१७१ | ८८४९ | ०.६९ |

*(स्त्रोत : महाराष्ट्र राज्य आर्थिक पाहणी २०१३-१४)*

आलेले युनिट कमी आहे तात्पर्य औद्योगिक क्षेत्रात सर्वात कमी गुंतवणूक अमरावती विभागात असून त्यानंतर नागपूरचा क्रम लागतो. सेझ सुद्धा विदर्भात निर्माण झाले नाही. उद्योग क्षेत्रामध्ये अतिमागास प्रदेश असणाऱ्या परंतु वीज उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या विदर्भात मोठ्या प्रमाणात अतिरिक्त औष्णीक वीज प्रकल्प उभे राहत आहे ही विसंगती विदर्भ प्रदेशातच दिसून येते. विदर्भातील कोळसा काळा हिरा आणि कापूस पांढरी सोनं म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु कोळश्यावर आधारित वीज प्रकल्प उभे करतांना कापसावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची तत्परता राज्य शासनाने किंवा राज्यकर्त्यांनी दर्शविली नाही ही शोकांतिका आहे. वनसंपदा मुबलक असतांना पशुधन मात्र कमी आहे. विदर्भात दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन आणि मस्यव्यवसाय विकसित न झाल्यामुळे तो शेतीला पुरक ठरू शकला नाही. पर्यायाने संपूर्ण महाराष्ट्रात विदर्भातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून आल्यात हा महाराष्ट्रातील आंतर विषमतेचा परिपाक होय. नव्हे तर महाराष्ट्रात विदर्भाच्या अनुशेष वाढीचे दुष्टचक्र तयार होत आहे. असंख्य समस्या आणि प्रादेशिक असमतोल यामुळे निर्माण झालेला आर्थिक विषमतेचा प्रश्न विदर्भासमोर आहे. जागतिकीकरण, मुक्त व्यापार पद्धती आणि खाजगी करणाचे वारे आजच्या अर्थव्यवस्थेतून दिसून येत असतांना परत एकदा अशा समस्यांच्या प्रश्नांना वेगळ्या प्रकारे शोधण्याची वेळ आली आहे. त्या करीता काही उपायांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

१) विदर्भातील रखडलेले सिंचनाचे प्रकल्प पुर्ण करून नवीन सिंचन प्रकल्पाला मंजूरी देतांना त्याचा भविष्यात उपयोग हा विदर्भाच्या दृष्टीने होईल याची दक्षता घ्यावी. कारण प्रकल्पाच्या मुळ खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. जलसिंचनाचा अनुशेष पुर्ण करून राज्यपालाच्या निर्देशाचे पालन करण्यात यावे. सहनशील वैदर्भीयांचे प्रश्न योग्य वेळी समजून

घेणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागील अनेक कारणांपैकी सिंचनाचा अभाव हेही एक मुख्य कारण आहे.

२) वीज हा आर्थिक विकासाचा आधारस्तंभ आहे. उपलब्ध विजेपैकी केवळ १९ टक्के वापर शेतीकरीता होतो. त्यामध्ये वाढ करून कृषीपंपांचा अनुशेष कमी करण्यास मदत होईल.

३) विदर्भात उपलब्ध असणाऱ्या खनिज संपत्तीचा उपयोग करण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग त्याच परिसरात निर्माण करून स्थानिक तरूणांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल. तसेच नागपूर (बुटीबोरी व हिंगणा) तसेच मिहान प्रकल्प आणि अमरावती (नांदगाव पेठ) औद्योगिक क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे.

४) विदर्भातील वने आणि डोंगराळ भाग तसेच निसर्ग निर्मित्त ठिकाण आणि धार्मिक स्थळे *साहस पर्यटनासाठी* अनुकूल आहेत. प्रदुषणमुक्त पर्यटन स्थळ ही आज पर्यटकांची गरज आहे. विदर्भातील पर्यटनाचा निधी इतर विभागाकडे आजपर्यंत जो वळता केला तो विदर्भाला परत देण्यात यावा पर्यायाने पर्यटन उद्योग विकसित होऊन अनुशेष कमी होण्यास मदत होईल.

५) विदर्भातील उत्पादित होणाऱ्या कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे विदर्भातच उभारले जावेत. उदा. कापसावर आधारित सुतगिरण्या, कापड गिरण्या, संत्र्यावर प्रक्रिया उद्योग, ज्वारीपासून माल्ट व इथेनॉल, सोयाबीनपासून उपउत्पादने सोयामिल्क, सोयावडी, पौष्टीक आहार, तेलगिरण्या इत्यादी उद्योग उभारल्यास रोजगार निर्मिती होण्यास मदत होऊ शकते.

६) विदर्भातील प्रस्तावित औष्णीक वीज प्रकल्पामुळे जमिनीची सुपिकता नष्ट होण्या बरोबर मोठ्या प्रमाणात शेतजमीन अकृषिक होईल त्यामुळे विदर्भ वासीयांचे उदरनिर्वाहाचे साधन गमाविण्याची वेळ येईल. तसेच एवढ्या मोठ्या प्रकल्पांना लागणाऱ्या पाण्यामुळे सिंचन क्षेत्र कमी होईल एवढेच नव्हे तर पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होईल. यासर्व बाबींचा परिणाम विदर्भ पुन्हा मागासलेलाच राहील. निसर्गरम्य विदर्भात प्रदूषण मोठ्या प्रमाणात निर्माण होईल. प्रस्तावित वीज प्रकल्प रद्द करावे.

७) गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी भागात जेथे नक्षलवाद्यांचे प्रमाण अधिक आहे. त्या भागामध्ये मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून उद्योगधंदे काढल्यास नक्षलवाद किंवा गुंडागिरी कमी होण्यास काहीसा हातभार लागू शकेल.

थोडक्यात विदर्भातील राज्यकर्त्यांची आर्थिक विकासाच्या संदर्भात एकजुट दिसून येत नाही. त्यांच्या दृष्टीने उद्योगधंद्याच्या उभारणीपेक्षा शैक्षणिक संस्थांची उभारणी व त्यांच्या गुणात्मक विकासापेक्षा संख्यात्मक विकास हाच मुख्य विषय असल्याचे दिसून येते. प्रगतीशील महाराष्ट्रात विदर्भाचा आर्थिक विकास अतिशय मंदगतीने झालेला आहे. विकास खर्चात विदर्भाला पुरेसा वाटा मिळत नसल्याची तक्रार असंतोषाचे रूप घेऊ लागले आहे. म्हणून विकास हा समतोलच झाला पाहिजे निधीचे आवंटन करताना ज्या भागात

अनुशेष तेथे रक्कम खर्च होत नाही निधीचे वाटप प्रगत प्रदेशात देखील होत असल्याने राज्याची सरासरी वाढत जाऊन अप्रगत प्रदेश राज्याच्या सरासरीपर्यंत पोहचत नाहीत. हीच स्थिती विदर्भाचे अनुशेषाचे बाबतीत घडून आल्याचे दिसून येते. म्हणून महाराष्ट्र एकसंघतेने वागला तर तो देशातील सर्व राज्यांत पुढे जाऊ शकतो.

संदर्भ सूची:


१) खांदेवाले श्रीनिवास, यांचे वेगळया विदर्भाच्या संदर्भातील व्याख्याने

२) हनवंते कमलाकर, ३३ *वे अधिवेशन विदर्भ अर्थशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषण*

३) वैद्य एन.बी., *विदर्भाची अर्थव्यवस्था*, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

४) *आर्थिक पाहणी अहवाल*, २०१२-१३, महाराष्ट्र राज्य

५) दैनिक सकाळ, नागपूर

६) *विदर्भ वैधानिक विकास मंडळ*, नागपूर, वार्षिक अहवाल २०११-१२.


## निवेदन: अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# महाराष्ट्रातील ग्रामीण पायाभुत सुविधा

**दीपक भुसारे, पैठण,**
अर्थशास्त्र विभाग,
प्रतिष्ठान महाविद्यालय, ता.पैठण
जि.औरंगाबाद.
भ्रमणध्वनी: ९४०५२७६३२०
ई-मेल: dr.deepak.bhusare@gmail.com

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र राज्य हे भारतातील औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचे राज्य म्हणुन ओळखले जाते. राज्यातून मोठ्या प्रमाणात निर्यात होते तसेच परकीय गुंतवणूक देखील सर्वाधिक महाराष्ट्र राज्यात केली जाते. महाराष्ट्रात शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाच्या विचाराचा वारसा लाभलेला आहे. म्हणून महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो. भौगोलिक दृष्ट्या बघता महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी आहे. ती भारताच्या एकुण लोकसंख्येच्या ९.३% एवढी आहे. राज्यांचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ३.०८ लक्ष चौ.किमी आहे. ४५.२% लोक नागरी भागात राहतात तर उर्वरीत ५४.८% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास हा आमचा केंद्रबिंदू असायला हवा परंतु तसे आपणास दिसून येत नाही. राज्यात आज एकूण ३६ जिल्हे असुन सहा महसुली विभाग आहे. ग्रामीण भागाचा विकासासाठी राज्यात ३४ जिल्हा परिषद, ३५१ पंचायत समित्या व २७,८७३ ग्रामपंचायती आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते राज्यांचे चालू किंमतीनुसार २०१३-१४ या वर्षाचे अंदाजित स्थूल उत्पन्न १५,१०,७३२ कोटी रुपये आहे. राज्याच्या उत्पन्नात औद्योगिक व सेवा क्षेत्राचा हिस्सा ८८.७% असून कृषी व संलग्न कार्य क्षेत्राचा हिस्सा ११.३ टक्के आहे. तसेच पहिल्या सुधारित अंदाजानुसार स्थिर किंमतीनुसार राज्यांचे दरडोई उत्पन्न १,१७,०९१ ऐवढे आहे. परंतु प्रत्यक्षात २०१३-१४ या

वर्षात दरडोई उत्पन्न ८०,३८८ रुपये आहे. तसेच महाराष्ट्र राज्यावर कर्जाचा बोजा २०१४-१५ मध्ये ३,००,४७७ कोटी आहे हे कर्जाचे प्रमाण १०.६% दराने दरवर्षी वाढत आहे. २०१४-१५ मध्ये २३,८०५ कोटी रु. कर्जावरील व्याज होते. अशा स्वरुपाची महाराष्ट्राची आर्थिक पार्श्वभूमी असल्यामुळे महाराष्ट्रात पायाभुत क्षेत्रात जास्त गुंतवणूक होत नाही.

प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पायाभूत संरचना संदर्भात सद्यस्थिती काय आहे याचा संपूर्ण आढावा घेण्यात आला आहे. त्याच प्रमाणे पायाभूत संरचना निर्माण करत असतांना कोणकोणती आव्हाने समोर आहे याचा उहापोह यामध्ये करण्यात आला आहे. यासाठी द्वितीय साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील विकासासंदर्भात झालेल्या अभ्यासाचा आढावा:**

महाराष्ट्राच्या विकासासाठी १९५१ मध्ये एन.पी. रणभिसे समितीने अभ्यास केला होता. त्यांना मराठवाडा व विदर्भात पायाभूत सुविधाचा मोठा अभाव दिसून आला होता. १९५३ मध्ये महाराष्ट्रातील विभागाचा समतोल विकासासाठी नागपूर करार करण्यात आला. ३ जुन १९६० मध्ये मुंबईतील व्यापाऱ्याच्या परिषदे मध्ये चिंतामणराव देशमुख यांनी देखील पायाभूत सुविधा विकासाचा मुद्दा उपस्थित केला होता. *नॅशनल कौन्सिल फॉर ॲप्लाईड रिसर्च दिल्ली* या संस्थेने महाराष्ट्र राज्यांची १९६३ मध्ये टेक्नो इकॉनॉमिक पाहणी करुन पायाभुत सुविधाची फार मोठ्या प्रमाणात कमतरता आहे असे अहवालात सांगितले. डोंगरकीरीची समितीने १९६५ आणि श्री.पांडे समितीने १९६९ मध्ये महाराष्ट्रातील विभाग निहाय पायाभूत संरचनेचा अभ्यास केला. त्यांना देखील पायाभूत सुविधाचा मोठा अभाव दिसून आला. १९७८ मध्ये सेंटर फॉर मॉनिटरींग इकॉनॉमी संस्थेने देखील प्रदेशनिहाय आधारभूत संरचनेच्या अभ्यास केला. १९८३ मध्ये प्रा.व्ही.एम.दांडेकर समितीने देखील महाराष्ट्राच्या प्रादेशिक विषमतेचा अभ्यास करुन पायाभूत सुविधांवर भर देण्याची शिफारस केली आहे. १९९९ मध्ये कुलकर्णी समितीने देखील पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे अशी शिफारस केली आहे. डॉ.विजय केळकर समिती (२०१३) मध्ये महाराष्ट्रातील प्रादेशिक विषमतेचा अभ्यास करत असतांना ग्रामीण भागात पायाभूत सुविधाचा मोठा अभाव आहे असे सांगितले आहे. गेल्या ६८ वर्षात महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा विकास वेगवेगळ्या समित्या स्थापन करुनही महाराष्ट्रात अद्याप पुरेशा पायाभुत सुविधा उपलब्ध झाल्या नाही.

**पायाभूत संरचना** (Infra-structure):

पायाभूत या शब्दाचा अर्थ अत्यंत व्यापक आहे. त्यामुळे कोणत्याही देशाचा विकास पायाभूत संरचने शिवाय होऊ शकत नाही. Infra-structure मधील Infra हा लॅटीन शब्द असून त्याचा अर्थ तळ पाया असा आहे तर structure हा इंग्रजी शब्द असुन त्याचा अर्थ ढाचा किंवा रचना होय. देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक विकास हा ज्या घटकांवर अवलंबुन असतो त्या सर्व घटकांचा समावेश पायाभूत संरचनेमध्ये केला जातो डॉ.बी.एम. जोशी यांनी पायाभूत संरचना तीन प्रकारच्या सांगितल्या आहे.

१. आर्थिक पायाभूत संरचना: मुलभूत व अवजड उद्योग, उर्जा, वाहतुक दळण वळण, जलसिंचन, खते, बियाणे, किटक नाशके.

२. सामाजिक पायाभूत संरचना: शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, स्वच्छता, मानवी विकास.

३. संस्थात्मक पायाभूत संरचना: यामध्ये संशोधन संस्था सामान्य प्रशासन वित्तीय संस्था, बाजारपेठ, औद्योगिक वसाहती.

## महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा सद्य स्थितीचा आढावा:

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधाची आवश्यकता आहे. ज्यामध्ये पाणी पुरवठा, रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, दळण वळण, उर्जा, शिक्षण, आरोग्य, मानव विकास, दारिद्र्य, जलसिंचन व वित्तीय पायाभूत सुविधा इत्यादीचा समावेश होतो. या पायाभूत सुविधाची महाराष्ट्रातील सद्यस्थिती कशी आहे. याचा आढावा पुढील प्रमाणे आहे.

१) वाहतूक व दळणवळण:

वाहतूक व दळणवळण हे बाजारपेठा व जनतेला जोडण्याचे महत्वाचे माध्यम आहे. कार्यक्षम व्यवस्थेशिवाय रोजगार व संपत्ती वाढविणारी भरीव आर्थिक वृध्दी होणे शक्य नाही. आज महाराष्ट्रात ग्रामीण भागात शहरी भागात देखील रस्ता व्यवस्था अत्यंत खराब झाली आहे. आजही अनेक गावे रस्त्याने जोडलेली नाही स्वातंत्र्य मिळून ६८ वर्ष झाली तरीही या मुलभूत सुविधा आजही अनेक गावापर्यंत पोहचलेली नाही.

मार्च २०१४ अखेर ९९.७ पेक्षा जास्त गावे बारमाही व हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती. तसेच अद्यापही २५० गावे रस्त्यांनी जोडलेली नाही. सन २०१३-१४ मध्ये ४४५० कोटी

**तक्ता क्र. १: सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभाली खालील रस्त्यांची लांबी (कि.मी.)**

| वैधानिक विकास मंडळ | ३१ मार्च रोजी | रस्त्याचे प्रकार | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकुण |
| विदर्भ | २०१३ | ८८३ | २१४२ | ७७४२ | ११४०५ | १३४९५ | २६१८५ | ६१८५२ |
| | २०१४ | १२९८ | २१३७ | ९७२७ | ११४७८ | १४७६८ | २६५११ | ६५९११ |
| मराठवाडा | २०१३ | ७९५ | १७५७ | ६३१६ | १३७७५ | ८७७९ | २२३७० | ५३७९२ |
| | २०१४ | १२९७ | १७५७ | ७७७८ | ११५२७ | १२२५१ | २४७२० | ५९३३० |
| उर्वरित महाराष्ट्र | २०१३ | २६९८ | २७९५ | १३४७० | २५०७६ | २५२९९ | ५८१९० | १२७५२८ |
| | २०१४ | ३२६३ | २४४३ | १६४५८ | २७२२७ | २५७४२ | ६३३२६ | १३८४५९ |
| एकुण | २०१३ | ४३७६ | ६६९४ | २७५२८ | ५०२५६ | ४७५७३ | १०६७४५ | २४३१७२ |
| | २०१४ | ५८५८ | ६३३७ | ३३९६३ | ५०२३२ | ५२७६१ | ११४५५७ | २६३७०८ |

*स्त्रोत - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २०१४-१५ पृ. १३२*

तक्ता क्र.२: प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत बांधलेल्या रस्त्यांची लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या (डिसेंबर- २०१४ पर्यंत)

| विभाग | रस्त्यांची लांबी किमी | लोक वस्त्यांची संख्या |
|---|---|---|
| विदर्भ | ७१६७ | २६७४ |
| मराठवाडा | ४८९१ | १८०९ |
| उर्वरीत महाराष्ट्र | १०५७१ | ३४८९ |
| एकुण | २२६२९ | ७९७२ |

*स्त्रोत - महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०१४-१५ पृ. १३३*

रस्त्यासाठी निधी मंजूर होता. त्यापैकी ३१०८ कोटी रु. खर्च करण्यात आला. वरील रस्त्यांच्या आकडेवारीवरुन असे दिसून येते की रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात झाली मात्र त्यांची गुणवत्ता चांगली नसल्यामुळे आजही हे रस्ते मृत्यूचा सापळा बनली आहे. अजूनही कित्येक गावे रस्त्यांना देखील जोडलेली नाही. आर्थिक विकासात रस्ते ही रक्तवाहिन्याप्रमाणे कार्य करतात. ग्रामीण व शहरी भागाला जोडण्याचे महत्वाचे काम रस्ते करत असते त्यामुळे दळण वळण व्यवस्थित होते. परंतु रस्त्यांच्या बाबतीत महाराष्ट्रात स्थिती समाधानकारक नाही म्हणून ह्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, खास करुन ग्रामीण भागासाठी ही सडक योजना आहे. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यामध्ये सर्वाधिक रस्त्यांची लांबी उर्वरित महाराष्ट्रात झाली असुन सर्वात कमी रस्त्यांची लांबी मराठवाड्यात झाली आहे. त्यामुळे मराठवाडा विदर्भातील विकासाचा अनुशेष अजूनही मोठ्या प्रमाणात बाकी आहे. त्यामुळे त्या भागात मोठ्या प्रमाणात रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने डिसेंबर २०१४ पर्यंत २० कामे पुर्ण केली असून त्यावर रु.७०१८ कोटी खर्च झाला आहे.

२) रेल्वे वाहतुक :

रस्ते वाहतुक नंतर रेल्वे वाहतुक ही अत्यंत महत्वाची आहे. रेल्वे वाहतुक हा वाहतुक व्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा कणा आहे. प्रवासी व मालवाहतुक ही रेल्वेची दोन प्रमुख अंगे आहेत. ३१ मार्च २०१४ रोजी राज्यातील लोहमार्गाची एकूण लांबी ६१०३ किमी (३७८ किमी कोकणसह) होती. ती भारतातील एकूण ६५,८०८ किमी लांबीच्या ९.३% एवढी आहे. मागील ६८ वर्षात केवळ १८.४% लोहमार्गाच्या लांबीत वाढ झाली आहे. सध्या राज्यात अमरावती- नरखेड (१३८ किमी) अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ (२६१.२५ किमी) बारामती-लोणंद (५४ किमी)बारामती-सीवूड-उरण (३५.४६ किमी) पनवेल-रोहा (७५.४४ किमी) इ. नवीन रेल्वे मार्गाचे काम सुरु आहे. साधारणपणे ग्रामीण भागांना जोडण्यासाठी रेल्वे वाहतूक महत्वाची आहे

तसेच सर्वात स्वस्त वाहतूक म्हणून रेल्वेकडे पाहिले जाते. त्यामुळे महाराष्ट्रात आणखी रेल्वेचे जाळे वाढणे आवश्यक आहे त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लागेल.

३) दळणवळण सुविधा:

दळणवळण सुविधामध्ये टपाल, तार, दुरध्वनी, दृक व माहिती दुरसंचार यांचा समावेश होतो. महाराष्ट्रात २०१३-१४ या वर्षात एकूण १२५९८ डाक कार्यालय होते. त्यापैकी ११३५५ डाक कार्यालय हे ग्रामीण भागात आहे. टपाल व्यवस्था ही ग्रामीण भागात दळणवळणासाठी महत्वाची पायाभूत सुविधा आहे. तसेच एकुण टपाल पेट्यांची संख्या ४८८२८ एवढी आहे. त्यापैकी ग्रामीण भागात ४०११९ एवढ्या पेट्या आहे. तसेच २५५०८ एवढी पोस्टमॅनची संख्या असून त्यापैकी १९०३४ एवढे पोस्टमॅन ग्रामीण भागासाठी आहे.

सप्टेंबर २०१४ पर्यंत दुरध्वनी जोडणी संख्या ५२.६३ लाख होती. २०१३-१४ या वर्षात दुरध्वनी ५३.७४ लाख व भ्रमणध्वनी १०३४.७८ एवढी संख्या आहे. तसेच ३० सप्टेंबर २०१४ रोजी इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ३.७२ कोटी होती ही संख्या इतर राज्यापेक्षा सर्वाधिक आहे. मात्र इंटरनेट सुविधा जास्त प्रमाणात शहरी भागातच आहे. ग्रामीण भागात या सुविधेचा अभाव आहे.

४) शिक्षण सुविधा:

सर्वसमावेशक वृध्दी व सामाजिक क्षेत्राचा जलद विकास व असमानता दुर करण्यासाठी शिक्षण महत्वाची भूमिका बजावते शिक्षण सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. राज्यात २०११ च्या जनगणना नुसार राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के असुन तो राष्ट्रीय स्तरावरील साक्षरतेच्या सरासरीपेक्षा (७३.०%) जास्त आहे.

खालील तक्त्यावरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र शासनाने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यावर खालीलप्रमाणे खर्च केला असला तरी २०१०-११ मध्ये राज्याचा शिक्षणावरील खर्च सकल राज्य उत्पन्नाच्या २.९% एवढा होता. उच्च शिक्षण संस्थांच्या बाबतीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असून विद्यार्थी प्रवेशाच्या बाबतीत मात्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी १०.६ टक्के लोकांचा पदवी व त्या पुढील शिक्षणात सहभाग असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात प्रती लाख लोकसंख्येमागे ३५ महाविद्यालये सह देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. उच्च शिक्षणाबाबत

तक्ता क्र.३ राज्य शासनाचा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च

(कोटी रुपये)

| विवरण | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|
| प्राथमिक | १५,२८८ | १४५५२ |
| माध्यमिक | १०७२० | ११२०३ |
| उच्च माध्यमिक | १७६५ | १९६३ |

*स्त्रोत - महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल २०१४-१५ पृ. १४९*

राज्यात २० विद्यापीठे असून त्यापैकी चार कृषी विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ आणि १३ अन्य सर्व साधारण विद्यापीठ असून त्यामध्ये केवळ महिलांसाठी असणारे एक विद्यापीठ आहे व अनौपचारीक शिक्षणासाठी असलेले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आहे. राज्यात २१ अभिमत विद्यापीठे आहेत. आज शाळा महाविद्यालयावर जरी मोठ्या प्रमाणात खर्च होत असला तरी अजून ही अनेक शाळा व महाविद्यालयातून स्वतःची इमारत, स्वच्छतागृह, शिक्षक इत्यादी पायाभूत सुविधा नाही. तसेच आता खाजगी विद्यापीठ विधेयक मंजुर झाले आहे. या माध्यमातून सरकार शिक्षणाच्या जबाबदारीतून हात झटकत आहे असे दिसून येत आहे. शिक्षणाचे खाजगीकरण म्हणजे सर्व सामान्या पासुन शिक्षणाचा अधिकार काढुन घेणे होय. शिक्षण देणे ही सरकारचीच जबाबदारी आहे. परंतु आज महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे.

५) आरोग्याची सुविधा:

सामाजिक पायाभुत सुविधामध्ये आरोग्य सुविधा हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजातील वंचित घटकांसाठी विनामूल्य आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देणे ही राज्य शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. राज्य शासनाने जीवनदायी आरोग्य योजना, नव संजीवन योजना इ. आरोग्य विषयक योजना सुरु केल्या आहे. महाराष्ट्र राज्यात आरोग्यावर (२०१०-११) मध्ये सकल राज्य उत्पन्नाच्या (SGDP) फक्त ०.८१ टक्के खर्च झाला आहे. राज्यामध्ये प्राथमिक उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व सामाईक आरोग्य केंद्र त्रिस्तरीय सार्वजनिक आरोग्याची सुविधा उपलब्ध आहे. शासकीय आरोग्य सुविधांचा सर्वाधिक उपयोग ग्रामीण भागात केला जातो. त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांच्या दृष्टीने ही सुविधा महत्त्वाची आहे. राज्यामध्ये ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत आरोग्य उपकेंद्राची संख्या १०५८०, फिरते आरोग्य पथक- १३, प्राथमिक आरोग्य केंद्र- १८११, ग्रामीण रुग्णालय ३६०, ५० खाटांचे ५८ उपजिल्हा रुग्णालय, १०० खाटांचे २८ उपजिल्हा रुग्णालय आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासाठी २०१४-१५ मध्ये रु.५६१.९२ कोटी खर्च केले आहे. तसेच राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना साठी २०१४-१५ मध्ये रु.४७०.३८ कोटी खर्च झाला. वरील उपक्रम संख्येच्या तुलनेत या सुविधा अत्यंत कमी आहे. राज्यात आठ जिल्ह्यामधेच जीवनदायी आरोग्य योजनेचा समावेश करण्यात आला. शासनाची आरोग्य सुविधा ११.२४ कोटी लोकसंख्येसाठी अत्यंत तोकडी आहे. म्हणून आरोग्य सुविधामध्ये जास्त गुंतवणूक सरकारने करणे आवश्यक आहे.

६) पाणी पुरवठा:

राज्यात सध्या दुष्काळामुळे विदर्भ व मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे जमिनीत पाण्याची पातळी फार खाली गेली आहे. मराठवाड्यातील ११ मोठे प्रकल्पात पाण्याचा साठा फार कमी झाला आहे. जायकवाडीच्या नाथसागरात फक्त १३% उपयुक्त जलसाठा संपुर्ण मराठवाड्याची तहान भागविणाऱ्या ह्या प्रकल्पाची ही अवस्था आहे. औरंगाबाद जिल्ह्यात सध्या

३५८ टँकरने ५,५१,५६३ लोकसंख्येची तहान भागविली जाते. विशेष म्हणजे जायकवाडी प्रकल्प असलेल्या पैठण तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ९० टँकर सध्या सुरु आहे. महाराष्ट्रात इतर भागात पाणी पुरवठा व्यवस्था ढासळलेली आहे. शहरे मोठ्या प्रमाणात वाढत मात्र पाणी पुरवठा त्या प्रमाणात वाढत नसल्यामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. मराठवाड्यात ५१ तालुक्यात ४३६५ गावे टंचाई ग्रस्त आहे हजारो कोटी रु. खर्च करुन देखील नागरिकांची पाण्यासाठी भटकंती थांबली नाही.

**पायाभुत सुविधेसमोरील आव्हाने:**

१. महाराष्ट्रातील रस्त्याची स्थिती बरोबर नाही रस्त्यांच्या कामातील भ्रष्टाचार व रस्त्यांची गुणवत्ता हे मोठे आव्हान आहे.

२. महाराष्ट्रात संपुर्ण जिल्हे रेल्वे मार्गाने जोडणे आवश्यक आहे.

३. ग्रामीण भागात गावांना जोडणारे रस्ते निर्माण करणे आवश्यक आहे आजही अनेक गावांना जाण्यासाठी रस्ते नाही.

४. राज्यातील १२ कोटी लोकसंख्येसाठी शासकीय आरोग्य सुविधा अत्यंत कमी आहे त्यामुळे अनेकांना सुविधांअभावी आपला जीव गमवावा लागत आहे. आरोग्यावरील खर्चात वाढ करणे आवश्यक आहे.

५. आरोग्य सुविधा सक्षम नसल्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या कुपोषणाचे प्रमाण आहे. युनोच्या अहवाला नुसार १६ लाख ५५ हजार बालकांच्या कुपोषणाने मृत्यू झाला आहे. मेळ घाटात हजारो बालके कुपोषणाने मरत आहे त्यामुळे सक्षम आरोग्य सुविधा पुरविणे हे सरकार समोरील मोठे आव्हान आहे.

६. शिक्षणाच्या बाबतीत नुकताच प्राथमिक शिक्षणासंदर्भात प्रथम संस्थेने दिलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र प्राथमिक शिक्षणात बिहारच्या पाठीमागे आहे असा खुलासा केला आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षणात सुधारणा होणे आवश्यक आहे.

७. शिक्षण क्षेत्राचे आज बाजारीकरण झाले आहे शिक्षक, प्राध्यापक होण्यासाठी लाखो रुपये शैक्षणिक ठेकेदारांना द्यावे लागतात. त्यामुळे गुणवत्ता धारक शिक्षकांची कमतरता आहे अशा व्यवस्थेकडून गुणवत्तापुर्ण शिक्षणाची अपेक्षा ही मृगजळासारखी आहे. म्हणुन ही व्यवस्था सुधारली पाहीजे.

८. महाविद्यालय शाळांना स्वत:च्या मालकीच्या इमारत नसतांना कागदोपत्री इमारत दाखवून, तीन रुममध्ये वरीष्ठ महाविद्यालय सुरु आहे. अशा महाविद्यालयांना विद्यापीठाचे कायम संलग्न पत्र देखील असते त्यामुळे यातून गुणवत्ता कशी वाढेल?

९. शिक्षणाचे खासगीकरण, कायम विना अनुदानित धोरण यामुळे शैक्षणिक गुणवत्ता खालवत चाललेली आहे.

थोडक्यात वाहतूक, दळण वळण, शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. परंतु स्वातंत्र्यानंतर ६८ वर्ष होऊन देखील या सुविधा अद्यापही पुर्ण झाल्या नाही. त्यातच ग्रामीण भागात या सुविधेचे तीन तेरा वाजले आहे. दरवर्षी या पायाभूत सुविधावर हजारो कोटी रुपये खर्च केले जाते. मात्र गुणवत्ता पूर्वक पायाभूत सुविधा निर्माण न केल्यामुळे हा सर्व खर्च व्यर्थ जात आहे. या सर्व पायाभूत

सुविधामध्ये संख्यात्मक बदल न होता गुणात्मक बदल होणे आवश्यक आहे. या पायाभूत सुविधांची गुणवत्ता तपासण्यासाठी एक सक्षम यंत्रणा निर्माण करुन त्या मार्फत पारदर्शकपणे ही गुणवत्ता तपासणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रात खड्ड्यात रस्ते की रस्त्यात खड्डे ही अवस्था सगळीकडे बघायला मिळते. दरवर्षी हजारो रुपये निविदा खड्डे बुजविण्यासाठी काढल्या जातात. मात्र खड्डे अद्याप रस्त्यावर आपणास दिसतात. त्यामुळे या पायाभूत सुविधा निर्माण करत असतांना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचारामुळे गुणवत्ता ढासळत आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्यातील राज्यकर्ते, बांधकाम व्यावसायिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची मानसिकता बदलून नैतिकतेने काम करणे आवश्यक आहे. असे झाल्यास राज्यात चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण होऊ शकेल. राज्यातील भ्रष्टाचार संपल्या शिवाय रस्ते, शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, इत्यादी पायाभूत सुविधा चांगल्या प्रकारे मिळू शकत नाही. त्यासाठी आणखी किती वर्षे वाट बघावी लागेल. ह्या प्रश्नाचे उत्तर येणारा काळच ठरवेल.

**संदर्भ सूची:**


१. *महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल* २०१४-१५
२. *लोकराज्य* ऑक्टोबर २०१२
३. *योजना* विविध अंक
४. डॉ. विलास खंदारे, *भारतातील उच्च शिक्षण विकास आणि आव्हाने*, अध्यक्षीय भाषण मराठवाडा अर्थशास्त्र परिषद ३२ वे अधिवेशन
५. दै. *महाराष्ट्र टाईम्स* दि. २६ डिसेंबर २०१२
६. दै. *सकाळ* दि. ६ एप्रिल २०१५.
७. *Indian Economic Survey*- 2014-15


---


**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**अर्थसंवादसाठी अनुदान**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांचेकडून २०१४-१५ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.१,५०,०००/- चे अनुदान मंजूर झालेले आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी त्यांचा ऋणी आहे.

- डॉ. आर.बी.भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# चर्मकार समाजाच्या सामाजिक-आर्थिक विकासात संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे योगदान

**नामदेव सुपडू बोरसे**, जळगाव,
सहयोगी प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
मू.जे.महाविद्यालय,जळगाव.
ई-मेल: nsborse643@gmail.com

**श्रीराम देविदास जोशी**, जळगाव,
सहयोगी प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग,
मू.जे.महाविद्यालय,जळगाव
भ्रमणध्वनी- ९४२१००८७७६
ई-मेल: sdj.jalasri@gmail.com

चर्मकार समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रात १७००११० इतकी आहे. ही लोकसंख्या शहरी व ग्रामीण भागात विखुरलेली आहे. चर्मकार समाजाचा परंपरागत व्यवसाय ग्रामीण भागात पादत्राणे तयार करणे व शेतीला उपयुक्त असणारी साधने निर्माण करणे हा होता. शहरी भागात चर्मकार समाज कातडी कमावणे व त्यापासून सुबक पादत्राणे तयार करण्याचे काम करत होता. ग्रामीण भागात पूर्वी हा समाज बारा बलुतेदारांपैकी एक होता. भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर झालेल्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीमुळे ग्रामीण भागात बलुतेदारी पद्धत संपुष्टात आली. तसेच औद्योगिकीकरणामुळे चर्मोद्योग संघटीत क्षेत्राकडे गेल्यामुळे या समाजाचा रोजगार बुडाला व त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली. चर्मकार समाज अनुसूचित जातीत मोडत असून या समाजाची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे.

भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर शासनाने कल्याणकारी राज्याची सुरूवात केली. समाजातील दुर्बल व मागासलेल्या घटकांचा विकास करण्यासाठी शासनाने

विविध योजना आखल्या. या योजनांचा एक भाग म्हणजे विविध समाजाच्या उन्नतीसाठी विविध महामंडळाची स्थापना केली. चर्मकार समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी १ मे १९७४ रोजी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. जळगाव जिल्ह्यात या महामंडळाच्या कार्यालयाची सुरुवात २००६ मध्ये झाली. तेव्हापासून हे महामंडळ जळगाव जिल्ह्यातील चर्मकारांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी कार्य करत आहे.

जळगाव जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासात संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या भूमिकेचे अध्ययन करणे, हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे. तर जळगाव जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये महामंडळाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, हे गृहितक घेतले आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत अध्ययन जळगाव जिल्ह्यातील पाच तालुक्यातील २०० लाभधारक कुटुंबाकडून एकत्रित केलेल्या प्राथमिक आकडेवारीवर आधारित आहे. २०० लाभधारकांची निवड करतांना सुरुवातीला जिल्ह्यातील ज्या तालुक्यात महामंडळाने भरीव वित्तसहाय्य केले आहे व जास्त लाभधारक आहेत असे पाच तालुके निवडले आहेत. प्रत्येक तालुक्यातून महामंडळाच्या ४० लाभधारकांची निवड केली असे एकूण २०० लाभधारक नमुना म्हणून निवडले व त्यांची मुलाखत ऑक्टोंबर, नोव्हेंबर २०१४ मध्ये घेण्यात आली.

अभ्यासाची व्याप्ती जळगाव जिल्हा महामंडळाचे लाभधारक चर्मकार कुटुंबे यांच्यापुरती मर्यादित आहे.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ:**

हे महामंडळ जळगाव जिल्ह्यात एकूण सात योजना राबविते. सर्वेक्षण केले त्यावर्षी फक्त पाच योजनांचे लाभधारक जिल्ह्यात आढळले. महिला किसान योजना व शैक्षणिक कर्ज योजना यांचा एकही लाभधारक सर्वेक्षणाच्या वेळी आढळला नाही. ५० टक्के अनुदान योजना, बीजभांडवल योजना, मुदती कर्ज योजना, सूक्ष्म पतपुरवठा योजना, महिला समृद्धी योजना अशा पाच योजनेचे सर्वेक्षण केले त्यावेळी ८४० लाभधारक जिल्ह्यात होते. यापैकी सर्वेक्षणासाठी नमुना म्हणून २०० लाभधारकांची निवड केली आहे. या पाच योजनांच्या मार्फत २००६ ते २०१३ या कालावधीत महामंडळाने जळगाव जिल्ह्यात एकूण १,५६,७१,००० रुपयाचे वित्तसहाय्य केले आहे.

महामंडळाने चर्मकार समाजाचा सामाजिक व आर्थिक विकास कितपत झाला हे पाहण्यासाठी या समाजाच्या उत्पन्नात वाढ झाली का, राहणीमान सुधारले का, रोजगार मिळाला का, स्वयंरोजगार सुरु केला का, राहत्या घरात सुधारणा झाली का, शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ झाली का, सामाजिक पत निर्माण झाली का, दैनंदिन खर्च पूर्ण करण्यास मदत झाली का, बचतप्रवृत्ती वाढली का, या महत्त्वाच्या मुद्दांच्या अनुषंगाने अध्ययन करण्याचा प्रयत्न केला.

**जळगाव जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासात**

तक्ता क्र. १

जळगाव जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासात महामंडळाचे योगदान

| योजना | उत्पन्नात वाढ | राहणीमानात सुधारणा | रोजगार मिळाला | स्वयंरोजगार सुरु केला | घरात सुधारणा झाली | शिक्षण प्रमाणात वाढ झाली | सामाजिक पत निर्माण | दैनंदिन खर्च पूर्ण करण्यास मदत | बचत प्रवृत्तीत वाढ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५०% अनुदान | ६८ | ६९ | ६९ | ६९ | ७ | ६४ | ६९ | ६४ | २१ |
| योजना | ९८.५५ | १००.०० | १००.०० | १००.०० | १०.१४ | ९२.७५ | १००.०० | ९२.७५ | ३०.४३ |
| बीज भांडवल | १९ | १९ | १९ | १९ | ४ | १८ | १९ | १९ | १० |
| योजना | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | २१.०५ | ९४.७४ | १००.०० | १००.०० | ५२.६३ |
| मुदती कर्ज | २४ | २४ | २४ | २४ | १३ | २३ | २४ | २३ | १७ |
| योजना | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | ५४.१७ | ९५.८३ | १००.०० | ९५.८३ | ७०.८३ |
| महिला समृद्धी | १७ | १७ | १७ | १६ | ३ | १६ | १७ | १५ | ६ |
| योजना | १००.०० | १००.०० | १००.०० | ९४.१२ | १७.६५ | ९४.१२ | १००.०० | ८८.२४ | ३५.२९ |
| सूक्ष्म | ७१ | ७१ | ७१ | ६९ | ९ | ६४ | ७० | ६५ | ८ |
| पतपुरवठा योजना | १००.०० | १००.०० | १००.०० | ९७.१८ | १२.६८ | ९०.१४ | ९८.५९ | ९१.५५ | ११.२७ |
| **एकूण** | **१९९** | **२००** | **२००** | **१९७** | **३६** | **१८५** | **१९९** | **१८६** | **६२** |
| | **९९.५०** | **१००.००** | **१००.००** | **९८.५०** | **१८.००** | **९२.५०** | **९९.५०** | **९३.००** | **३१.००** |

*(स्रोत- सर्वेक्षणावर आधारित)*

## महामंडळाचे योगदान:

वरील तक्त्यामध्ये संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितच्या विविध योजनांमधून केलेल्या वित्तपुरवठ्यामुळे चर्मकारांवर झालेल्या सामाजिक व आर्थिक परिणामांचे वर्णन केले आहे.

पाहणी केलेल्या २०० लाभधारकांपैकी ९९.५० टक्के लाभधारकांनी उत्पन्नात वाढ झाली असे सांगितले. राहणीमान सुधारले व रोजगार मिळाला असे म्हणणारे १०० टक्के लाभधारक आहेत.९८.५० टक्के लाभधारकांनी स्वयंरोजगार सुरु केला आहे.१८ टक्के लाभधारकांनी घरात सुधारणा केली आहे. ९२.५० टक्के लाभधारकांनी शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याचे सांगितले आहे. ९९ टक्के लाभधारकांची सामाजिक पत निर्माण झाली आहे असे मत व्यक्त केले. ९३ टक्के लाभधारकांना दैनंदिन खर्च पूर्ण करणे महामंडळाच्या सहकार्यामुळे शक्य झाले तर ३१ टक्के लाभधारकांनी बचतप्रवृत्ती वाढली असे मत नोंदवले आहे.

योजनानिहाय निरीक्षण केले असता थोड्याबहूत प्रमाणात अशाच स्वरुपाचे चित्र दिसून येते. ५० टक्के अनुदान योजनेतील १ लाभधारकाव्यतिरिक्त इतर योजनेतील सर्व लाभधारकांनी उत्पन्नात वाढ झाल्याचे नमूद केले आहे. राहणीमानात सुधारणा व रोजगार मिळाला असे सर्व योजनांमधील सर्व लाभधारकांनी मत नोंदवले आहे. स्वयंरोजगार सुरु केला असे मत ५० टक्के अनुदान योजना, बीजभांडवल योजना व मुदती कर्ज योजनेतील १०० टक्के लाभधारकांनी

व्यक्त केले आहे तर महिला समृद्धी योजनेतील ९४.१२ टक्के, सूक्ष्म वित्तपुरवठा योजनेतील ९७.१८ टक्के लाभधारकांनी स्वयंरोजगार सुरु केला असे मत नोंदविले आहे.

घरात सुधारणा झाली असे म्हणणारे ५० टक्के अनुदान योजनेतील (१०.१४ टक्के), बीजभांडवल योजनेतील (२१.०५ टक्के), मुदती कर्ज योजनेतील ५४.१७ टक्के, महिला समृद्धी योजनेतील १७.६५ टक्के, सूक्ष्म वित्तपुरवठा योजनेतील १२.६८ टक्के लाभधारक आहेत.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितच्या योजनांचा लाभ घेतल्यामुळे शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ झाली असे म्हणणारे ५० टक्के अनुदान योजनेतील ९२.७५ टक्के, बीज भांडवल योजनेतील ९४.७४ टक्के, मुदती कर्ज योजनेतील ९५.८३ टक्के, महिला समृद्धी योजनेतील ९४.१२ टक्के तर सूक्ष्म वित्तपुरवठा योजनेतील ९०.९४ टक्के लाभधारक आहेत.

सूक्ष्म वित्तपुरवठा योजनेतील एका लाभधारकाचा अपवाद वगळता इतर योजनेतील १०० टक्के लाभधारकांनी महामंडळाच्या योजनांमुळे आमची समाजात पत वाढली असे मत व्यक्त केले आहे.

महामंडळाच्या सहकार्यामुळे दैनंदिन खर्च पूर्ण करण्यास मदत झाली असे म्हणणारे ९२.७२ टक्के ५० टक्के अनुदान योजनेतील, १०० टक्के बीजभांडवल योजनेतील, ९५.८३ टक्के मुदती कर्ज योजनेतील, ८८.२४ टक्के महिला समृद्धी योजनेतील तर ९१.५५ टक्के सूक्ष्म वित्तपुरवठा योजनेचे लाभधारक आहेत.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितच्या योजनांचा लाभ घेतल्यामुळे बचतप्रवृत्तीत वाढ झाली असे म्हणणारे ५० टक्के अनुदान योजनेतील ३०.४३ टक्के, बीज भांडवल योजनेतील ५२.६३ टक्के, मुदती कर्ज योजनेतील ७०.८३ टक्के, महिला समृद्धी योजनेतील ३५.२० टक्के तर सूक्ष्म वित्तपुरवठा योजनेतील ११.२७ टक्के लाभधारक आहेत.

**निष्कर्ष:**

१) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाने राबविलेल्या योजनांमुळे जळगाव जिल्ह्यातील चर्मकार समाजाचा सामाजिक व आर्थिक विकास झाला. यात महामंडळाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.
२) आर्थिक विकासाचे जे ९ निकषांचे परीक्षण केले त्यापैकी ७ निकषांच्या बाबतीत सकारात्मक प्रतिसाद ९० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. म्हणून महामंडळाने चर्मकारांच्या सामाजिक व आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची:**

१) महामंडळाची जळगाव जिल्हा कार्यालयीन माहिती.
२) अत्रे त्रिंबक नारायण, *गावगाडा*, वरद प्रकाशन, तिसरी आवृत्ती, २००९.
३) पाटील ज.फा., पठाण के.जी., तामणकर पी.जे., *अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख*, पहिली आवृत्ती, १९७४, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
४) खैरनार दिलीप, *प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी २००९.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने सभासद असलेल्या महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/-चे पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात येते. दि.१ जानेवारी २०१४ ते दि.३१ डिसेंबर २०१४ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका (सभासद) यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. आपला नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे दि.३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत पाठवाव्यात.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. दि.१ जानेवारी २०१४ ते दि.३१ डिसेंबर २०१४ या कालावधीत मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना (सभासद) स्पर्धेत सहभागी होता येईल. आपला नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे दि. ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत पाठवाव्यात.

## डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना प्रथम पुरस्कार रु.१०००/- आणि द्वितीय पुरस्कार रु.५००/- देण्यात येतात. सदर पुरस्कारासाठी दि. १ जानेवारी २०१४ ते दि.३१ डिसेंबर २०१४ या कालावधीतील लेखच विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे (दैनिक) नाव, दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत पाठवावेत.

-आर.बी.भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर,
पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१
(भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६)

# बँकींग क्षेत्र आणि ग्रामीण विकास

**मंगला रतन धोरण, अमरावती,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय, अमरावती.
भ्रमणध्वनी:९४२१०३७४३७
ई मेल: mangaladhoran@gmail.com

बँक ही आधुनिक काळातील महत्त्वपूर्ण आर्थिक व सामाजिक संस्था आहे. देशाचा आर्थिक विकास होत असताना बँकिंग क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते. भारतात बँकांचे अस्तित्व पुरातन असून वैदिक काळात त्याचा उल्लेख आढळतो. एतद्देशीय बँकांची रचना आणि कार्य पद्धती अजूनही ग्रामीण भागात कार्यरत असलेली दिसून येते. इंग्लंडमधील बँकांच्या विकासाबरोबर भारतातही ब्रिटीशांनी बँकिंग क्षेत्र विकसित केले.

स्वातंत्र्यपूर्व काळात बँकांना योग्य दिशा न मिळाल्याने बँका बुडण्याचे प्रमाण अधिक होते. उदा. बँक ऑफ हिंदुस्थान भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बँकींग क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने १९४९ साली बँकींग नियमन कायदा करण्यात आल्याने मध्यवर्ती बँकेला व्यापारी बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्राप्त झाले. बँका, शेती, उद्योग, व्यापार, वाहतुक, दळणवळण इ. क्षेत्राला भांडवल पुरवठा करतात. प्रत्यय निर्मिती हे व्यापारी बँकांचे खास वैशिष्ट्य आहे.

भारतातील प्राथमिक क्षेत्रावरील(शेती) अवलंबित्व आणि मोठ्या प्रमाणावर गुंतलेली लोकसंख्या दिसून येते. कृषीक्षेत्राचा विकास झाल्याशिवाय ग्रामीण भाग विकसित होणे अशक्यप्राय आहे. शेतीक्षेत्राकरिता लागणारे भांडवल बँकांतून केले जात असल्याने ग्रामीण बँकींग व्यवस्था महत्त्वाची ठरते. परंतु कृषी व संबंधित क्षेत्रांना १९४७-१९६९ या काळातील व्यापारी बँकांचा एकूण कर्ज पुरवठ्यापैकी २% इतका कर्ज पुरवठा झाला. व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण हा प्रमुख उद्देश होता आणि ग्रामीण भागात बँकींग क्षेत्राची संस्थात्मक प्रगती झाली.

बँकींग क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने बँकींग कमिशनची नेमणूक करण्यात

आली. बँकांचे राष्ट्रीयीकरण ही महत्त्वाची घटना ठरली. कृषीक्षेत्राला मोठ्याप्रमाणावर कर्जपुरवठा करणे, ग्रामीण भागात बँकांचे जाळे पसरविणे, ग्रामीण भागातील बचती आकर्षित करणे, लोकांना बँकेतून आर्थिक व्यवहार करण्याकरिता प्रोत्साहित करणे, या पध्दतीचे व्यापारी बँकांनी प्रयत्न केले. आर्थिकदृष्ट्या कमकुवत बँकांचे एकत्रीकरण केल्यामुळे सक्षम बँकींग व्यवस्था निर्माण झाली.

**देशातील बँकींग क्षेत्राचा विकासः**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४९ साली बँकींग नियमन कायदा पास करण्यात आला. मध्यवर्ती बँकेला व्यापारी बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार या कायद्याने प्राप्त झाले. लहान-लहान बँकांचे विलीनीकरणाचे धोरण स्वीकारले. परिणामतः १९५१ ते १९७१ या काळात व्यापारी बँकांची संख्या ४३० वरून ७१ पर्यंत घटली. ठेवीदाराचे हित संरक्षण देवून त्यांना आर्थिक फायदा झाला. स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेने शाखाविस्तार आणि सेवाक्षेत्र दृष्टीकोणाची अंमलबजावणी केली. प्राथमिक क्षेत्राला कर्जपुरवठा लघुउद्योग याकरिता कर्जपुरवठा आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती आणण्यासाठी १९६७ मध्ये सामाजिक नियंत्रण आणले. अग्रणी बँक योजना सुरू झाली. १९७५ मध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाला बँकींग सुविधा प्राप्त व्हाव्यात यासाठी विभागीय ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या. बँकींग क्षेत्र विकसित होत असतांना बँकांची कार्यक्षमता आणि लाभप्रदता वाढत होते. त्याचबरोबर सामाजिक न्यायाने सर्व क्षेत्राला कर्जपुरवठा बंधनकारक असल्याने कृषी क्षेत्राला कर्जपुरवठ्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

अनुसूचित व्यापारी बँकांची सुरवातीला भांडवल मर्यादा ५ लाख रु. पेक्षा अधिक होती. ती सद्यस्थितीत १०० कोटी करण्यात आली आहे. मागील ६० वर्षाच्या कालावधीत अनुसूचित व्यापारी बँकांच्या संख्येत २.५६% इतकी वार्षिक वाढ झाली आहे. याच कालावधीमध्ये ठेवीदारांच्या एकूण ठेवी प्रतिवर्षी १६.७४% नी वाढत आहेत. थोडक्यात ठेवीत सातत्याने वाढ होताना दिसून येते. भारतात शाखाविस्ताराच्या दृष्टीने ओरिसा, आसाम, मणीपूर, मेघालय, नागालँड, राजस्थान, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल याभागात अग्रणी बँकाचे कार्य प्रशंसनीय आहे. जगातील कोणत्याही देशात या वेगाने शाखा विस्तार झालेला दिसत नाही.

विकास बँकांना देशाच्या आर्थिक विकासाचे कार्यरत इंजिन म्हटले जाते. उद्योगांन कर्जपुरवठा आणि मार्गदर्शन करण्याचे कार्य या बँका करतात. भारतात औद्योगिकरण करण्यात विकास बँकांचा भांडवल पुरवठा महत्वाचा आहे. त्याचबरोबर जागतिक स्तरावरील विकास बँका, उद्योगक्षेत्रास कर्जपुरवठा करतात. त्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ, जागतिक बँक यांच्या अर्थसहाय्याने देशाच्या विकासाला गती मिळते. त्यामुळे बँकींग क्षेत्राच्या विकास कार्यात याची नोंद घ्यावी लागेल.

**ग्रामीण भागात बँकींग क्षेत्राचा विस्तार व प्रगती:**

भारतातील ६८% पेक्षा अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. १९५१ नंतर जलद आर्थिक विकासाकरिता नियोजनाचा स्वीकार करण्यात आला. शेती आणि पूरक व्यवसायांना कर्जपुरवठ्याची जबाबदारी इंपिरियल

बँकेला सोपविली त्यानंतर त्यावर नियंत्रणाच्या दृष्टीने १९५५ पासून स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्वात आली. ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने स्टेट बँकेशी संबंधित बँकांचे संलग्नीकरण करण्याची शिफारस केली. ग्रामीण भागात सर्वाधिक शाखा स्टेट बँकेच्या आहेत. आशियाई बँकांच्या सर्वोत्कृष्ट रँकींगमध्ये ११ व्या क्रमांकावर असलेली स्टेट बँक ग्रामीण भागात रोजगाराभिमुख योजना हाती घेवून पतपुरवठा करीत असते. प्रादेशिक ग्रामीण बँकात स्टेट बँकेचा हिस्सा ३५% आहे.

बँकेने ५ कोटी डेबीट कार्ड तर ३० लाखापेक्षा जास्त क्रेडिट कार्ड वितरित केली आहेत. अनेक शाखांमध्ये कोअर बँकींग सुरू करून शेतीसाठी लागणाऱ्या कर्जाच्या बाबतीत १८% बेंचमार्क पेक्षाही जास्त कर्जपुरवठा केला आहे.

ग्रामीण भागात सहकारी बँका हा महत्त्वाचा आर्थिक स्त्रोत दिसून येतो. शेतीला कमी व्याजदराने अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज दिले जाते. सावकारी कर्जाच्या अतिरिक्त व्यापारातून मुक्तता करण्यासाठी सहकारी बँका स्थापन झाल्या. शेती, कुटीरउद्योग, लघुउद्योग, ग्रामीण उद्योग, ग्राहक संस्था, गृहबांधणी इ. करिता ग्रामीण क्षेत्रात कर्जपुरवठा केला जातो. त्रिस्तरीय व्यवस्था असलेल्या सहकारी बँकांचे विकासातील योगदान उल्लेखनीय आहे. परंतु सहकारातील त्रुटी आणि व्यवस्थापन बदलाची आवश्यकता आहे. भारताच्या ग्रामीण क्षेत्रफळाचा विस्तार लक्षात घेता संस्थात्मक यंत्रणेमार्फत पुरेसा आणि योग्य पतपुरवठा होत नाही. अजूनही धंदेवाईक सावकार असंख्य शेतकऱ्यांना अतिरिक्त व्याजदराने कर्ज देवून शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असतात.

**बँकींग क्षेत्रासमोरील आव्हाने:**

जागतिकीकरणाच्या काळात बँक व्यवसायाचा विस्तार वेगाने होत आहे. खासगीकरण आणि ई-बँकींगच्या काळात आर्थिक उलाढालीची प्रक्रिया सुलभ होत आहे. ग्रामीण भागात पतपुरवठ्याचे प्रमाण प्रतिवर्षी १५ ते २०% नी वाढत आहे. ठेवीच्या प्रमाणात १६ ते १७% एवढी वाढ दिसून येते. ग्रामीण क्षेत्रात रिझर्व्ह बँकेच्या सक्तीच्या धोरणामुळे कृषी व पुरक उद्योगांना पतपुरवठा वाढतो आहे.

राष्ट्रीयीकरणानंतर कृषीक्षेत्राच्या विकासाकरिता कृषी कर्जपुरवठा केला परंतु तारण अभाव आणि कृत्रीम जलसिंचनाच्या अभावामुळे कृषीक्षेत्रातील अनिश्चितता शासनाच्या कर्जमाफीस भाग पाडते.

ग्रामीण भागातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या थकबाकीत ११.५०% वार्षिक वाढ होताना दिसून येते. स्टेट बँक ऑफ इंडिया व सहयोगी गटाच्या एकूण थकबाकीत ३३,५५१ कोटी रु. इतकी वार्षिक वाढ गंभीरपणे नमुद करावी लागेल.

**कृषीक्षेत्रातील कर्जपुरवठ्याचे मूल्यमापन:**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने कृषीक्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने पंचवार्षिक योजनांमधून निरनिराळ्या योजना लागू केल्या. पीक कर्ज, फलोत्पादनाकरिता सबसिडी, अल्पदराने कर्ज पुरवठा केला जातो. दीर्घमुदतीचे भांडवल पुरविण्याकरिता आणि कृषीक्षेत्राचे आर्थिक मार्गदर्शन या उद्देशाने राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेची स्थापना केली. या बँकेने १९८२ ते २०११ याकाळात मंजूर केलेल्या रकमेत प्रतिवर्षी ३१% वाढ झालेली दिसून येते. स्टेट बँक ऑफ

इंडिया व सहयोगी बँक गटांनी १९७९ साली एकूण पतपुरवठा रु.६२२३.४७ कोटी केला होता तो २०११ मध्ये रु.८९,२२६०.६८ कोटी पर्यंत वाढला. ही वाढ प्रचंड प्रमाणात दिसून येते परंतु कृषी क्षेत्राला मिळालेला पत पुरवठा भांडवलाच्या गरजेपेक्षा कमी आहे.

भारतातील प्राथमिक शेती पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँक हे पतपुरवठ्याचे महत्त्वपूर्ण स्त्रोत दिसून येतात. भूविकास बँक शेतकऱ्यांच्या दीर्घ मुदतीच्या कर्जाची गरज भागविण्यासाठी वित्त पुरवठा उपलब्ध करून देते. पहिली भूविकास बँक १८८३ मध्ये स्थापन झाली. ही बँक ब्रिटीशांनी स्थापना केली. पुढे या बँकेची कार्यव्याप्ती वाढवून कृषी व ग्रामीण विकास बँक असा नामविस्तार करण्यात आला. शेती आणि ग्रामीण उद्योगांकरिता १० ते १५ वर्षे मुदतीचे कर्ज देत असते. त्यामुळे शेती आणि शेतीपूरक व्यवसायामध्ये सुधारणा करण्यास मदत झाली. कृषी कर्जपुरवठा करताना उत्पादन, कालावधी, कर्ज घेण्याचा हेतू, तारणाच्या स्वरूपानुसार वित्तीय पुरवठा केला जातो. भारतीय शेतकऱ्यांच्या विकासाकरिता ह्या बँका नवीन धोरणे आखतात व ग्रामीण भागाचा सर्वांगीण अभ्यास करून योजना राबविल्या जातात. त्यामुळे कृषी खात्याला व ग्रामीण विकासाला चालना मिळते.

उत्पादनाचा दर्जा सुधारून कृषीमालाची निर्यातीस प्रोत्साहन देण्याचे कार्य बँकांनी केलेली दिसून येतात. नवनवीन प्रयोगांना प्रोत्साहन देऊन उत्पादनाचा दर्जा वाढविण्यास मदत होते. त्यामुळे किंमतीत वाढ होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत व राहणीमानात सुधारणा होत आहे.

ग्रामीण भागात अनुसूचित व्यापारी बँकांचा शाखा विस्तार करून सर्वांगीण विकास होताना दिसतो. अनुसूचित व्यापारी बँकांच्या शाखा ग्रामीण क्षेत्रात २०११ मध्ये २१७५५ तर सार्वजनिक क्षेत्रातील बँका २०,३८७ होत्या. राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या १४,१८५ असून खासगी क्षेत्रातील २६११ बँका ग्रामीण भागात कार्यरत आहेत.

महाराष्ट्र या प्रगत राज्याच्या बँकींग क्षेत्राचा विचार करता, महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा व क्षेत्रफळाचा मोठा भाग ग्रामीण क्षेत्राने व्यापला आहे. क्षेत्रीय ग्रामीण अधिकोषणाचे स्वरूप भिन्न आहे. व्यापारी बँका क्षेत्रीय ग्रामीण अधिकोषण स्थापन करून पत पुरवठा केला जातो. २६ ऑगस्ट १९७६ मध्ये मराठवाडा ग्रामीण अधिकोष ही महाराष्ट्रातील पहिली आणि सर्वात मोठं अधिकोषण व्यवस्था आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण अधिकोषणांनी शासकीय योजनेत सहभाग घेतला. लघुसिंचन, शेतीसुधार, कृषी मशीनरी, बागायती, कुक्कुट पालन, वराहपालन, मत्स्य पालन, पशु पालन, शेती व्यवसाय, डेअरी, गोदाम व्यवस्था, वनीकरण, बायोगॅस, वीज परियोजना इ. साठी ग्रामीण अधिकोषांनी वित्तीय मदत केली आणि सोबत शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डची योजना लागू केली.

महाराष्ट्रात पीक उत्पादनासाठी बँकांनी खालीलप्रमाणे कर्जपुरवठा केलेला दिसून येतो. २०१०-११ मध्ये शेतीसाठी रु.१८०१८ लक्ष पतपुरवठा केला. त्यापैकी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामार्फत रु.९८०५ लक्ष इतके पीक कर्ज वाटप केले. २०१२-१३ मध्ये व्यापारी बँकांनी १२,०२७ लक्ष रु. तर जिल्हा मध्यवर्ती

बँकेमार्फत रु.११,१८४ लक्ष तर ग्रामीण बँकांनी रु.१४१८ लक्ष म्हणजेच एकूण रु.२४,६२९ लक्ष इतका संस्थात्मक कर्जपुरवठा केलेला दिसून येतो.

ग्रामीण विकासातील बँकांचे स्थान महत्त्वाचे असून विकसनशील राष्ट्रात शेती क्षेत्राकरिता पतपुरवठा विकासाचा द्योतक ठरतो. ग्रामीण अधिकोषांनी आधुनिक सेवा सुविधा पुरविणे व बँकींग क्षेत्राचा विस्तार लोकसंख्येच्या दृष्टीकोणातून होणे आवश्यक ठरते.

**संदर्भ सूची:**


१) जहागिरदार दि.व्यं.(२०१२) *महाराष्ट्राचा आर्थिक विकासाचा धांडोळा*, सेंटर फॉर एकोनॉमिक अॅन्ड सोशल स्टडीज, अमरावती, पृ. २२०.

२) DARJ (2012), *DARJ Training & Research Institute*, Amravati. Page 151.

३) खंडारे विकास, *भारतीय बँकींग पद्धती.*

४) Bhatt Anil (2004), *Indian Banking System*, Shivam Book House,(P) Ltd., Jaipur.

५) पाटील के.के. (२०१०), *महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची स्थिती*, अर्थमीमांसा (जाने-जून).


## ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES
## *DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE*

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2014 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2015. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C.,*
*Jalgaon-425001.*
*(Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकासाच्या योजना

देविदास गोकुळ गवळी, किल्ले धारूर,
अर्थशास्त्र विभाग,
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जि. बीड,
भ्रमणध्वनी: ९९६०१९९४९१.

शिवाजी एस. अंभोरे, शिवाजीनगर,
अर्थशास्त्र विभाग,
पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद,
भ्रमणध्वनी: ९४२२२३१४५१

भारत हा ग्रामीण व्यवस्था असणारा देश आहे. भारतीय खेड्यातील लोकांचे जीवन हे अतिशय साधे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. कृषी हा येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. आजही या देशाची ६५ टक्के जनता ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. शिवाय देशाची वाढती लोकसंख्या ही ग्रामीण विकासातील मोठी अडचण ठरत आहे. त्यामुळे भारतात ग्रामीण विकास हा महत्वाचा मानला जातो. नियोजनाच्या कालावधीत ग्रामीण विकासासाठी अनेक उपाय शासन स्तरावर राबविले गेले त्या अनुषंगाने ग्रामीण भागाचा विकासही काही अंशी घडून आलेला दिसतो. परंतु भारतासारख्या देशात अतिरिक्त लोकसंख्या, अल्प कृषी उत्पादकता, नवीन विचार आत्मसात न करणे, शिक्षणाचा निम्न दर्जा, रूढी व परंपरांचा पगडा, अकार्यक्षम नेतृत्व, जमिनीचे तुकडीकरण, आर्थिक विषमता, औद्योगिकीकरणाचा मंद वेग, बेरोजगारी यामुळे ग्रामीण भारताचा म्हणावा तसा विकास झालेला दिसत नाही यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहेत.

भारतासारख्या देशाची प्रगती ही ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासावर अवलंबून आहे. म्हणूनच केंद्र सरकारने २००८-०९ पासून नवीन राष्ट्रीय कृषी धोरण स्वीकारले आहे. कृषी सुधारणेबरोबरच ग्रामीण भागातील रस्ते, आरोग्य शिक्षण, पाणी पुरवठा, वीज पुरवठा, वाहतूक, दळणवळण यासारख्या मूलभूत

सुविधा वाढविण्यावर भर दिलेला आहे. ग्रामीण भारताच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारे विविध विकास योजना राबवितात. या योजनांची प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित राज्याच्या ग्रामविकास मंत्रालयामार्फत पार पाडली जाते.

प्रस्तुत लेखात महाराष्ट्र राज्यातील केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास पद्धतीः** सदर अभ्यास हा पूर्णतः दुय्यम साधनसामग्रीवर आधारित असून यासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे अहवाल, विविध लेख, वृत्तपत्रे, नियतकालिके, लोकराज्य, योजना यातील प्रकाशित लेख यांचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.

**ग्रामीण विकासाच्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनाः**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने अनेक कार्यक्रम राबविले. परंतु यात सरकारला म्हणावे तसे यश आले नाही म्हणून केंद्र शासनाने १९५७ साली बलवंतराय मेहता समिती नेमली. या समितीने सुचविलेल्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या शिफारशी भारत सरकारने सन १९५८ मध्ये स्वीकारल्या. सर्वप्रथम राजस्थान राज्याने लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना प्रत्यक्ष अंमलात आणली. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी २ ऑक्टोबर १९५९ रोजी याचे उद्घाटन करून त्याचे पंचायतराज असे नामकरण केले.

सन १९६० रोजी यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. लोकांचा सामाजिक व आर्थिक विकास व्हावयाचा असेल तर लोकांना सत्ता मिळाली पाहिजे. गावाचा विकास करण्याकरिता ग्रामपंचायती स्थापन करून त्या बळकट करण्यात याव्यात असे भारताच्या घटनेतील ४० व्या कलमात नमूद केलेले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी राज्य सरकारच्या हाती एकवटलेल्या सत्तेचे लोकशाही पद्धतीने विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून ते आजतागायत ग्रामीण विकासासाठी महाराष्ट्र शासनामार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. यातील काही योजना ह्या केंद्र सरकारच्या मदतीने राबविल्या जातात. त्या पुढीलप्रमाणे-

**यशवंत ग्राम समृद्धी योजनाः**

ग्रामीण भागातील गावांचा विकास करण्यासाठी ग्रामसभेच्या मान्यतेने आवश्यक कामाची निवड करून गावांमध्ये लोकसहभागातून पायाभूत सुविधा निर्माण करून गावांची समृद्धी करण्याच्या उद्देशाने शासनाने सन २००२ पासून यशवंत ग्राम समृद्धी योजना राज्यात सुरू केली. या योजनेअंतर्गत सद्यस्थितीत दलित/अदिवासी वस्तीसाठी १० टक्के आणि सर्वसाधारण वस्तीसाठी १५ टक्के लोकवर्गणी निश्चित केली आहे. ग्रामपंचायतीला दरवर्षी दहा लाख रूपये विकास कामासाठी खर्च करता येतात. या योजनेअंतर्गत पंचायत राज संस्थांच्या शाळांसाठी इमारती बांधणे, क्रीडांगणे, कुंपणे, अंगणवाडी इमारत, ग्रामपंचायत कार्यालये, गावांतर्गत रस्ते व गटारी, स्मशानभूमी, बस थांबा रोड, गावातील रस्त्यांचे विद्युतीकरण, वाचनालय, व्यायामशाळा, सामाजिक सभागृहे इत्यादी कामे करता येतात. सध्या शासनाने ही योजना स्थगीत

ठेवली आहे.

**एकात्मिक ग्रामीण विकास योजनाः**

बेरोजगारी दूर करण्यासाठी सन १९७८ साली ही सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील लोकांना दुग्धउत्पादन, मासेमारी तसेच कारागीर व लघुउद्योग करणाऱ्यांना रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

**महाराष्ट्र रोजगार हमी योजनाः**

सन १९७२ साली महाराष्ट्र रोजगार हमी योजना लागू केली गेली. मागेल त्याला काम हे तत्व या योजनेच्या मुळाशी आहे. ही योजना क वर्गीय नगरपालिका व ग्रामीण भागासाठी लागू करण्यात आली.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाः**

*Mahatma Gandhi NREGA is excluded from this list as it a special demand driven scheme based on a legal entitlement under the MGNREGA Act, 2005.* या योजनेला नरेगा किंवा मनेरगा असेही म्हटले जाते. या योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील किमान एका सदस्याला वर्षातून किमान १०० दिवस काम पुरविले जाईल. अंग मेहनतीच्या या कामासाठी त्याला किमान वेतन कायद्यानुसार साप्ताहिक मोबदला दिला जाईल.

**ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदानः**

दहन-दफन भूमी आणि इतर कार्यक्रमासाठी ही योजना महाराष्ट्र शासनाकडून जिल्हास्तरावर राबविली जाते. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील ज्या गावात दहन-दफन भूमीसाठी ग्रामपंचायत किंवा शासनाच्या मालकीची जमीन नसेल तर अशा गावांच्या बाबतीत खाजगी जमीन संपादित करण्यासाठी केवळ भू-संपादनाचा खर्च भागविण्यासाठी अनुदान मंजूर करण्यात येते. सन २०१०-११ पासून या योजनेचा विस्तार करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात दहन-दफन भूमीसाठी भूसंपादन, चबुतऱ्याचे बांधकाम, शेडचे बांधकाम, पोहोच रस्ता, कुंपन, संरक्षक भिंत, ग्रामपंचायत कार्यालय, वृक्षारोपण, परिसर सुधार इत्यादी कामे केली जातात. सदर योजनेसाठी जिल्हा नियोजन समिती कार्यरत असते.

**पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम विकास योजनाः**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास घडवून आणण्याकरिता ग्रामोत्थान अभियान सुरू करण्यात आलेले आहे. यासाठी पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम विकास योजना सुरू करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागात भौतिक, सामाजिक व उत्पन्न मिळविण्याची साधने या तीन क्षेत्रात शासनाच्या आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय सहकार्याने, लोकांच्या पुढाकाराने हा विकास अपेक्षित होणार आहे. यात गावात एकीकडे उच्च प्रतिच्या भौतिक सुविधांची निर्मिती करतानाच यासाठी लागणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग पर्यावरणाचा समतोल राखून कसा करता येईल याचा विचार केला आहे.

**रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदानः**

महाराष्ट्रातील अनेक ग्रामपंचायतींची

आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची वीज देयक भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्याचा निर्णय शासनाने १९९० साली घेतला आहे.

**ग्रामपंचायतीच्या रस्त्यांवर सौरपथ दिवे उभारणे:**

राज्यातील विजेची मागणी व पुरवठा यातील तफावत पाहता ग्रामीण भागात पर्यावरण संतुलन प्रणित मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अपारंपरिक स्त्रोतातून निर्मित विजेचा पुरवठा व्हावा या उद्देशाने ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर पथदिवे खांब उभारण्याची योजना सन २०१०-२०११ पासून कार्यान्वित केली आहे. ही योजना राज्य शासन, केंद्र शासन व ग्रामपंचायतीच्या सहभागातून राबवावयाची आहे. सौर उर्जा पथदिवे उभारणीसाठी प्रत्येक जिल्हयासाठी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाच्या दर करपत्रकाप्रमाणे समावेश असलेल्या एजन्सीची निवड केली जाते. त्यामध्ये संबंधित उत्पादकाला पुरवठा, उभारणी, कार्यान्वयन व ५ वर्षासाठी देखभाल दुरूस्तीच्या अटीचा समावेश आहे. त्यानुसार जिल्हा परिषदांमार्फत या सर्व अटी विचारात घेवून संबंधित ग्रामपंचायतीच्या रस्त्यांवर सौर पथदिव्याची उभारणी केली जाते.

**इंदिरा आवास योजना:**

इंदिरा आवास योजना १९८९ पासून डिसेंबर १९९५ अखेरपर्यंत जवाहर योजनेची उपयोजना म्हणून कार्यान्वित होती. त्यानंतर दिनांक ०१ जानेवारी १९९६ पासून ही योजना स्वतंत्रपणे केंद्र पुरस्कृत योजना म्हणून स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे. या योजनेची निधी उपलब्धततेची पद्धत ७५:२५ प्रमाणे आहे. म्हणजेच ७५ टक्के केंद्र सरकार व २५ टक्के राज्य सरकार देणार. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबासाठी घरकुल बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपलब्ध निधीच्या ४० टक्के निधी बिगर अनुसूचित जाती/जमातीसाठी राखून ठेवण्यात येतो. तसेच अनुसूचित जाती/ जमातीसाठी ६० टक्के निधी आरक्षित ठेवला जातो. अपंगासाठी ३ टक्के आरक्षण ठेवण्यात येते. सन २००७-०८ पासून अल्पसंख्यांकासाठी १५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. दरवर्षी घरकुलांचे उद्दिष्ट केंद्र शासनामार्फत निश्चित करण्यात येते. तसेच जिल्हानिहाय घरकुलांचे वाटप केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून जिल्ह्यांना परस्पर करण्यात येते, त्यामुळे राज्याला बदल करता येत नाही. दिनांक ०१ एप्रिल २०१३ पासून केंद्र शासनाने घरकुलांची सुधारित किंमत एक लाख रूपये इतकी निश्चित केली आहे. यात केंद्र शासनाचा हिस्सा ७५% म्हणजेच रु.५२,०००/- राज्य शासनाचा हिस्सा २५% म्हणजेच रु.१७,५००/-, राज्य शासनाचा अतिरिक्त हिस्सा प्रति घरकूल रु.२५,०००/- व मजुरीच्या स्वरूपात लाभार्थ्याचा हिस्सा रु.५०००/- अशी विभागणी करण्यात आली आहे.

**रमाई आवास:**

लाभार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावा. इंदिरा आवास योजनेमध्ये अनुसूचित जातीतील आरक्षणान्वये लाभ न

मिळालेल्या पात्र लाभार्थ्यांना या घरकुलाचा लाभ देण्यात येतो. यात घरकुलाची किंमत मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रु. ७०,०००/- इतकी आहे. या घरकुलासाठी देण्यात आलेल्या अनुदानातून किमान २६९ चौ. फुट क्षेत्रफळाचे बांधकाम लाभार्थ्याने करणे बंधनकारक आहे. या योजनेत सर्व प्रकारचे कामकाज प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेमार्फत होते. यात लाभार्थी स्वतःच्या जागेवर किंवा ग्रामपंचायतीच्या जागेवर घरकुल स्वतः बांधून घेतात.

**तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमः**

ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दिवसेंदिवस देवदर्शनासाठी भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. अशा ठिकाणी ग्रामपंचायतींना त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे विविध सोयीसुविधा पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरू केली आहे. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांची तीन प्रकारात वर्गवारी करून त्यांना अनुदान मंजूर करण्यात येते. या योजनेअंतर्गत गावातील तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी मंदिरापर्यंत पोहोच रस्ते, पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे, स्वच्छतागृह, वाहनतळ, भक्तनिवास, पोहोच रस्त्यावरील दिवे आणि संरक्षक भिंत इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.

**मागास क्षेत्र अनुदान निधीः**

मागास क्षेत्र निधी अनुदान योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. ही योजना सन २००८ पासून सुरू करण्यात आलेली आहे. ही योजना महाराष्ट्रातील बारा मागासलेल्या जिल्ह्यामध्ये राबविली जाते. यात गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नांदेड, हिंगोली, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, यवतमाळ, औरंगाबाद व अमरावती या जिल्ह्यांचा समावेश होतो. या योजनेचा मुख्य उद्देश प्रादेशिक असमतोल दूर करणे हा असलेला दिसून येतो. मागास क्षेत्र विकास अनुदान निधी योजनेअंतर्गत ग्रामसभेने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार ग्रामपंचायत इमारती, संगणकीकरण, अंगणवाडी इमारती, अंगणवाडीसाठी किचन शेड, सौर पथदिवे, सिमेंट रस्ता, नाले, सार्वजनिक शौचालये, हातपंप दुरूस्ती, कॉंक्रीट रस्ता, विद्युत खांब, पाईप लाईन दुरूस्ती, समाजमंदिर, ग्रामपंचायत, अंगणवाडी, समाजमंदीर इत्यादींचे कम्पाऊंड वॉल, सामुहिक भवन इ. विकास कामे करता येतात.

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजनाः**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून ती महाराष्ट्रात सन २००२ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा उद्देश बिगर अदिवासी भागातील १००० पेक्षा जास्त व अदिवासी भागातील ५०० पेक्षा जास्त लोकवस्तीची न जोडलेली गावे बारमाही रस्त्यांद्वारे जोडणे हा आहे. सदर योजनेअंतर्गत टप्पा १ ते ९ अंतर्गत एकूण २३२०५ कि. मी. लांबीच्या रस्त्यांची एकूण ५३०९ कामे व ८१२१ लोकवस्त्या जोडण्याचा कार्यक्रम मंजूर होता. यापैकी मार्च २०१३ अखेर एकूण २१९९७.४२ कि. मी. लांबीच्या ५१२५ रस्त्यांची कामे पूर्ण झालेली असून ७६४० इतक्या लोकवस्त्या जोडण्यात आलेल्या आहेत. यासाठी मार्च २०१३ अखेरपर्यंत ४९७८.५५ कोटी इतका खर्च झालेला आहे.

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना:**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना सहाय्य करण्यासाठी राबविण्यात येणारी एक प्रमुख योजना आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील कुटुंबांना सामाजिक कार्यप्रवणता, प्रशिक्षण व क्षमता वृद्धी करणे या प्रक्रियेचा अवलंब करून स्वयंसहाय्य गटांमध्ये संघटीत करण्यात येते. या योजनेच्या सुरूवातीपासूनच मार्च २०१२ अखेरपर्यंत स्थापन केलेल्या स्वयंसहाय्यता गटांची एकूण संख्या २६७२१४ असून त्यापैकी ९५१७० स्वयंसहाय्यता गट कार्यरत आहेत. या योजनेअंतर्गत १९९९ ते मार्च २०१२ अखेरपर्यंत एकूण ११७२७४.९६ लाख एवढा निधी खर्च करण्यात येवून एकूण १४२०४५३ स्वयंरोजगारीचा लाभ देण्यात आला. तसेच एकूण ३८४६५७.१० लाख रुपये कर्ज पुरवठा करण्यात आला.

**लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांचा विशेष कार्यक्रम:**

राज्यातील ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधांच्या कामांना पुरेसा निधी उपलब्ध होत असल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यासाठी मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मूलभूत सुविधांच्या कामासाठी विशेष कार्यक्रम ही योजना महाराष्ट्र शासनाने सन २००८-२००९ या वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत गावांतर्गत रस्ते, गटारे, पाऊसपाणी निचरा, दहनभूमी व दफनभूमीची सुधारणा करणे, संरक्षक भिंत, ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे, आठवडे बाजारासाठी सुधारणा, गावामध्ये कचरा डेपोसाठी व प्राथमिक प्रक्रियेसाठी सुविधा, सार्वजनिक जागेत वृक्ष लागवड, सामाजिक सभागृह, समाज मंदिर, सार्वजनिक शौचालय व अन्य मुलभूत सुविधा इत्यादी कामे केली जातात. सन २०१३-१४ या वर्षासाठी २७.५० कोटींची तरतूद या योजनेसाठी करण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम:**

पारंपरिक ऊर्जा साधने जसे पेट्रोल, केरोसिन, कोळसा, नैसर्गिक वायू व लाकडी इंधन ही काळाच्या ओघात संपणारी ऊर्जा साधने आहेत. यावरील भार सुधारण्यासाठी व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सन १९८२-८३ पासून शासनाने राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना कार्यान्वित केली. सदर योजना जिल्हा स्तरावर कृषी विकास अधिकारी यांचेमार्फत राबविण्यात येते. सद्यस्थितीत राज्यात राबविण्यात येणाऱ्या बायोगॅस योजनेअंतर्गत एका बायोगॅस संयंत्रास ८०००/- रुपये सहाय्यक अनुदान लाभार्थ्यास प्राप्त होते. हे बायोगॅस संयंत्र शौचालयास जोडल्यास त्यासाठी अतिरिक्त १०००/- रुपये अनुदान देण्यात येते.

**महालक्ष्मी सरस प्रदर्शन:**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनउन्नती अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता गटाच्या व स्वयंरोजगारीच्या उत्पादनाची प्रसिद्धी व विक्री मोठ्या प्रमाणावर व्हावी यासाठी मुंबई येथे दरवर्षी डिसेंबर महिन्यात सन २००३ पासून महालक्ष्मी सरस या नावाने व्यापक प्रमाणात विक्री प्रदर्शन भरविण्यात येते.

**ई-पंचायत/संग्राम:**

भारत निर्माण कार्यक्रमातील नॅशनल ई-गव्हर्नमेंट कार्यक्रमांतर्गत सर्व पंचायत राज संस्थांचे संगणकीकरण करून त्यांच्या कारभारात एकसूत्रता व पारदर्शकता आणण्यासाठी EPRI/E पंचायत हा मिशनमोड प्रोग्राम हाती घेण्यात आला. महाराष्ट्रात हा प्रकल्प संग्राम प्रकल्प (संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र) या नावाने सन २०११ पासून राबविण्यात येत असून, या प्रकल्पांतर्गत सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचे संगणकीकरण करण्यात आलेले असून त्यांचा कारभार ऑनलाईन करण्यात आलेला आहे.

**सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण:**

१२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अनुषंगाने समाजातील घटकांसाठी असलेल्या विकास योजना व कार्यक्रमांचा फायदा फक्त त्यांनाच मिळावा यासाठी केंद्र शासनाने सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण करण्याचे निश्चित केले आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाला १३५/- कोटी रुपयाचा निधी प्राप्त झाला आहे व यातून १३१/- कोटी रुपयाचा निधी जिल्ह्यांना वितरीत केला आहे. या योजनेअंतर्गत प्रश्नावली तयार करून सर्वेक्षण करण्यात येईल व अंतिम दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करण्यात येईल.

**स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (R-SET):**

केंद्र सरकारने बेरोजगारीवर मात करण्यासाठी म्हणून श्री धर्मस्थळ मंजूनाथेश्वर एज्युकेशनल ट्रस्ट, सिंडीकेट बँक व कॅनरा बँक यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण विकास व स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (R-SET) सन १९८२ पासून स्थापन करण्यात आली. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १९ जून २००८ नुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात सदर संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**कायमस्वरूपी विक्री केंद्र बांधणे:**

ग्राम विकास विभागामार्फत सन १९९९ पासून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील लोकांचे जीवनमान उंचावून त्यांना रोजगार प्राप्ती व्हावी, त्यांचे उत्पन्न किमान २०००/- रूपये व्हावे या उद्देशाने स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार ग्रामीण भागातील कुटुंबांना सामाजिक कार्यप्रवणता, प्रशिक्षण व क्षमता वृद्धी करणे या प्रक्रियेचा अवलंब करून स्वयंसहाय गटांमध्ये संघटीत करण्यात येते. तसेच त्यांना अनुदान व कर्जाचे वाटप करण्यात येते. या स्वयंरोजगारीतून निर्माण केलेल्या वस्तुंना हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून राज्य शासनाने प्रत्येक विभागीय व जिल्हा पातळीवर विक्री प्रदर्शने आयोजित करण्याचा व तालुका आणि जिल्ह्याच्या ठिकाणी कायमस्वरूपी विक्री केंद्र बांधण्याचा निर्णय घेतला. या योजनेनुसार अद्यापपर्यंत १६१ तालुक्यात कायमस्वरूपी विक्री केंद्र बांधण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे.

**निष्कर्ष:**

ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था ही आजही शेतीवर आधारीत आहे. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील लोक ही प्रामुख्याने शेतीवर उदरनिर्वाह करताना दिसतात व शेती पावसाच्या लहरीपणामुळे बेभरवशाची झालेली आहे. ग्रामीण भागात रोजगार संधी कमी असल्यामुळे शेतीवरील ताण वाढतो आहे. हा ताण कमी करून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकास योजनांची

चांगलीच मदत होताना दिसत आहे.

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार, बचत गटांना प्रोत्साहन देणे, त्यांना कर्ज पुरवठा करून त्यांच्या मालाला बाजारपेठा मिळवून देणे, रोजगार हमी योजनेचा विस्तार करून मनरेगाची स्थापना करणे, ग्रामीण भागातील लोकांना कौशल्य प्राप्तीसाठी प्रशिक्षण देणे, दारिद्र्य रेषेखालील लोकांना निवास व्यवस्थेसाठी मदत करणे इत्यादी विविध योजनांची अंमलबजावणी केल्यामुळे ग्रामीण भागात शेतीवरील भार कमी होण्यास मदत झालेली दिसते. तसेच लोकांच्या जीवनमानात वाढ होवून लोकांचा सरासरी उपभोग खर्च वाढलेला दिसतो. परंतु बुद्धी आणि श्रम यांच्यात फारकत झाल्यामुळे शेती आणि ग्रामीण भारत विकलांग झाला आहे, ही महात्मा गांधींनी व्यक्त केलेली खंत अजुनही ग्रामीण भागासाठी लागू होताना दिसून येते.

## संदर्भ सूची:


१. *अर्थसंवाद* विविध अंक.
२. *Indian Rural Development Report 2012*, Orient Blackswan Private Limited, 1/12 Asaf Ali Road, New Delhi, 110002.
३. *Kurukshetra The Monthly Journal* MINISTRY OF RURAL DEVELOPMENT CHIEF EDITOR NEETA PRASAD, Vol. 58, No. 3 pages 5 January 2010.
४. *INTRODUCTION TO AGRICULTURE EXTENSION RURAL DEVELOPMENT PROGRAMME,* Dr. Subhash Chanda, Indian Agricultural Research Institute Pusa Campus, New Delhi, 110012.
५. *Social Welfare Administration in India,* Dr. D. R. Sachdeva, Kitab Mahal Publication, 22-A, Sarojini Naidu Marg, Allahabad, 2001, ISBN-81-225-0180-X
६. *भारताचे आर्थिक प्रश्न,* डॉ. श्री. आ. देशपांडे, विद्या प्रकाशन, नागपूर, १९७२.
७. *ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन,* गंगाधर कराळे, अनुवाद डॉ. विजय कविमंडन, श्रीमंगेश प्रकाशन नागपूर, २००६.
८. *कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र,* डॉ. विजय कविमंडन, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, २०१२.
९. *लोकराज्य* विविध अंक.
१०. *योजना* विविध अंक
११. www.maharashtra.gov.in

# ग्रामीण विकासात पायाभूत सुविधांची भूमिका

**चव्हाण सीमा रविंद्र, श्रीरामपूर,**
अर्थशास्त्र विभाग,
आर. बी. एन. बी. कॉलेज, जि. अहमदनगर,
भ्रमणध्वनी: ९९२१२०९२७०
ई-मेल: dr.seemachavan17@gmail.com

*खरा भारत हा खेड्यांमध्ये राहतो* हे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे वाक्य आजही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टिकोनातून सत्यच आहे आणि भविष्यामध्ये देखील सत्यच असेल. कारण आजही भारताची ६८.८% लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) ग्रामीण भारतामध्ये निवास करते. कृषी क्षेत्राचा वाटा एकूण घरगुती उत्पादनामध्ये (GDP) जरी कमी होत असला तरी अजुनही राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने कृषीचे महत्त्व अबाधीतच आहे.

ग्रामीण विकासाचे प्रमुख ध्येय हे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावणे, त्यांना उत्तम दर्जा प्राप्त करुन देणे हा आहे. फक्त उत्पन्नामध्ये वाढ घडवून आणल्याने राहणीमानाचा उत्तम दर्जा प्राप्त होऊ शकेल असे नाही. त्यासाठी लोकांना सहज उपलब्ध होतील व मान्य असतील अशा पायाभूत सुविधा मिळवून देणेही गरजेचे असते. म्हणूनच *मानवी वसाहती संदर्भातील संयुक्त राष्ट्र परिषद* - १९७६ मध्ये ग्रामीण वस्त्यांच्या सर्वांगीण विकासावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विकास अभिकरणांचा भर असावा असे निश्चित केले होते.

भारतामध्ये प्रथम पंचवार्षिक योजनेपासूनच ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रयत्नास सुरुवात करण्यात आली. पंचवार्षिक योजनांनुसार विचार केला तर ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी ५ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात *किमान गरजा कार्यक्रम* (Minimum Needs Programme - MNP) ची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमानुसार लोकांना त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक

पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे निश्चित केले गेले. ज्यानुसार ८ घटक निवडले गेले. हे घटक म्हणजे प्राथमिक शिक्षण, ग्रामीण आरोग्य, ग्रामीण पाणीपुरवठा, ग्रामीण रस्ते, ग्रामीण विद्युतीकरण, ग्रामीण निवास, पर्यावरण विकास व पोषण या ८ घटकांमध्ये ६ व्या व ७ व्या पंचवार्षिक योजनेत प्रौढ शिक्षण, ग्रामीण ऊर्जा, ग्रामीण स्वच्छता व सार्वजनिक वितरण प्रणाली यांचा समावेश करण्यात आला. या प्रत्येक घटकानुसार अंदाजपत्रकामध्ये स्वतंत्र निधी विभागून देण्यात येत असे. ८ व्या पंचवार्षिक योजनेपासून गुणात्मक दर्जा सुधारण्यावर भर देण्यात आला. १० व्या पंचवार्षिक योजना काळात २००५ साली *भारत निर्माण* या नावाने प्रमुख योजना सुरु झाली व पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी चालना मिळाली.

११ व्या पंचवार्षिक योजनेने ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास, दारिद्र्य निर्मुलन आणि आर्थिक विकास यांच्या थेट संबंधावर भर दिला तर १२ व्या पंचवार्षिक योजना काळामध्ये या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमाद्वारे ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी पुढील उद्दिष्टे ठरविण्यात आली.

१) २०१२ पर्यंत सर्व वंचित गावांना सुरक्षित पेयजलाचा पुरवठा करणे.

२) २००९ पर्यंत ६० लाख घरांची बांधणी करणे. परंतु ते साध्य न झाल्याने पुढील लक्ष्य २०१४ पर्यंत १.२० कोटी घराची बांधणी करण्याचे ठरविण्यात आले आहे.

३) २०१४ पर्यंत किमान ४०% ग्रामीण भाग दूरध्वनी सुविधांनी जोडणे व २०१२ पर्यंत सर्व २.५ लाख पंचायत कार्यालयांना ब्रॉडबँड सुविधा पुरविणे.

४) २०१२ पर्यंत सपाट प्रदेशातील १००० पेक्षा अधिकच्या व डोंगराळ प्रदेशातील ५०० पेक्षा अधिकच्या सर्व खेड्यांना सर्व प्रकारच्या हवामानामध्ये टिकणाऱ्या रस्त्यांनी जोडणे.

५) २०१२ पर्यंत प्रत्येक गावाला विद्युत पुरवठा पोहचवणे.

६) २०१२ पर्यंत अतिरिक्त १ कोटी हेक्टर जलसिंचनाखाली आणणे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासनाने अनेक योजना आखून ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न केलेले आढळतात.

### ग्रामीण भागातील पाणीपुरवठा:

भारतातील शासकीय आकडेवारीप्रमाणे ८८% लोकांना पाण्याचा पुरवठा सुरक्षित स्त्रोताद्वारे केला जातो. परंतु त्यापैकी फक्त २५% लोकांनाच असे पाणी अंगणापर्यंत उपलब्ध होते इतरांना मात्र त्यातही महिला व मुलींना पाण्यासाठी पायपीट करावी लागते. सरासरी दिवसाला महिला व मुली पाण्यासाठी १.६ तास खर्ची घालतात. यामुळे पाण्याचा अपुरा पुरवठा, महिला मुली यांचा वेळेचा होणारा अपव्यय तसेच शारीरिक जखमा, शाळेतून गळती यासारखे परिणाम देखील घडून येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महिला व मुलींना आपल्या *प्रतिष्ठे* सोबत तडजोड करावी लागते.

या बरोबर ग्रामीण व शहरी विषमता येथे सुध्दा अनुभवण्यास मिळते. ८०% शहरी लोकांना

पाईपद्वारे पाणी पुरवठा होतो तर हेच प्रमाण ग्रामीण भागामध्ये २९% आहे. २००५ साली ५५,०६७ खेडी ही पेयजल पुरवठ्यापासून वंचित होती. त्यापैकी ४,५५८ ही पुर्णपणे जलविरहित होती तर ५०,४७९ गावे अंशत: पुरवठा असणारी होती. १ एप्रिल २०११ च्या आकडेवारीनुसार ५५,०६७ सर्व गावे पेयजल पुरवठ्याने जोडण्यात आली आहेत.

**ग्रामीण ऊर्जावापराची सद्य:स्थिती:**

ऊर्जेची मागणी ग्रामीण भागातही सतत वाढते आहे. ऊर्जेची वैश्विक उपलब्धता ही विकासाचा वेग वाढविण्यासाठी सर्व समावेशक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे भारताचे मत आहे व त्यासाठी केंद्र शासन व राज्यशासन विविध प्रयत्न करताना दिसून येतात. तरी सुध्दा (२०११) जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी १७.५% लोकसंख्या भारतात निवास करते. भारताचा ऊर्जा वापराचा वाटा मात्र ४.२% एवढा कमी आहे. जर निरपेक्ष आकड्यांमध्ये सांगायचे झाले तर भारताचा व्यावसायिक ऊर्जा उपभोग हा ५२४.२ दशलक्ष टन तेल समकक्ष (Million Tonnes of Oil Equivalent - MTOE) एवढा आहे.

भारतामध्ये जिथे ७०% लोक ग्रामीण भागात राहतात, तिथे आपला देश विकासाच्या प्रगतीपथावर राहायचा असेल तर ग्रामीण ऊर्जा अधिकच महत्त्वाची आहे. आपल्या खेड्यांपैकी २१ टक्के खेडी आणि ५०% ग्रामीण घराचं अजून ही विद्युतीकरण झालेले नाही. त्याचप्रमाणे ग्रामीण आणि शहरी भागादरम्यान दरडोई ऊर्जेच्या वापरामध्येही बरीच तफावत आहे. ७५% ग्रामीण कुटूंब स्वयंपाकासाठी जळणावर अवलंबून आहेत. १०% शेणाच्या गोवऱ्या वापरतात आणि ५% एलपीजी वापरात. त्याउलट २२ टक्के केरोसीन वापरतात आणि ४४% लोक एलपीजी वापरात. त्याचप्रमाणे घरातील प्रकाशासाठी ५०% ग्रामीण घरे केरोसिनवर अवलंबून असतात आणि अन्य ४८ टक्के वीजेचा वापर करतात, तर ८९ टक्के शहरी कुटुंबे वीजेवर अवलंबून असतात आणि अन्य १० टक्के केरोसिन वापरतात. वापरल्या जाणाऱ्या ग्रामीण ऊर्जेपैकी ८०% टक्के ऊर्जा ही जैवभारापासून तयार केलेली असते. त्यामुळे खेड्यांमध्ये आधीच लुप्त होत असलेल्या वनक्षेत्रावर प्रचंड दबाव येत आहे. अकार्यक्षम चुलींच्या वापरामुळे सरपण गोळा करण्यात गुंतलेल्या महिला आणि बालकांच्या हालअपेष्टेत बऱ्याचदा भरच पडते. भरीला, घरात स्वयंपाक करताना या चुलींमधून निघणाऱ्या धुरामुळे महिला आणि बालकांच्या श्वसन आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

**ग्रामीण भागातील रस्त्यांची सद्य:स्थिती:**

२००५ साली जाहीर *भारत निर्माण योजनेमध्ये ग्रामीण रस्ते* या घटकाचा समावेश करण्यात आला. गेल्या आठ वर्षात देशातील रस्ते विकासात प्रतिवर्षी १.२५ लाख कि.मी. रस्त्यांची भर पडली आहे. भारतात सध्या ४.४२ दशलक्ष कि.मी. पेक्षा जास्त रस्त्याचे जाळे आहे. यासह भारताचा रस्त्यांच्या जाळ्याबाबतीत जगात दुसरा क्रमांक लागतो. देशात सध्या ०.६६ प्रती चौ. कि. मी. एवढी रस्त्यांची घनता आहे. ही घनता

अमेरिकेपेक्षा जास्त आहे.

नोव्हेंबर २०११ पर्यंत बांधलेल्या चौपदरी रस्त्यांची लांबी १४,५०० कि.मी. इतकी आहे. या रस्त्यांद्वारे देशातील महत्त्वाचे आर्थिक, धार्मिक स्थळांना जोडण्यात आले आहे. २००७-२०१२ च्या आर्थिक पाहणीनुसार अजूनही देशातील ३,३०,००० वस्त्यांना रस्ते उपलब्ध नाहीत व बऱ्याच ठिकाणी कच्चे रस्ते आहेत. देशातील रस्त्यांची विभागणी खालील प्रमाणे दिलेली आहे.

| | |
|---|---|
| राष्ट्रीय महामार्ग- | ७०,९३४ कि.मी. |
| राज्य महामार्ग- | १,५४,५२२ कि.मी. |
| इतर रस्ते- | ३८,८४,१३६ कि.मी. |

राष्ट्रीय महामार्गासंबंधी एकेरी, दुहेरी व बहुपदरी रस्ते असे भाग पडतात. एकूण राष्ट्रीय महार्गापैकी त्यांचे विभाजन पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| एक पदरी- | १७,०८९ कि.मी. (२०%) |
| दोन पदरी- | ३६,६५१ कि.मी. (५२%) |
| चार/सहा/आठ पदरी- | १७,१९४कि.मी.(२४%) |

२०१० च्या अहवालानुसार खालील बाब लक्षात आली आहे.

भारतातील रस्त्यांचा वेग क्षमता ३०-४० कि.मी./तास इतकी आहे. जागतिक सरासरीत चीनची ६०-८० कि.मी./तास इतकी क्षमता आहे.

### ग्रामीण भागातील दूरध्वनी स्थिती:

२१ व्या शतकात माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञानाच्या विकासाने आपल्या जीवन जगण्याच्या पध्दती आमुलाग्रपणे बदलल्याचे चित्र दिसते. उदारीकरणाचे धोरण आणि खासगी क्षेत्राच्या प्रवेशामुळे दूरध्वनी धारकांची संख्या ४२९.७३ दशलक्ष (२००९) वरुन वाढून २०१२ मध्ये ९२६.५५ दशलक्ष एवढी झाली आहे. दूरध्वनी घनता २००७ सालच्या १८.२ टक्क्यांवरुन वाढून २०१२ पर्यंत ७६.८६ टक्के एवढी वाढली आहे. यापैकी शहरी क्षेत्रात १६७.४ टक्के तर ग्रामीण भागात ३७ टक्के इतके प्रमाण दिसून येते.

दूरध्वनी घनता जरी ७६.८६ टक्के असली तरी दूरध्वनी धारकांचे प्रमाण भारतभर समान नाही. त्यामध्ये प्रादेशिक विषमता आढळते. जसे दिल्ली (२३५.६%) मुंबई (१८८.९५ टक्के), कोलकाता (१६८.४५ टक्के), चेन्नई (१७०.१८ टक्के), हिमाचल प्रदेश (११८.६३ टक्के) या विभागांमध्ये दूरध्वनीची उच्च घनता आढळते. तर बिहार (४७.१७ टक्के) आणि आसाम (४५.८५ टक्के) या ठिकाणी सर्वात कमी घनता आढळते.

ब्रॉडब्रँड सेवेची उच्च क्षमता लक्षात घेऊन राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आणि ज्ञानाधारित समाज निर्माण करण्यामधील त्यांचे स्थान लक्षात घेऊन शासनाने २००४ मध्ये राष्ट्रीय ब्राँडबँड धोरण जाहीर केले. याचा परिणाम म्हणून डिसेंबर २०११ पर्यंत देशात १३.३० दशलक्ष ब्राँडबँड धारक आहेत. तर २०.१९ दशलक्ष एवढी इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या आहेत.

### ग्रामविकासात पायाभूत सुविधांचे महत्त्व:

कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती त्या देशातील शेती, उद्योग, व्यापार यांच्या विकासावर अवलंबून असते. शेती क्षेत्राच्या जलद

विकासाकरिता पाणीपुरवठा, रस्ते, रेल्वे आदिंची गरज असते. तसेच औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी श्रमपुरवठा, व्यवस्थापन, वीजपुरवठा, बँक व्यवस्था, बाजारपेठांच्या सुविधा; वाहतूक व दळणवळणाच्या सोई, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान इत्यादी बाबींची आवश्यकता असते. या सर्व सेवासुविधांना सामुहिकरित्या *पायाभूत सुविधा* म्हणतात. प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासासाठी या पायाभूत सुविधांची नितांत आवश्यकता असते. या सुविधा जितक्या अधिक गतीने उपलब्ध होतात. तितक्या अधिक गतीने अर्थव्यवस्थेचा विकास होतो. या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाल्या नाहीत तर आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात.

पायाभूत संरचनेच्या विकासातून सामाजिक व सांस्कृतिक प्रगती देखील वाढीला लागते. वाहतूक व दळवळणाच्या विकासाबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक विचारांचे आदान - प्रदान वाढते. विविध प्रदेशातील लोकांचे नवी मूल्ये, नव्या परंपरा, भाषा यांची ओळख होते. यातूनच सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेला एकप्रकारे वेग येतो. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास असतो किंवा शहरी भागाचा विकास या पायाभूत सुविधांचे अन्ययसाधारण असे महत्त्व आहे.

**ग्रामविकासातील समस्या व उपाययोजना:**

भारतातील पायाभूत सुविधांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. खेड्यातून शहराकडे स्थलांतरणाचे प्रमाण मोठे आहे. ग्रामीण भागात सुविधांचा अभाव असल्या कारणामुळे ग्रामीण विकासात अनेक समस्या निर्माण होतात. पक्क्या रस्त्यांची समस्या ही मूलभूत समस्या आहे. आजही हजारो गावे पक्क्या रस्त्यापासून दूर आहेत. दुर्गम, डोंगरी भागात रेल्वे वाहतूक दुर्मिळच असलेली दिसून येते. तसेच निकृष्ट दर्जाच्या जलशुध्दीकरण व चाचणी सुविधा, शुध्द व स्वच्छ पाणी पुरवठ्याचा अभाव वीजेचा अपुरा पुरवठा, वनक्षेत्रावर प्रचंड दबाव, स्वच्छतेचा अभाव दिसून येतो. ग्रामीण भागात घरात स्वयंपाक करताना चूलींमधून निघणाऱ्या धूरामुळे महिलांच्या व बालकांच्या श्वसन आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. पायाभूत सुविधा सर्वांपर्यंत पोहचवण्यासाठी भांडवलाचा अभावामुळे असमर्थता, शासनामर्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची कार्यक्षम अंमलबजावणीचा अभाव यासारख्या अनेक समस्या ग्रामीण विकासात अडथळा ठरताना आढळतात. या समस्या दूर करण्यासाठी खालील उपाययोजना सुचविता येतील.

**उपाययोजना:**

१) ग्रामीण विकासासाठी ५०० लोकसंख्येपेक्षा अधिकच्या १०० टक्के खेड्यांची रस्ते जोडणी करणे.

२) ग्रामीण भागाच्या विकासाकरिता दूरसंचार क्षेत्राचा विकास केल्यास निकडीच्या परिस्थितीत आरोग्य सेवा आणि इतर अत्यावश्यक सेवांचा लाभ घेण्याकरिता मदत होईल.

३) ग्रामीण भागाचा विकास करण्याकरिता शासनाने केलेल्या सर्व योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

४) ग्रामीण भागाच्या विकासासाठी संशोधन, विकास आणि कार्यप्रदर्शन यावर मुख्य भर देणे गरजेचे आहे.

५) तसेच वृक्षारोपण, प्रक्रिया आणि दुसऱ्या पिढीचे जैवकोषिक इंधनांचे उत्पादन तंत्रज्ञान देखील त्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे.

६) १०० किंवा अधिक लोकसंख्या असलेल्या बिगर विद्युतीकरण गावांचे विद्युतीकरण करणे व अशा विद्युतीकरण झालेल्या गावांमध्ये/वसाहतींमध्ये योग्य क्षमता उपलब्ध असलेला वितरण ट्रान्सफॉर्मर बसविणे.

७) जनजागरण व आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून स्वच्छता सुविधांसाठी मागणी निर्माण करणे.

८) जलसंवर्धनावर भर देऊन त्यासाठी सर्व प्रकारच्या उपायांचा वापर करणे.

थोडक्यात पायाभूत सोयींचा ग्रामीण विकासावर विविध परिणाम होत असतात. जर योग्य त्या उपाययोजना केल्या तर उत्पादकता वाढते, भांडवली साठा वाढतो, सार्वजनिक सेवा व वस्तू वाढतात, ज्याचा परिणाम म्हणजे उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत होते. गरिबी व दारिद्र्य दूर करण्यास मदत होते, रोजगारीच्या संधी उपलब्ध होतात. म्हणजेच ग्रामीण भागाचा विकास होतो व देश उन्नतीच्या मार्गाने वाटचाल करु लागतो.

**संदर्भ सूची:**

१) घोडके अमोल लक्ष्मण, *भारतातील मानव संसाधन विकास*, द युनिक ॲकॅडमी प्रकाशन, एप्रिल २०१३.

२) *राज्यसेवा मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन पेपर* ४, स्टडी सर्कल पब्लिकेशन लिमिटेड.

३) पाटील जे. एफ्., *वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र*, फडके प्रकाशन, कोल्हापूर डिसेंबर २००७.

४) देशपांडे ज्योत्स्ना, *विकासाचे अर्थशास्त्र*, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, जुलै २०११.

# ग्रामीण विकासात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची भूमिका

**भागचंद शंकरराव खुरुद, राहुरी,**
ता. राहुरी, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी: ९९७०९८१५९२.
ई-मेल: khurudbs@gmail.com

**संदिप बाबुराव अभंग, खंडाळा,**
ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर,
भ्रमणध्वनी: ९७६६१२१६२३
ई-मेल: abhangsandip6@gmail.com

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतातील खेड्यांची संख्या जवळपास ६.५ लाख आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ६८.८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. रोजगार व उपजिविकेसाठी या लोकांना शेतीवर अवलंबून रहावे लागते. लोकसंख्या सतत वाढत असल्यामुळे लोकसंख्येचा अतिरिक्त भार शेतीवर पडतो. त्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी, दारिद्र्य आणि उपासमार या समस्यांची तीव्रता वाढत आहे. ग्रामीण भागातील लोक रोजगार प्राप्तीसाठी शहरांकडे स्थलांतर करीत आहेत. याचा परिणाम शहरी भागातील पायाभूत सुविधांवर अतिरिक्त ताण निर्माण होण्यावर होत आहे. या समस्यांवरील रामबाण इलाज म्हणजे ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणे हा होय. ग्रामीण विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने अनेक योजना व कार्यक्रम सुरु केलेले आहेत. परंतु यासर्व योजना व कार्यक्रमाचे यश मर्यादित आहे. यातूनच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांना (MSMEs) जास्त प्रोत्साहन देण्याची गरज अधोरेखित होते. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम अल्पभांडवलात सुरु करता येतात. स्थानिक साधनसामग्री व कच्च्या मालाचा ते वापर करतात, सर्वसाधारण तंत्राच्या वापराला चालना देतात. प्रादेशिक असमतोल

दूर करण्यास मदत करतात, अकुशल श्रमिकांना उत्पादन प्रक्रियेत सामावून घेतात, प्रचंड रोजगार निर्मिती करतात, ग्रामीण भागातील लोकांचे उपजिविकेचे साधन बनतात आणि एकूणच ग्रामीण औद्योगिकरणाला गती देवून ग्रामीण भागाचा विकास घडवून आणतात. म्हणून त्यांना ग्रामीण अर्थव्यवस्थेची आधारशिला मानण्यात येते. यादृष्टीने ग्रामीण भागाच्या विकासासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देणे आवश्यक ठरते.

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम क्षेत्र:**

लघुउद्योग क्षेत्राचे अस्तित्व भारतात प्राचीन काळापासून आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात हे क्षेत्र वैभवाच्या शिखरावर पोहचलेले होते. या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या दर्जेदार व आकर्षक वस्तूंना जगाच्या कानाकोपऱ्यातून मागणी येत असे. स्वातंत्र्योत्तर काळात या क्षेत्राचे महत्त्व आणि योगदान विचारात घेऊन सरकारने त्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. सन २००६ मध्ये लघुउद्योगांच्या विकासासाठी सूक्ष्म लघु आणि मध्यम उपक्रम विकास कायदा पास करण्यात आला तसेच स्वतंत्र मंत्रालयही निर्माण करण्यात आले. २००६ च्या विकास कायद्यात लघुउद्योग क्षेत्रातील उपक्रमाची वस्तू निर्माण उपक्रम आणि सेवा पुरविणारे उपक्रम अशा दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक गटात गुंतवणूकीच्या निकषानुसार सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम असे तीन उपगट तयार करण्यात आले आहेत. वस्तू निर्माण गटात २५ लाख रु. पर्यंत गुंतवणूक असणाऱ्यांना सूक्ष्म उपक्रम, २५ लाख रु. पेक्षा जास्त परंतु ५ कोटी रु.पर्यंत गुंतवणूक असणाऱ्यांना लघु उपक्रम तर ५ कोटी रु. पेक्षा जास्त परंतु १० कोटी रु. पर्यंत गुंतवणूक असणाऱ्यांना मध्यम उपक्रम मानले जाते. सेवा पुरविणाऱ्या गटात १० लाख रु. पर्यंत गुंतवणूक असणाऱ्यांना सूक्ष्म उपक्रम, १० लाख रु. पेक्षा जास्त परंतु २ कोटी रु. पर्यंत गुंतवणूक असणाऱ्यांना लघु उपक्रम तर २ कोटी रु. पेक्षा जास्त परंतु ५ कोटी रु. पर्यंत गुंतवणूक असणाऱ्या उपक्रमांना मध्यम उपक्रम मानले जाते. प्रस्तुत लेखात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राची सद्यस्थिती आणि ग्रामीण विकासातील या क्षेत्राचे योगदान स्पष्ट केले आहे. विश्लेषणासाठी द्वितीय आकडेवाडीचा वापर केला आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची संख्या, गुंतवणूक, उत्पादन, रोजगार आणि निर्यात ही निर्देशके या विश्लेषणाचे आधारस्तंभ आहेत.

**ग्रामीण सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची सद्यस्थिती:**

भारताच्या ग्रामीण भागातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या सद्यस्थितीचा आढावा या विभागात घेतला आहे. तक्ता क्र. १ मध्ये त्याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. ही माहिती सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या चौथ्या राष्ट्रीय गणना अहवालावर आधारित आहे. त्यानुसार भारतात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची संख्या १५.६४ लाख होती. त्यापैकी ७.०७ लाख म्हणजे ४५.२३ टक्के उपक्रम ग्रामीण भागात कार्यरत होते. भारतातील १५.६४ लाख उपक्रमात सूक्ष्म उपक्रमांची संख्या १४.८५ लाख, लघुउपक्रम ०.७६ लाख तर मध्यम उपक्रम ०.०३ लाख इतके होते. त्यात ग्रामीण भागाचा वाटा अनुक्रमे ४६.२६ टक्के, २५ टक्के एवढी होती. ग्रामीण भागात प्रति उपक्रम सरासरी ५.२०

तक्ता क्र. १

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम क्षेत्राची ग्रामीण भागातील सद्यस्थिती

| क्र. | तपशील | भारत एकूण | ग्रामीण भारत |
|---|---|---|---|
| १. | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम संख्या (लाख) | १५.६४ | ७.०७ (४५.२३) |
| | अ.सूक्ष्म उपक्रम संख्या (लाख) | १४.८५ | ६.८७ (४६.२६) |
| | ब.लघु उपक्रम संख्या (लाख) | ०.७६ | ०.१९ (२५.००) |
| | क.मध्यम उपक्रम संख्या (लाख) | ०.०३ | ०.०१ (३३.३५) |
| २. | रोजगार (लाख व्यक्ती) | ९३.०९ | ३६.८२ (३९.५५) |
| ३. | प्रती उपक्रम रोजगार प्राप्ती (व्यक्ती सरासरी) | ५.९५ | ५.२० |
| ४. | स्थूल उत्पादन (कोटी रु.) | ७०७५१०.२७ | २४२५३२.८० (३४.२८) |
| ५. | प्रति उपक्रम स्थूल उत्पादन (लाख रु.) | ४५.२४ | ३४.२८ |
| ६. | निर्यात (कोटी रु.) | ६७९१३.८५ | २१५५७.४१ (३१.७४) |
| ७. | प्रती उपक्रम निर्यात (लाख रु.) | ४.३४ | ३.०४ |
| ८. | गुंतवणूक (कोटी रु.) | १०५०२४.८१ | २९७२६.५१ (२८.३०) |
| ९. | प्रती उपक्रम गुंतवणूक (लाख रु.) | ६.७१ | ४.२० |
| १०. | महिला संचलित उपक्रमांचे प्रमाण (%) | १३.७२ | १५.२७ |
| ११. | एस.सी.प्रवर्ग संचलित उपक्रमांचे प्रमाण (%) | ७.६० | १०.२० |
| १२. | एस.टी.प्रवर्ग संचलित उपक्रमांचे प्रमाण (%) | २.८७ | ४.०२ |
| १३. | इतरमागासप्रवर्ग संचलित उपक्रमांचे प्रमाण(%) | ३८.२८ | ४३.६७ |
| १४. | सामान्य प्रवर्ग संचलित उपक्रमांचे प्रमाण(%) | ५१.२६ | ४२.११ |

*टिप : कंसातील आकडे ग्रामीण भागाचे शेकडा प्रमाण दर्शवितात.*

*स्त्रोत : भारत सरकार, विकास आयुक्त, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम २०११, चौथी राष्ट्रीय गणना अहवाल, नवी दिल्ली.*

३३.३३ टक्के असा होता. देशातील १५.६४ लाख उपक्रमांत ९३.०९ लाख व्यक्तींना रोजगार मिळाला होता व त्यापैकी ग्रामीण भागातील रोजगारींची संख्या ३६.८२ लाख म्हणजे ३९.५५

व्यक्तींना रोजगार मिळाला होता.

चतुर्थ गणना अहवालातील नोंदीनुसार भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम क्षेत्राची गुंतवणूक, स्थूल उत्पादन आणि निर्यात अनुक्रमे १०५०२४.८१ कोटी रु. ७०७५१०.२५ कोटी रु. आणि ६७९१३.८५ कोटी रु. एवढी होती. त्यात ग्रामीण भागातील उपक्रमांचे योगदान अनुक्रमे २९७२६.५ कोटी रु. (२८.३० टक्के), २४२५३२.०८ कोटी रु. (३४.२८ टक्के) आणि २१५५७.४१ कोटी रु. (३१.७४ टक्के) इतके होते. महिला संचलित उपक्रमांचे प्रमाण भारतात १३.७२ टक्के तर ग्रामीण भागात ते १५.२७ टक्के असे होते. जात प्रवर्ग निहाय उपक्रमांचा तपशील पहिला तर भारतात एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. आणि खुला प्रवर्ग संचलित उपक्रमांचे प्रमाण अनुक्रमे ७.६० टक्के, २.८७ टक्के, ३८.२८ टक्के आणि ५१.२६ टक्के इतके होते. हेच प्रमाण ग्रामीण भागात अनुक्रमे १०.२८ टक्के, ४.०२ टक्के, ४३.६७ टक्के आणि ४२.११ टक्के असे होते.

राज्यनिहाय ग्रामीण भागातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या विकासात मात्र बरेच असंतूलन दिसून येते. भारताच्या ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या एकूण सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांपैकी तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश या सहा राज्यात ६४.६८ टक्के उपक्रम तर उर्वरित सर्व राज्यात ३५.३२ टक्के उपक्रम केंद्रित झालेले आहेत. सहा राज्यातील उपक्रमांत गुंतवणूक, रोजगार, उत्पादन आणि निर्यातीचे प्रमाण देखील बरेच जास्त म्हणजे अनुक्रमे ४७.३० टक्के, ५०.३२ टक्के, ३०.४१ टक्के आणि ४९.५७ टक्के एवढे आहे.

**विद्यमान समस्या:**

ग्रामीण विकासात सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांचे योगदान महत्त्वपूर्ण असले तरी या उद्योगांना सध्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यामध्ये कच्च्या मालाचा तूटवडा, त्याचे अवाजवी दर, भांडवलाची कमतरता, कालबाह्य तंत्रज्ञान, विक्री व्यवस्थेचा प्रश्न, वित्त उभारणीतील अडचणी, व्याजाचे जास्त दर, करांचा बोजा, मोठ्या उद्योगांशी करावी लागणारी स्पर्धा, प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांचा अभाव, पायाभूत सुविधांचा अभाव, वीज टंचाई, वीजेचे जास्तीचे दर, भ्रष्टाचार, लालफितीचा कारभार या समस्यांचा समावेश होतो. लघु उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांना विविध स्वरुपाची मदत करण्यासाठी सरकारच्या अनेक योजना आहेत. परंतु त्यांचे लाभ ग्रामीण भागातील उपक्रमींपर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे ग्रामीण उद्योजक शासनाच्या मदतीपासून वंचित राहतात.

देशातील सूक्ष्म, लघु आणि कुटीर उद्योग क्षेत्रातील उत्पादकांसाठी सध्या २० वस्तूंचे आरक्षण ठेवण्यात आले होते. केंद्र सरकारने ते नुकतेच रद्द केले आहे. केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने १० एप्रिल २०१५ रोजी अधिसूचना जारी करुन आरक्षित २० उत्पादनाची सूची रद्दबातल ठरवित असल्याचे सूचित केले आहे. त्यामुळे या वस्तूंचे उत्पादन आता सर्व कंपन्यांसाठी अगदी बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी खुले झाले आहे. लोणचे, पापड, तयार मसाले, ब्रेड, मेणबत्त्या ही उत्पादने ग्रामीण भागातील महिला बचत गट व गृहउद्योगातून केली जात होती. त्यातून असंख्य महिला व बेरोजगार व्यक्तींना

रोजगार मिळत होता. आता मात्र या उद्योगांना थेट बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेत उतरावे लागेल व स्पर्धेत निभाव न लागल्यास गाशा गुंडाळावा लागेल. त्यामुळे दुष्काळ, अवर्षण, गारपीट व अवकाळीने ग्रस्त ग्रामीण भागातील लोकसंख्येचा रोजगार व उपजीविकेचा आधार नष्ट होण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे.

**उपाययोजना:**

ग्रामीण भागातील लघु उपक्रमींच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारने वित्तीय संस्थामार्फत ग्रामीण उपक्रमांना वेळेवर कर्ज पूरवठा होण्याच्या दृष्टिने स्वतंत्र निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. औद्योगिक वसाहतीमधील रस्ते, पाणी पुरवठ्याच्या सुविधा, वीज, विकसित केलेले भूखंड उद्योग सुरु करणाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. ग्रामीण भागातील उद्योजकांना शासकीय खरेदीत जास्तीची सवलत असावी. तसेच कच्चामाल आणि वीज दरातील सवलत प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात यावी. ग्रामीण भागातील उद्योजकांसाठी आणि लघु उद्योगातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे स्थानिक पातळीवर घेण्यात यावी. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याला प्रोत्साहान देण्यात यावे. शासनाच्या विविध योजनांच्या माहितीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी ग्रामीण भागात चर्चासत्रे, कार्यशाळा आयोजनाबरोबरच सोशल प्रसार माध्यमांचा अवलंब करण्यात यावा. ग्रामीण भागात कृषी आधारित प्रक्रिया उद्योगांच्या स्थापनेसाठी केंद्र - राज्य आणि ग्रामीण उद्योजकांच्या संघटना यांनी एकत्रित प्रयत्न करुन समस्यांचे निवारण करावे.

**सारांश:**

उपरोक्त विश्लेषणावरुन सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम हे भारतातील ग्रामीण उद्योगिकरण, ग्रामीण रोजगार व ग्रामीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. त्यामुळे या उद्योगांसमोरील प्रश्न -अडचणी शासनाने प्राधान्याने सोडविणे आवश्यक आहे. या उद्योगांचा विकास म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि पर्यायाने भारताचा विकास होय. म्हणून सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागाला प्राधान्य देणारे स्वतंत्र ग्रामीण प्रतिमान (Rural Model) राबविण्याची नितांत गरज आहे.

**संदर्भ सूची:**


१. Govt. of India, Ministry of MSMEs, *Final Report of Fourth All India Census of MSMEs 2006 - 07*, New Delhi.

२. Nair, T. K. A. (2010) : *Report of the Prime Ministers Task Force on MSME*, Published by P. M. Office, New Delhi.

३. Rajaiah, K. and Sivasankar, P. R. (Sept. 2012) ; *Role of MSMEs in the Economic Development of India, SEDME*, Vol. 39, No. 3, PP. 75 - 84.

४. Vijayarani, K. R. (2011) ; *Small Scale Industries in India Problems and Policy Initiatives*, New Century Publications, New Delhi.

५. खुरुद,भा.शं.(जानेवारी-मार्च २०१३); *भारतीय स्वातंत्र्याची पासष्ट वर्षे आणि*

लघुउद्योग क्षेत्राचा विकास, वाणिज्य विद्याखंड २, अंक १, पृ. ९-१८.

६) अभंग संदिप(एप्रिल-जून २०१२), नवीन आर्थिक सुधारणांचा लघुउद्योगांच्या विकासावरील प्रभाव, वाणिज्यविद्या, खंड १, अंक २, पृ. ११५-१२६

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## सभासद व संस्थांना आवाहन

### स्व. जमनालाल बजाज उपक्रम

मा. जमनालाल बजाज कुटुंबियांनी दिलेल्या निधीतून दर वर्षी महाराष्ट्रात कोणत्याही एका शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने एक किंवा दोन दिवसांचा सदर उपक्रम राबविला जातो. विशेषकरून महात्मा गांधी यांच्या विचारांना मध्यवर्ती ठेऊन चर्चासत्र, परिसंवाद किंवा कार्यशाळा या स्वरुपात प्रस्तुत उपक्रम आयोजित केले जातात. याकरिता परिषदेच्या वतीने रु.५०००/- ची आर्थिक मदत प्रोत्साहन म्हणून आयोजन करणाऱ्या संस्थेला दिली जाते.

### पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान

कै. पां. वा. गाडगीळ हे परिषदेचे आजीव सदस्य होते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे कुटुंबियांकडून दरवर्षी रु.५०००/- चा निधी उपलब्ध करून दिला जातो. महाराष्ट्रातील यजमान शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने नामवंत आर्थिक विचारवंताचे व्याख्यान आयोजित केले जाते.

### डॉ. सुधा मोकाशी पुरस्कृत व्याख्यान

डॉ. सुधा मोकाशी यांच्या आर्थिक सहकार्यातून कार्यशाळा, चर्चासत्र, व्याख्यान महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात आयोजित केले जाते. त्यांच्या अपेक्षेनुसार मत्स्य व्यवसायासंबंधी विषयावर अशा उपक्रमाचे आयोजन केले जाते. याकरिता मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने रु.७,०००/-चे आर्थिक सहाय्य यजमान महाविद्यालयास दिले जाते.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सदस्यांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन आपल्या महाविद्यालयातून करण्याकरिता मागणी प्रस्ताव कार्यवाहांकडे पाठवावेत. परिषदेचे विविध उपक्रम आपल्या सहकार्यानेच यशस्वीपणे राबविले जावू शकतात.

- कार्यवाह खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन योजना

**मदन राधाकिसन शिंदे**, पाटोदा,
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान
महाविद्यालय, जि.बीड.
भ्रमणध्वनी:९४२२६१७५११
ई-मेल: dr.madan.shinde@gmail.com

भारतामध्ये एकुण लोकसंख्येपैकी ६८% लोकसंख्या आजही ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करते. त्यामुळे जोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होणार नाही, तो पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होणार नाही. भारत सरकारने ग्रामीण विकास करण्याकरिता विविध योजना राबविल्या. भारतातील ग्रामीण विकास मंत्रालयातर्फे ग्रामीण विकास विभागांतर्गत गरिबी निर्मुलन, रोजगार वृध्दी, मुलभूत सेवा पुरवठा इ. कार्यक्रम राबविले जातात.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विविध शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्याच बरोबर मनरेगा या राष्ट्रीय पातळीवरच्या कायद्यानुसार ग्रामीण भागाच्या विकासात काय बदल झाला ते अभ्यासण्यात आले आहे. शोधनिबंधाच्या अभ्यासाकरिता प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची माहिती विचारात घेतली आहे. यामध्ये वार्षिक अहवाल, मासिके, संदर्भ ग्रंथ, इ.चा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासाकरिता पुढील उद्दिष्ट्ये विचारात घेतली आहेत.

१. ग्रामीण भागातील जनतेच्या विकासाकरिता राबविण्यात आलेल्या शासकीय योजनांचा आढावा घेणे.
२. मनरेगा अंतर्गत ग्रामीण भागामध्ये झालेल्या प्रगतीचा अभ्यास करणे.
३. दुष्काळासारख्या संकटावर कायमस्वरुपी मात करण्याकरिता दीर्घकालीन उपाय योजनांचा अभ्यास करणे.

ग्रामीण भागाच्या विकासाकरिता राष्ट्रीय व राज्य पातळीवरुन विविध योजनांद्वारे कार्यक्रम राबविले गेले आहेत. ग्रामीण भागाचा विकास म्हणजेच देशाचा विकास हे तत्व समोर ठेवून भारत सरकारने विविध योजना राबविल्या. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या एकुण लोकसंख्येपैकी बहुतांश गरिबांचे जीवन

मजुरीवर अवलंबून आहे ते अकुशल मजूर म्हणून मजुरी मिळवतात.

भारत सरकारने मजुरी रोजगार (Wage Employment Programme) कार्यक्रम राबविला. सन १९६०-६१ मध्ये हा कार्यक्रम सुरु केला. उद्देश हा होता की, लोकांना कमीत कमी मजुरीवर घेऊन सार्वजनिक काम करुन घेणे.

ग्रामीण रोजगाराची धडक योजना(Crash Scheme of Rural Development) सन १९७१ मध्ये सुरु करण्यात आली. ही योजना चौथ्या योजना काळापुरतीच मर्यादित होती. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करुन तेथील दारिद्र्य दूर करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेत पूर नियंत्रण, मृदसंधारण, पाण्याच्या योजना व रस्ते विकास इ. कामांवर १५० कोटी रुपये खर्च करण्यात आले.

सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास (Marginal Farmers and Agriclutural Labours Agency-MFALA) अधिकरणाची स्थापना १९७०-७१ मध्ये करण्यात आली. या योजनेत शेतमजूर व सीमांत शेतकऱ्यांच्या व्याख्या करण्यात आल्या. या योजनेअंतर्गत ५०% पेक्षा अधिक उत्पन्न जे लोक शेतीवर काम करुन मिळवतात त्यांना शेतमजूर समजण्यात आले. तसेच अडीच एकरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना सीमांत शेतकरी समजण्यात येईल. या योजनेअंतर्गत सीमांत शेतकरी व शेतमजुरांना पूर्ण वेळ रोजगार उपलब्ध व्हावा व त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा व्हावी म्हणून शेतीला पुरक व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, पाणीपुरवठा, भू-संरक्षण इत्यादी कामांसाठी अर्थसाह्य दिले गेले.

एकीकृत ग्रामीण विकास कार्यक्रम (Integrated Rural Development Programme-IRDP) भारतात प्रथम निवडक २३०० विकास खंडामध्ये ही योजना १९७८-७९ मध्ये सुरु करण्यात आली. त्यानंतर २ ऑक्टोबर १९८० मध्ये संपूर्ण देशपातळीवर ही योजना सुरु करण्यात आली. सहाव्या योजनेच्या काळात प्रत्येक विकास खंडातील ३००० कुटूंब असे संपूर्ण भारतातील १.५ कोटी कुटुंबांना दारिद्र्य रेषेच्या वर आणण्याचे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. १ एप्रिल १९९९ पासून एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम ही योजना बंद करुन ती सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली. १५ ऑगस्ट १९८३ पासून केंद्रसरकारने महाराष्ट्रातील रोजगार हमी कार्यक्रमाच्या धर्तीवर ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम संपूर्ण भारतासाठी सुरु केला. या योजनेअंतर्गत हंगाम संपल्या नंतर ग्रामीण भूमिहीन शेतमजुरांना कायमस्वरुपी रोजगाराची निर्मिती करुन देणे, त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे, ग्रामीण विकासाला पूरक अशी कामे हाती घेणे, ग्रामीण भागाला जोडणारे रस्ते बांधणे, पडीक जमिनीत सुधारणा करणे, वनीकरण करणे, जमिनीचे संरक्षण करणे इ.बाबीवर भर देण्यात आला. हा कार्यक्रम पुढे १ एप्रिल १९८९ ला जवाहर रोजगार योजना या नावाने राबविण्यात आला. या योजनेची घोषणा १९८९-९० च्या अंदाजपत्रकात करण्यात आली. या योजनेची ठळक लक्षणे पुढील प्रमाणे आहेत.

१. दारिद्र्यातील कुटूंबाच्या किमान एका सदस्याला ५० ते १०० दिवस रोजगार उपलब्ध करुन देणे.
२. एकूण रोजगारापैकी ३०% रोजगार महिलांसाठी राखून ठेवणे.

३. या योजनेसाठी ग्रामपंचायतीला निधी उपलब्ध करुन देणे व ग्रामपंचायती मार्फत या योजनेची अंमलबजावणी करणे.
४. या योजनेच्या निधीचे वेगवेगळ्या विभागात वाटप करताना राज्य सरकार दारिद्र्याचे प्रमाण आणि अनुसूचित जाती-जमातींचे प्रमाण हे दोन निकष वापरत असे.
५. या योजनेवर ८०% केंद्र सरकारचा व २०% राज्य सरकारचा निधी खर्च होतो.

१ एप्रिल १९९९ मध्ये जवाहर रोजगार योजनेची पुनर्रचना करुन तिला जवाहर ग्राम समृध्दी योजना हे नाव देण्यात आले.

रोजगार आश्वासन योजना (Employment Assurance Scheme-EAS) २ ऑक्टोबर १९९३ ला सुरु करण्यात आली. या योजनेद्वारे सरकारने ग्रामीण भागातील हंगामी शेतमजुरांना रोजगाराचे आश्वासन दिले. शेतीचा हंगाम संपल्यानंतर ग्रामीण हंगामी बेरोजगारांना वर्षातून किमान १०० दिवस रोजगार पुरविणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट होते. या योजनेमध्ये एका कुटुंबातील किमान दोन व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन दिला जाणार होता. सन १९९९-२००० या वर्षात २६२४.१ लाख श्रमदिवस रोजगार निर्माण केला गेला. त्यामुळे ग्रामीण शेतमजुरांचे उत्पन्न वाढण्यास मदत झालेली दिसून येते. अशा प्रकारे विविध शासकीय योजनेद्वारे भारत देशाने ग्रामीण भागातील विकासाकरिता प्रयत्न केलेले दिसून येतात. वरील योजना व्यतिरीक्त ऑगस्ट २००७ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजना केंद्राने जाहीर केली. ११ व्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग म्हणून कृषि क्षेत्राची ४% दराने प्रगती घडवून आणून कृषि क्षेत्र व त्यासंबंधीत क्षेत्राचा विकास करण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाने ठरविले होते.

सन २००७-०८ मध्ये राज्याच्या एकूण खर्चाच्या म्हणजे २००० कोटी रु.च्या १०% (२०० कोटी) रुपये हे शेती व शेती संबंधित क्षेत्रावर खर्च केले. सन २००८-०९ मध्ये हे प्रमाण ७.५% राहिले. तसेच २००९-१० मध्ये ७.७% आणि २०१०-११ मध्ये ९% प्रमाण शेती क्षेत्रावरील खर्चाचे होते.

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारने २६ फेब्रुवारी २०१३ ला अकुशल कामगारांचे प्रती दिन मजुरीचे दर किती असावेत हे स्पष्ट केले. त्यानुसार महाराष्ट्रात अकुशल कामगारांची प्रतिदिन मजुरी १८१ रुपये राहील असे स्पष्ट केले. हे दर एप्रिल २०१५ पासुन लागू करण्यात आले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ मधील ४२ च्या कलम ६ च्या उपकलम (१) द्वारा लागु करण्यात आलेले आहेत.

ग्रामीण भागातील जनतेला रोजगार मिळावा तसेच पुरेसे उत्पन्न मिळावे. ज्याद्वारे त्यांना जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे शक्य होईल. या उद्देशानेच प्रतिदिन १८१ रुपये मजुरी देण्याचे निश्चित केले. ग्रामीण भागाचा विकास करणे हा मुख्य उद्देश या योजने मागे दिसून येतो.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ द्वारा केलेल्या कार्यक्रमाचे प्रमुख निष्कर्ष मनरेगा समिक्षेच्या संशोधन अभ्यासातून स्पष्ट झालेले आहेत ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. मनरेगा एक महत्वाचे पुरवणी उत्पन्नाचे साधन म्हणून निदर्शनास आले. मनरेगाचे उत्पन्न हे ग्रामीण कुटुंबासाठी महत्वाचे ठरले आहे.

२. मनरेगामुळे ग्रामीण कुटुंबाच्या प्रतीमहिना उपभोग खर्चात भरीव वाढ झालेली दिसून येते.

३. मनरेगामुळे S.C. आणि S.T. सहित सीमांत गटातील कुटुंबाला उत्पन्नाचा लाभ झालेला आहे.

४. मनरेगामुळे पारंपरिक मजुरी निश्चितीतील लिंग भेद कमी झाला. तसेच स्त्रियांतील सामाजिक व आर्थिक दर्जावर त्याचा चांगला (धनात्मक) प्रभाव पडला आहे.

५. मनरेगामुळे भूजलात वाढ तसेच जमिनीची प्रत सुधारली.

६. मनरेगाच्या कामामुळे कामाचा हक्क तसेच सामाजिक संरक्षण पुरवणे व रोजगार आणि पर्यावरणीय शाश्वत कामाबरोबरच पारिस्थिकी व्यवस्था आणि जैवविविधतेला संरक्षण मिळालेले दिसून आले.

७. आर्थिक वृध्दी आणि इतर कारणामध्ये (Distress migration) वर अधिक प्रत्यक्ष व धनात्मक परिणाम दिसून आलेला आहे.

वरील सर्व निष्कर्ष पाहता मनरेगाचे कार्य ग्रामीण भागाच्या विकासाकरिता तसेच पर्यावरणीय संरक्षणाकरिता उपयुक्त ठरलेले दिसून येते.

महाराष्ट्र शासनाने जलसंवर्धनाकरिता जलयुक्त शिवार ही योजना अंमलात आणून ग्रामीण भागातील जनतेच्या विकासाकरिता प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. या योजनेद्वारे या वर्षा अखेरीस ५ हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या योजनेमध्ये २०१५-१६ या वर्षात १० हजार सिमेंट नालाबांध बांधण्यात येणार आहेत. दुष्काळी उपाययोजनांमध्ये पुढील ठळक बाबी दिसून येतात:

१. दुष्काळग्रस्तांना ३९२५ कोटी रुपयांची थेट शेतकरी मदत, एकूण दुष्काळीमदत ७ हजार कोटी रुपयांची असेल.

२. अडीच लाख हेक्टर फळ बागांसाठी ८८४ कोटी रुपयांचा प्रस्ताव प्रति हेक्टर ३५ हजार रुपये मदत देणार.

३. फळबाग पुनरुज्जीवनासाठी प्रतिहेक्टरी २० हजार रुपये देणार.

४. शेतकऱ्यांच्या प्लॅस्टिक मल्चींगसाठी १६ हजार रुपये प्रति हेक्टरी जाहीर.

५. पिण्याच्या पाण्यासाठी ४२६ कोटी रुपयांचा आराखडा.

६. तीन हजार टँकर मार्फत पाणी पुरवठ्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले.

७. १३ लाख हवामान आधारित विमा- ११ लाख शेतकऱ्यांना विम्याची मदत देणार.

८. ४५ कोटी रुपये शासनाकडुन आणि २३० कोटी रुपये वीमा कंपनीकडून दिले जातील.

९. नदीजोड प्रकल्पाच्या आराखड्यात बदल. त्यात राज्यातील तीन नद्यांचा समावेश.

१०. १५ मार्च २०१५ पर्यंत कृषि संजीवनी योजनेला मुदत वाढ दिली.

११. जलशिवार योजनेत लोकप्रतिनिधींचा समावेश.

दुष्काळावर कायस्वरुपी मात करण्याकरिता योजलेल्या उपाययोजना मध्ये १) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम ५० लक्ष हेक्टर क्षेत्रावर, प्रकल्पांची अंदाजित किंमत रुपये ६४३७ कोटी. पुढील एका वर्षात किमान ५००० गावांना दुष्काळमुक्त करण्याचा शासनाचा निर्धार. २) पुढील ५ वर्षात २.५० लक्ष शेततळी व ५०००० सिमेंट नाला बांध घेण्याचा शासनाचा

मानस, विकेंद्रित साठ्यांद्वारे १० लक्ष हेक्टर शेतजमीन ओलिताखाली येणार. ३) पुढील काळात ५ लक्ष सोलर पंप शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याकरिता धोरणात्मक निर्णय, प्रतीक्षाधिन असलेल्या सर्व शेतकरी या योजनेअंतर्गत समाविष्ट. ४) मागील तीन वर्षापासून सूक्ष्म सिंचनाकरिता थकलेले अनुदान पुर्णपणे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय, वर्ष २०१२-१३ साठी रु.३३२ कोटीची आर्थिक तरतुद उपलब्ध, नाबार्ड कडून रु. ४५० कोटी कर्ज, वर्ष २०१३-१४ मध्ये प्रलंबित सर्व अनुदान अदा करण्यात येत आहे. चालू वर्षा करिता रुपये ३०० कोटी सूक्ष्म सिंचनाकरिता उपलब्ध. पुढील ५ वर्षात किमान १० लक्ष हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याचा निर्णय. ५) पाण्याच्या साठ्यासाठी गाळ काढण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेतला जाणार, रुपये ५० कोटी अधिकची तरतुद. ६) राज्यात कोरडवाहु शेती अभियान, सध्या ५०० गावांना दुष्काळमुक्तीसाठी रुपये १५० कोटी उपलब्ध करुन दिले जाणार.

वरील सर्व योजना व उपाय दुष्काळावर कायस्वरुपी मात करण्याकरिता आयोजित केलेले दिसुन येतात.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शासन स्तरावर ग्रामीण भागाच्या विकासाकरिता आयोजित केलेल्या व राबविलेल्या विविध योजनांचा अभ्यास केलेला आहे. विविध योजनांचा अभ्यास केल्यानंतर असे निदर्शनास येते की, केंद्रसरकारने आणि राज्यसरकारने विविध योजनांच्या माध्यमातून सातत्याने ग्रामीण विकासाचा उद्देश समोर ठेवलेला आहे. विविध योजनांमध्ये मनेरगा या राष्ट्रीय पातळीवरील योजनेचा संशोधनात्मक अभ्यास मनरेगा समीक्षा म्हणून करण्यात आलेला आहे. त्याचे निष्कर्ष पाहता स्पष्ट होते की, या योजनेअंतर्गत केलेल्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागाचा विकास तसेच पर्यावरणाचे संरक्षण करण्यात यश आलेले दिसून येते. परंतु गृहितकाप्रमाणे नंबर दोनचे गृहितकाप्रमाणे ग्रामीण भागाचा विकास शासकीय योजनांमुळे झालेला असला तरी तो समाधानकारकरित्या झालेला दिसून येत नाही. त्यामुळेच आज आपल्याला म्हणजेच शासनाला कायमस्वरुपी दुष्काळावर मात करण्याकरिता दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यानुसार शासनाने प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाने दीर्घकालीन उपाययोजना राबवुन दुष्काळावर मात करण्याचे ठरविले आहे. शेवटी ग्रामीण भागाचा विकास करण्याकरिता दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी प्रत्यक्षात ग्रामीण भागासाठी किती उपयुक्त ठरेल ते पाहणे योग्य ठरेल. उपाययोजनांची अंमलबजावणी जितकी वास्तववादी व ग्रामीण भागांपर्यंत थेट पोहोचेल तेवढे यश प्राप्त केले असे म्हणावे लागेल.

**संदर्भ सूची:**


1) web.www.rural.nic.in, Dt. 14. 04. 2015, P. 11
2) विश्वास कदम, गणेश गावंडे; *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, जुलै २०१३, कैलास पब्लि. औरंगाबाद, पृ.९६-९७.
3) तत्रैव, पृ. ९७-१००
4) wikipedia.org, Dt.14.04.2015, P.1-2
5) nrega.nic.in Dt. 14.04.2015, P.I
6) rural.nrega.nic.in Dt. 14.04.2015.
7) अजय जाधव; *दुष्काळमुक्ती आणि*

*शेतकऱ्यांना दिलासा*, लोकराज्य (मासिक), मार्च २०१५, पृ.९

8) विजय गायकवाड; *संकल्प दुष्काळ मुक्तीचा*, लोकराज्य (मासिक), मार्च २०१५ पृ. ८

## ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, बारामती

### निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करु नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये कारण ते सर्वांना माहित असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक - सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या *'अर्थशास्त्र परिभाषा कोश'* आणि *'शासन व्यवहार कोश'* यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करुन वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरीत नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दात गोषवारा द्यावा.

# ग्राम विकास

**मनिषा वासुदेव चौधरी,** शिरपूर,
श्रीमती. एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालय,
जि. धुळे.
भ्रमणध्वनी: ९४२३३१५८४६

सर्व जगभर शहरांचा सतत विकास होत असूनसुध्दा जागतिक लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे प्रमाण १९५० मध्ये ७९% पेक्षा थोडे अधिकच होते. भारतात १९६१ मध्ये ८२% लोक ग्रामीण भागात राहत होते. तर १९७१ मध्ये हे प्रमाण ८०.१% होते. साहजिकच आर्थिक नियोजनाद्वारा राष्ट्रीय विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक ठरतो आणि म्हणूनच ग्रामीण समस्यांचे स्वरूप नीटपणे समजावून त्या सोडविण्याचे कसोशीने प्रयत्न करावे लागतात.

कुठल्याही राष्ट्रात ग्रामीण समाज उल्लेखनीय कामगिरी बजावत असतो. अन्नधान्ये व इतर कच्चा माल यांचे उत्पादन ग्रामीण भागातच होत असते आणि या बाबतीतील शहरांची गरज ग्रामीण उत्पादनातूनच भागविली जाते. शिवाय शहरांतील औद्योगिक व्यवसायांना श्रमिक पुरविण्याची जबाबदारीही ग्रामीण भागच पार पाडतात. राष्ट्रांची नैसर्गिक साधनसंपत्ती प्रामुख्याने ग्रामीण प्रदेशातच उपलब्ध होते आणि बहुसंख्य लोकांची वस्तीही तेथे असते.

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांना तर ग्रामीण विकासाची गरज फारच तीव्रतेने भासते. परंपराप्रिय ग्रामीण जनतेला आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोन पटवून देऊन तिला आर्थिक विकासाच्या मार्गावर शक्य तितक्या लवकर आणण्याचे प्रयत्न शासनाला करावे लागतात.

**ग्रामीण विकासाच्या विविध योजना:**

१) ग्रामीण पाणी पुरवठा योजना : स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. पाणी हा विषय ११ व्या परिशिष्टात असून राज्यांनी तो पंचायत राज व्यवस्थांकडे सोपविला आहे. सुरक्षित पाणी पुरविणे ही सॅनिटेशन मंत्रालयाची जबाबदारी आहे. हे मंत्रालय राष्ट्रीय ग्रामीण पाणी कार्यक्रम

(NRDWP) अंतर्गत राज्यांना मदत करते.

१९७२-७३ मध्ये योजना सुरू झाली. पिण्याच्या पाण्याची समस्या असलेल्या गावांना १००% अनुदान दिले जाते. ११ व्या योजनेत टिकाऊ पाणीपुरवठा योजनांवर भर देण्यात आला, कारण पाण्याच्या दुर्भिक्षामुळे महिला, मागासवर्गाला जास्त त्रास होतो म्हणून २००९ मध्ये या योजनेत मूलभूत बदल करण्यात आले. *सर्वांना सर्व वेळात सुरक्षित पाणी पुरविणे* हा या योजनेचा हेतू आहे.

**योजनेची उद्दिष्टे:**

१) ग्रामीण भागातील सर्वांना आवश्यक तेवढे सुरक्षित पाणी पुरविणे.
२) शाळा, अंगणवाड्यांमध्ये सुरक्षित पाणी पुरविणे.
३) स्थानिक संस्था, ग्रामपंचायत यांनी स्थानिक पाणी संसाधनाचे नियोजन, नियंत्रण, व्यवस्थापन करणे.
४) स्थानिक समुहांचेही नियंत्रण व देखरेख रहावी. प्रत्येकाला मुक्त पाणी मिळावे.
५) पाण्याबाबत माहिती ठेवावी, अहवाल घ्यावा.
६) समन्याय तत्त्वाप्रमाणे पाणीपुरवठा व्हावा.
७) ग्रामपातळीवर पाणी सुरक्षा योजना आखावी.
८) पर्यायी व्यवस्था असू द्यावी व तंत्रज्ञानाचा अधिक अवलंब करावा.
९) ही व्यवस्था ग्रामपंचायती व पंचायत व्यवस्थेच्या ताब्यात द्यावी.
१०) ऑनलाइन रिपोर्टींग करावे.

या योजनेअंतर्गत छत्री योजना, स्वजलधारासारख्या कार्यक्रमांतून राज्य सरकारने सेवा पुरवाव्यात. निधीत वाढ करावी. २००१ ची लोकसंख्या गृहीत धरून ही योजना राबविण्यात येते. या योजनेत एस.सी., एस.टी. साठी सवलत, नॉर्थईस्ट राज्यांसाठी सवलत, नक्षलग्रस्त परिसरासाठी सवलत, दुष्काळग्रस्त भागावर विशेष भर, ग्रामीण भागाला अधिक प्राधान्य दिले.

या योजनेचा पुढचा टप्पा म्हणजे -

२) भारत निर्माण - ग्रामीण पाणी योजना - २००५ मध्ये भारत सरकारने सुरू केली, या योजनेंतर्गत अद्याप ज्यांच्यापर्यंत योजना पोहाचली नाही असा भाग वा वस्ती, दुर्लक्षित वस्ती, आरोग्यविषयक समस्या असलेल्या वस्ती - पाडे, आयर्नची कमतरता, नत्राचा दुष्परिणाम दूर करण्याचा प्रयत्न, टिकाऊ योजनांवर भर, सर्व ग्रामीण भागाला पिण्याचे पाणी पुरविणे, जलमणी योजना, शाळांमध्ये शुद्ध पाणी पुरवठा, पाणी गुणवत्तेसाठी यंत्रणा, प्रयोगशाळातून तपासणी, त्यासाठी निधीचे सहकार्य.

३) संपूर्ण सॅनिटेशन मोहिम (TSC) - १९८० ला हा प्रश्न जेव्हा जागतिक पाणी दशक ठरविले गेले तेव्हा जाणीवपूर्वक पुढे आला व १९८८मध्ये केंद्राने ग्रामीण भागासाठी सॅनिटेशन सवलती देण्यासाठी आखणी केली. १९९९ मध्ये त्याबाबतचा दृष्टिकोन बदलण्यात आला.

या योजनेअंतर्गत उद्दिष्टे ठरविताना ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे, सॅनिटेशन सवलती देणे, आरोग्य शिक्षण व जागृती निर्माण करणे, शाळा, अंगणवाड्यांमध्ये या सॅनिटेशन सवलती पुरविणे, त्यामधील आधुनिक तंत्रज्ञान व कमी खर्चाची योजना आखणे, उघड्यावर शौचालय टाळणे, मैला डोक्यावर वाहून नेणे बंद करणे. ही योजना जनसहभागातून आणि

जनताकेंद्री व्हावी म्हणून लोकांमध्ये जागृती व त्यातून जन मागणी वाढविण्यावर भर द्यावा. मागणीनुसार पुरवठा करावा. पर्यायी पुरवठा यंत्रणा उभारावी, गरिबांतील गरिबाला त्याचा फायदा करून देणे. शाळा, अंगणवाडी, पंचायत राज्य संस्थांवर जबाबदारी, स्वयंसेवी संस्था, एन.जी.ओ.ची मदत घेणे, गरिबांना आर्थिक मदत करणे. दारिद्र्य रेषेखालील व डोंगरी भागातील लोकांसाठी सवलती, सामुहिक सॅनिटरी कॉम्प्लेक्सची उभारणी, उत्पादक घटकांशी सहकार्य व मदतीची अपेक्षा, भक्कम सांडपाणी व्यवस्थापन इ. २०११ पर्यंत या योजनेचा लाभ ११.२३ कोटी कुटुंबांनी घेतला असून योजनेचे लक्ष १५.६१ कोटी कुटुंबापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. आतापर्यंत ७१.९४ टक्के प्रगती यात झाली आहे.

४) निर्मल ग्राम पुरस्कार : पंचायत संस्थांनी अधिक उत्साहाने व कार्यक्षमपणे ही योजना राबवावी म्हणून २००५ मध्ये ग्रामीण सॅनिटेशन व्यवस्थाही त्यात समाविष्ट करण्यात आली. २०१० पर्यंत एकूण २५१४५ ग्रामपंचायती व १६६ पंचायत समितींना असे पुरस्कार दिले गेलेत.

५) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (MGNRGA) : जागतिक पातळीवर अशी ही पहिली योजना आहे. डिसेंबर २०१० पर्यंत १४५ कोटी व्यक्ती दिवस रोजगार या योजनेद्वारा देण्यात आला. किमान मजुरी निर्धारणामुळे जीवन सुरक्षित जगण्याची गरिबांना हमी मिळाली. गरीब, एस.सी./एस.टी, या योजनेत २०१० पर्यंत ४०% सहभाग व महिलांचा ५०% सहभाग नोंदविला आहे.

या योजनेच्या माध्यमातून २०१०-११ पर्यंत ६८.६० लाख पर्यंत नेण्याचे ठरले होते. या योजनेद्वारा भूसंधारण, पाणी संधारण, रस्ता निर्माण, जमीन विकास, भूजलसंचलन सवलतीसाठी उपयोगात आणून विकासात सहभागही होतो.

६) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) - २००० या वर्षी योजनेला सुरूवात झाली. विकास आणि दारिद्र्य यातील अंतर कमी करण्याचा मार्ग दळणवळणाच्या सोयी वाढविणे, या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली. डोंगरी परिसर, आदिवासी भाग, ग्रामीण भाग, वाळवंट, नक्षलीग्रस्त भाग इत्यादी भागात २००७ पर्यंत म्हणजे १० व्या योजनेपर्यंत ६०००० कोटी रूपये अंदाजित खर्चाची तरतूद होती, मात्र २००३-०४ मध्ये ती १३२००० कोटी रूपये करण्यात आली. पहिल्या अवस्थेत ६६८०२ कुटुंब घटकांपर्यंत पोहोचणे हा भारत निर्माण योजनेचा हेतू होता. २०१० पर्यंत ३८५७५ म्हणजे ६९.७९ टक्क्यांपर्यंत ही योजना यशस्वी झाली. त्याद्वारे ग्रामीण भागात ११७१०५ कि.मी. रस्ते तयार झालेत. २०१०-११ मध्ये त्यात वृध्दी करण्यात आली आहे.

७) निवारा - अन्न, वस्त्र,निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. प्रत्येकाला स्वत:चे, हक्काचे घर मिळावे म्हणून १९८५-८६ मध्ये प्रथम दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी ही योजना राबविली गेली. २००९ मध्ये २८१ लाख घरांचा तुटवडा दर्शविला होता. या लोकांना घरे नव्हती व कच्च्या घरात रहात होती म्हणून सरकारने २८१ लाख घरे उपलब्ध करून देण्याची योजना आखली. २०१०-११ साठी २९.०९ लाख घरांचे उद्दिष्ट मान्य करण्यात आले. इंदिरा आवास योजना ही

ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी राबविण्यात आली. सखल भागासाठी रु.१५०००/- प्रत्येक घटकाला देण्याची योजना आली. तसेच कर्ज रूपाने रु. २००००/- पर्यंत ४ टक्के दराने देण्याची सवलत देण्यात आली. त्याबाबत ग्रामसभांना अधिकार देण्यात आले. त्यांच्यामार्फत देखरेख व पंचायती संस्थांमार्फत अंमलबजावणी व्यवस्था करण्यात आली. २०१० पर्यंत १४.५७ लाख घरे निवास बांधण्यात आली.

८) स्वर्णजयंती स्वयंरोजगार योजना - ग्रामीण भागातील गरीब असणाऱ्या मुलांमध्ये कौशल्य निर्माण करून त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करणे त्यासाठी अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे. त्यात सवलत (सबसिडी) देणे व त्याच्या मालाला बाजारात TRYSEM, महिला व बालकांच्या योजना, विविध साधनांचे कीट पुरविणारी योजना, गंगा कल्याण योजना, १० लाख विहिरीसाठी योजना, या सर्व योजना स्वर्णजयंतीत एकत्रित करुन ग्रामीण गरीब जनतेला रोजगाराची संधी दिली जाते. या योजनेसोबत जिल्हा ग्रामीण विकास संस्था, एन.जी.ओ., स्वत:ला स्वत:ची मदत गट, यांची मदत घेतली जाते. या योजनेअंतर्गत ५० टक्के एस.सी./ एस.टी.साठी, ४० टक्के महिलांसाठी, १५ टक्के अल्पसंख्याक, ३ टक्के अपंगांसाठी, उद्दिष्ट संख्येच्या प्रमाणात राखीव ठेवण्यात आले आहे. या योजनेद्वारा प्रशिक्षण घेणाऱ्याची संख्या ३६.७८ लाखांपर्यंत पोहचली आहे. २०१०-२०११ रु ५२१०.६३ कोटीचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यापैकी रु.२९०१.६१ कोटी देण्यात आले. त्याद्वारे २०१०-११ मध्ये १२.८१ लाख लोकांना स्वयंरोजगार देण्यात आला.

९)राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना: संविधानातील कलम ४१ नुसार बेरोजगारांना शासनामार्फत आर्थिक साहाय्य देण्याबाबत सुचविले आहे. त्या बेरोजगार, वृध्द, आजारी, अपंग व इतर ज्याला मदतीची आवश्यकता आहे अशा सर्वांचा समावेश केला आहे. १९९५ ला या NSAD चा समावेश केंद्राच्या अंदाजपत्रकात करण्यात आला. त्या अंतर्गत वृध्दांना पेन्शन (निवृत्तीवेतन) (IGNOAPS), विधवांना निवृत्तीवेतन (IGNWPS) अपंगाना निवृत्तीवेतन (IGNDPS), अन्नपूर्णा योजना व राष्ट्रीय कुटूंब कल्याण योजना (NFBS) इत्यादी योजनांतर्गत पूर्वी रु. २०० दरमहा दिले जात. आता ती रक्कम रु. ५०० करण्यात आली असून २०१०-११ साठी एकूण १७१ लाख व्यक्तिंना त्याचा लाभ देण्यात आला आहे.

१०) जिल्हा ग्रामीण विकास एजन्सी (DRDA) :- ही १९९९ पासून सुरु करण्यात आली. त्यात केंद्र ७५% व राज्य २५% सहभाग देते. त्याद्वारे ग्रामीण व्यवस्थेत कार्यरत प्रशासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करुन त्यांची कार्यकुशलता व कार्यक्षमता वाढविणे हा हेतू आहे.

११) काउन्सिलपार्ट :- काउन्सिल फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ पिपल्स् ॲक्शन ॲण्ड रुरल टेक्नॉलाजी ही स्वायत्त संघटना ग्रामीण विकास मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करते. १९८६ मध्ये तिची सुरुवात झाली. स्वयंसेवी संस्था सहकार्य व निधी पुरविणे व त्याद्वारे जनसहभाग वाढवून कृतिकार्यक्रमात जनतेच्या सहकार्यासाठी स्वयंसेवी संस्थाची मदत घेणे व त्यासाठी ग्रामीण भागाला उपयुक्त ठरणारे तंत्रज्ञान ग्रामीण जनतेला

उपलब्ध करुन देणे. त्यासाठी नऊ ठिकाणी भारतीय प्रादेशिक केंद्रे सुरु केली आहे. प्रत्येक केंद्रासाठी २५ लाख रुपये सहकार्य केले जाते.

१२)मागास विभागाला ग्रँट फंड कार्यक्रम :- २००७ पासून सुरु केली आहे. या योजनेचा हेतू विकासातील प्रादेशिक असमतोल कमी करणे हा असून मागास प्रदेशासाठी विशेष तरतूद करणे हा आहे. याआधी राष्ट्रीय समविकास योजना होती. या योजनेअंतर्गत २७ राज्यातील २५० जिल्हे समाविष्ट आहेत. मागास भागातील पंचायती व नगरपालिकांना प्राधान्य, त्याचप्रमाणे कोणत्या कामासाठी खर्च करावयाचा त्याचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा अधिकार स्थानिक संस्थांनाच, त्यावर केंद्राचे बंधन नाही. त्याद्वारे कार्यक्षमता वाढविणे व आवश्यक स्टाफ पुरविणे देखील आहे. २०१० मध्ये त्यासाठी तात्पुरता अॅडव्हान्स रु. १५०० कोटी देण्यात आला आहे.

वरील योजनांसोबत संगणकाद्वारे माहिती मिळावी. म्हणून Mission Mode on E-PRI - Panchayat चा अवलंब करुन, माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन पंचायत राजव्यवस्थेतील अंदाजपत्रक, हिशेब, अंमलबजावणी याची सांख्यिकी माहिती वेबसाईट्सद्वारा देणे. यासाठी २,४०,००० ग्रामपंचायती तीन स्तरात जोडल्या जाणार आहेत.

१३)रुरल बिझनेस हब्ज -(Rural Business Hubs)- (ERBH): अर्थव्यवस्थेतील बदलांची नोंद घेऊन व आर्थिक विकास गतीसोबत राहण्यासाठी व देशाच्या अर्थव्यवस्थेला सुदृढ करण्यासाठी व आर्थिक विकासाचा लाभ सर्वांना मिळावा या हेतूने आर.बी.एच. हे विकासाचे प्रारुप पंचायत पातळीवर राबविण्याचे मान्य करुन सार्वजनिक व खाजगी क्षेत्र सहकार्याने पंचायतीने पुढाकार घेऊन व्यवसायाची उभारणी करणे. ग्रामीण व्यवसाय हब्स उभारण्याची कल्पना २००४ मधील मुख्यमंत्री परिषदेत प्रधानमंत्र्यांनी मांडली या योजनेचा मुख्य उद्देश आर्थिक विकासाचे विकेंद्रीकरण करणे आहे. विशिष्ट निवडक जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविणे, या योजनेअंतर्गत-(१) उपजिल्हा स्तरावर कार्यशाळा, (२) व्यावसायिक सवलती पुरविणे हे पहिल्या टप्प्यातील काम, दुसऱ्या टप्प्यात १२ महिन्यांत रु.५०,०००/- पर्यंत दरमहा पात्र रक्कम देणे, मूलभूत सुविधा, कौशल्याबाबतची गॅप भरुन काढणे त्यासाठी पात्र रक्कम रु. २५ लाख पुरविणे व ग्रामीण भागात व्यवसाय उभारण्याला प्रोत्साहन देणे. कार्य, निधी आणि काम करणारे यात समन्वय साधणे यासाठी सुधारणा, मूल्यमापन, मार्गदर्शन, ज्याद्वारे कार्यक्षमता वाढेल व त्यासाठी पर्यायी योजनादेखील उभारणे, ज्यामुळे पंचायतराज्य व्यवस्था अधिक भक्कम होईल.

१४)पंचायतीचे सक्षमीकरण व जबाबदारी लाभ योजना: या योजनेअंतर्गत कार्यक्षम पंचायतींना पुरस्कार देणे. पंचायत निवडताना पंचायतीची कार्यक्षम, पारदर्शकता व जबाबदारी या गोष्टींना प्राधान्य दिले जाते. e-Banking द्वारा निधी उपलब्ध करणे, ग्रामपंचायतींना इमारती व मनुष्यबळ पुरविणे, कार्यरत कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, पेशा योजना प्रभावीपणे अमलात आणणे, पंचायतीचे सामाजिक ऑडीट करणे, नॉर्थ ईस्ट राज्यांना विकेंद्रीत योजनांचा लाभ मिळवून येणे, महिलांसाठी ५० टक्के राखीव जागा, नियोजनाचे विकेंद्रीकरण, स्थानिक तक्रार निवारण,

तक्ता क्र. १

मुख्य कार्यक्रम - खर्च (कोटीत)

| योजना | 2008-09 | 2009-10 |
|---|---|---|
| MGNREGA | 29940 | 39100 |
| SGSY | 2020 | 2380 |
| CAY | 5646 | 8800 |
| SSA | 13100 | 39100 |
| MDMS | 8000 | 8000 |
| Driking Water | 7100 | 8000 |
| Rural Sanitation | 1200 | 1200 |
| RKVY | 3166 | 6700 |
| NRHM | 9192 | 12070 |
| HRGF | 4670 | 4670 |
| PMGSY | 12000 | 12000 |
| ICDS | 6300 | 6700 |
| Total | 102334 | 122720 |

*(स्त्रोत - नियोजन मंडळ ॲण्ड मंत्रालय)*

ग्राम पंचायतीचा निधी वाढविणे. वरील योजनांतर्गत ग्रामीण भागासाठी २००८-०९ व २००९-१० मधील खर्च तक्ता क्र. १ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता क्र.१ च्या आकडेवारीवरुन हे लक्षात येते की, ग्रामीण विकासासाठी केंद्र सरकारच्या एकूण खर्चापैकी मोठा खर्च या योजनांवर होतो. यावरुन ग्रामीण विकासाला दिलेले प्राधान्य लक्षात येते. ५० वर्षांच्या कालावधीत म्हणजे १९५१ ते २००१ पर्यंत शेती, सिंचन व इतर गोष्टीसाठी पंचवार्षिक एकूण खर्चापैकी २४ टक्क्यांपर्यंत खर्च झाला आहे. त्यामुळेच हरित क्रांती १९७१ नंतरच्या व्यूहरचनेतून साकारली.

**संदर्भ सूची:**


१) बाळ कांबळे, पी.डी. देवरे, श्रीनिवास भोंग, *मानव संसाधन विकास आणि मानवी हक्क,* प्रथम आवृत्ती - २०१२ डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ.२११ ते २१५

२) इंटरनेट : *Government of India Report of the Commitee on Community Development.*

## ग्रंथ परीक्षण

# माझी अर्थविश्वातील भ्रमंती

**मंजूषा मुसमाडे, पुणे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९८८१३४०७२५.
ई-मेल: manjushamusmade@gmail.com

प्रस्तुत ग्रंथ मराठी अर्थसाहित्यात खरोखरच अनेक अंगांनी महत्त्वाचा आहे. लेखकाच्या आयसीआयसीआय (ICICI) वित्तसंस्थेच्या माध्यमातून अनुभवलेल्या जागतिक भांडवल बाजारातल्या अनुभवांचे चित्रण यात आहे. याआधी याच लेखकाचे ग्रंथ अर्थशास्त्रीय विश्लेषण करणारे असे होते. त्याहून अगदी भिन्न पद्धतीचे अनुभवकथन असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. जागतिक वित्त-भांडवल बाजारातल्या घडामोडी व प्रक्रिया अतिशय रोचक व मनोरंजक पद्धतीने लेखकाने कथन केल्या आहेत. १९७० च्या दशकापासून पुढील २५ वर्षांच्या काळातील या क्षेत्रातील बदल व घडामोडींचे यथार्थ ज्ञान वाचकाला यातून होते व त्याचेही अनुभवविश्व समृद्ध होण्यास मदत होते.

**ग्रंथाचे स्वरूप:**

एकूण १५ विविध प्रकरणांमधून लेखकाने आपले अनुभवकथन व विश्लेषण मांडले आहे. १९७० च्या दशकाअखेरीस ICICI च्या माध्यमातून झालेला भारताचा पहिलावहीला जागतिक अर्थव्यवहार ते फ्रान्स, जपान, अमेरिका, स्वित्झर्लंड, तुर्कस्तान अशा विविध देशांमधील गुंतागुंतीचे वित्त व्यवहार, त्या दरम्यान घडणारे मनोरंजक किस्से, कार्यसंस्कृतीचा परिचय, आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्थेवरील लेखकाचे संशोधन व भाष्य आणि शेवटी कडू-गोड आठवणींतून लेखकाने केलेले सिंहावलोकन अतिशय ओघवत्या शैलीत वाचायला मिळते.

**पहिलावहीला जागतिक अर्थव्यवहार:**

लेखक १९६९ साली ICICI संस्थेत अर्थतज्ज्ञ म्हणून रूजू झाले. १९७३ च्या मध्यावर त्यांच्या संस्थेने खुल्या जागतिक भांडवल बाजारात उतरण्याची

पूर्वतयारी सुरू केली व प्रत्यक्ष व्यवहार १९७८ मध्ये पूर्ण केला. तत्कालीन सिटी बँक या परकीय चलन व्यवहारात आघाडीवर असणाऱ्या बँकेबरोबर युरो डॉलरमध्ये केलेल्या व्यवहारातील अडचणी, गुंतागुंती, खाचाखोचा यांचे अतिशय प्रत्ययकारी वर्णन लेखकाने केले आहे.

**देशोदेशींचे वित्तव्यवहार व संस्कृती:**

त्यानंतर फ्रेंच बँकेशी व्यवहार करताना रिझर्व्ह बँक, फेरा कायदा व आंतरराष्ट्रीय कायदे व यंत्रणेचे ज्ञान या सर्व प्रक्रियेतून लेखकाने तावूनसुलाखून जात गुंतागुंतीचे व किचकट व्यवहार पूर्ण केले. फ्रान्स व जपानसारख्या काहीशा बंदिस्त व गूढ व्यक्तिमत्त्वाच्या देशातील व्यवहार करताना केवळ त्यांच्या भाषेतच व्यवहार होत असल्याने लागणारा वेळ व त्यानुषंगाने त्यांची स्वभाषेविषयीची अस्मिता याबाबतही लेखकाने भाष्य केले आहे. देशोदेशींच्या व्यवहारांदरम्यान तेथील चालीरिती व संस्कृतीचे वर्णनही लेखक जाता जाता करून जातात. बहुसंख्य जपानी लोकांना कोठलीच परकी भाषा अवगत नसल्याने जपानला Brain Drain ही समस्या भेडसावत नाही, हे रहस्यही लेखकाने उलगडून दाखवले आहे.

अमेरिकेसारख्या खुल्या, मुक्त तरीही नियमांनी बद्ध अशा भांडवलशाही अर्थव्यवस्थेत केंद्र व राज्यसरकारांचे स्वतंत्र कायदे व गुंतागुंतीची व्यूहरचना लेखकाने स्पष्ट केली आहे. संघराज्य ही संकल्पना इतर कोणत्याही देशामध्ये इतक्या सुसंगतपणे आणि गंभीररीत्या राबवली जात असेल, असे वाटत नाही हे लेखकाचे विधान वाचकालाही विचारात पाडते. अमेरिकेतील गेल्या शतकातील बँकींग व्यवस्था त्यांच्या Glass-Steagall Act या कायद्यान्वये कार्यरत होती. नित्याचे बँकिंग व्यवहार सांभाळणाऱ्या बँकांना भांडवल बाजारातले व्यवहार करता येत नव्हते आणि मर्चंट बँकाना बँकिंग व्यवहार करता येत नव्हते. तो कायदा रद्द झाल्याने वित्तव्यवहारात लवचिकता आली. मात्र त्यामुळेच घोटाळे झाले आणि २००८ मध्ये त्यातूनच मंदीची लाट आली, असे अनेक जाणकारांचे मत लेखकही उद्धृत करतात.

इतर देशांच्या तुलनेने भारतीय वित्तबाजाराचे स्वरूप कसे वेगळे आहे, हे लेखक स्पष्ट करताना प्रमुख फरक अधोरेखित करतात. तेथे वित्तव्यवहारातील अधिकाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण केंद्र, छोट्या मुदतीचे अभ्यासक्रम घेतले जातात व अभ्यास संशोधन यावर त्यांनी लक्ष केंद्रीभूत करावे आणि प्रशासकीय बाबींवर त्यांचा वेळ वाया जाऊ नये असा प्रयत्न केला जातो. हे सांगून लेखकाने शेवटी असाही शेरा मारला आहे की, अमेरिकेतल्या बँकींग व्यवसायात सर्व काही सुरळीत चालू आहे, असे म्हणता येणार नाही. अधूनमधून त्यांनाही समस्या भेडसावतात, घोटाळे होतात. तरीदेखील त्यावर मात करून अमेरिकेची घोडदौड चालूच राहते.

**स्वित्झर्लंड :**

अलिकडे राजकीय व आर्थिक स्वरूपाच्या चर्चेत सतत येणाऱ्या स्विस बँकेतील भारतीयांच्या काळ्या पैशासंबंधी या पुस्तकातून मूलभूत माहिती मिळते. स्वित्झर्लंड हे तटस्थ भूमिका घेणारे खरेखुरे अलिप्त राष्ट्र असून कोणत्याही महत्त्वाच्या जागतिक स्तरावरील संस्था किंवा करारात त्याचा सहभाग नसतो हे वैशिष्ट्य नमूद करून लेखक एक ठळक विरोधाभास

सांगतात की, अशा या देशात बऱ्याच आंतरराष्ट्रीय संस्थांची मुख्य कार्यालये आहेत. लहान आकाराच्या व गुप्तपणे व्यवहार करणाऱ्या असंख्य बँकांनी या समृद्ध देशात आपले जाळे पसरलेले आहे व त्याचमुळे अवैध पैशाची खाती जगभरातील धनदांडगी मंडळी इथे ठेवतात, ही वस्तुस्थिती आपल्याला समजते. स्विस बँकांचे व्याजदर अत्यंत कमी असतात किंवा काही वेळा तर ते ऋण (negative interest rate) असतात. म्हणजे ठेवी ठेवण्यासाठी पैसे द्यावे लागतात व तरीही त्या बँकांमधला पैशाचा ओघ कमी होत नाही हे आश्चर्यकारक सत्यही लेखक सांगतात. अशा या जगावेगळ्या स्विस बँकींगची माहिती वाचकाला स्तिमित करते. शेवटी, लेखक नमूद करतात की स्विस बँकातील गूढ खात्यांविषयी जागतिक दबाव वाढला तरच हा प्रघात बंद होण्याची आशा आहे.

**जागतिक वित्तव्यवहाराचे अग्निहोत्र:**

१९६० ते २०१० या काळातील जागतिक वित्तव्यवहारांचा सखोल अभ्यास असल्याने लेखक पुढील निष्कर्ष काढतात. जागतिक वित्तयंत्रणा ही एक प्रयोगशील आणि गतिमान अशी यंत्रणा आहे. जुन्या-नव्याचे बेमालूम मिश्रण होऊन ही यंत्रणा सतत कार्यान्वित राहते. त्यात खंड पडत नाही कारण, कोणत्याही देशात जागतिक अर्थव्यवहार होऊ शकतात. मात्र, लंडन हेच जागतिक वित्तयंत्रणेचे केंद्र आज व भविष्यातही राहील. याचे कारण लंडनमधला बँक डिस्ट्रीक्ट हा एक चौरस मैलाचा परिसर होय. १९८० पासून नवे बँकिंग तंत्रज्ञान येऊ लागले व परंपराप्रिय असूनही लंडनने काळाची गरज ओळखून निर्णायक स्वरूपाचे बदल आपल्या वित्तयंत्रणेत घडवून आणले व बदल कसे घडवून आणावेत याचा वस्तुपाठ सादर केला, असे लेखक म्हणतात.

लंडनच्या तोडीस तोड सिंगापूर आणि हाँगकाँग या देशांनी आशियायी वित्तव्यवहारांसाठी आशियायी डॉलर ही संकल्पना राबवून आपले वेगळेपण सिद्ध केले. मात्र, ही यंत्रणा स्पर्धक नसून पूरक व लोकप्रिय ठरली हेही लेखक स्पष्ट करतात.

युरो या युरोपिअन समूहातील सामाईक चलनाचे मूळ नाव एक्यू (European Currency Unit-ECU) असे होते ही माहितीही लेखक देतात. याचबरोबर चलनांची देवाणघेवाण (Swaps) पुढच्या तारखेला होणारी देवाणघेवाण (Futures) आणि त्यात पर्याय देण्याचा मार्ग (Options) अशा स्थूलमानाने डेरिव्हेटिव्ह व्यवहारांबाबत लेखक सविस्तर स्पष्टीकरण देतात.

आपल्या दीर्घकालीन अनुभवाअंती लेखक असाही सल्ला देतात की, परदेशी व्यवहार एकाच चलनात करण्याऐवजी दोन चलनांमध्ये करणे हितावह असते. डॉलर आणि येन अशी एकमेकांना छेद देणारी चलने निवडल्याने भारताला मोठा धोका संभवत नाही. जागतिक वित्तयंत्रणा हे अखंड धगधगणारे अग्निहोत्र आहे, मात्र ते योग्य तऱ्हेने सांभाळावे लागते. अग्निकुंड विझणार नाही हे जसे पहावे लागते, तसेच त्याचा भडका उडणार नाही याचीही दक्षता घ्यावी लागते. नाहीतर तारतम्य न बाळगल्याने अग्निहोत्रीच होरपळून जाऊ शकतो. अशा आधुनिक वित्तीय अग्निहोत्राचा लेखकाने सुमारे पन्नास वर्षे अनुभव घेतला आणि आर्थिक व्यवहारातील तारतम्य आणि सावधानता

हे आपल्या पदरी पडलेले शैक्षणिक डेरिव्हेटिव्ह खूपच मोलाचे होते असे ते म्हणतात.

आपल्या अनुभवकथनात लेखक पी. आर. जोशी जागतिक बँक, परदेशी व्हिसा, ट्रेझरी, विकास बँकींग, मनुष्यबळ व वित्तव्यवस्थापन, प्रशिक्षण, वित्तीय प्रकाशने, अभ्यास व संशोधन, सोशल ऑडिट, परफॉर्मन्स ऑडिट, विविध देशांचा सामाजिक-राजकीय इतिहास व परंपरा, जागतिक वित्तव्यवहारादरम्यान वागण्याचे संकेत व चालीरीती, भारतातील व्यवस्थापन चळवळ व व्यवस्थापकीय अर्थशास्त्र, ग्राहक पंचायत अशा चौफेर क्षेत्रावर आपले अनुभव व मतप्रदर्शन अतिशय रंजक पद्धतीने सांगतात.

**समारोप:**

डॉ. प्रभाकर रघुनाथ तथा पी. आर. जोशी हे आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्था या विषयातले नामवंत तज्ज्ञ होते. अत्यंत गतिमान अशा जागतिक वित्तयंत्रणेत काम करणे जोखमीचे आणि आव्हानात्मक असते. लेखकाने ही जबाबदारी अत्यंत समर्थपणे पेलली. भारतातर्फे ICICI आणि DSP मेरिल लिंच या प्रथितयश वित्तसंस्थांच्या वतीने महत्त्वाच्या सर्व जागतिक केंद्रांवर त्यांनी अत्यंत कौशल्याने अर्थव्यवहार सांभाळले. भारतासाठी लागणारे परदेशी भांडवल जागतिक भांडवल बाजारातून उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. जवळजवळ तीन दशके अर्थविश्वात निरनिराळ्या जबाबदाऱ्या पार पाडताना डॉ. पी. आर. जोशींमधील अभ्यासकही सतत जागा होता. सर्वसामान्यांना या विश्वाची ओळख करून देणे आणि अर्थक्षेत्रातील अभ्यासकांना आणि तज्ज्ञांना त्याचे वेगवेगळे पदर उलगडून दाखवण्यासाठी त्यांनी सातत्याने लेखन केले व व्याख्याने दिली. त्यांच्या या व्यासंगाचे पुरेपूर दर्शन प्रस्तुत पुस्तकातून घेते.

मात्र, हे पुस्तक डॉ. जोशींचे अखेरचे पुस्तक ठरावे आणि त्याचे मूर्त रूप न पाहता व त्याची निर्मिती अर्ध्यावरच असताना त्यांचे निधन व्हावे याची खंत वाचकांना निश्चितच वाटते. त्यांच्या लेखनाचे संपादन डॉ. सदानंद बोरसे यांनी करून पुस्तक पूर्ण स्वरूपात वाचकांपुढे आणल्याने अर्थसाहित्याच्या वाचकांना एक मोलाचा ठेवाच गवसला आहे.

(माझी अर्थविश्वातील भ्रमंती- प्रभाकर रघुनाथ जोशी, राजहंस प्रकाशन, पुणे २०१०)

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश

# नागरी औद्योगिक क्षेत्राच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे योगदान

देवेन्द्र शिवदास रंगाचार्य, अमरावती,
गणेश विहार नं.२, जगदाळे लेआउट.
भ्रमणध्वनी: ९८९०९७६२८३
ई मेल : devendrarangacharya@rediffmail.com

देशाचा आर्थिक विकास होताना कृषी अर्थव्यवस्थेकडून औद्योगिक अर्थव्यवस्थेकडे वाटचाल होताना दिसून येते. आर्थिक विकासाचा इतिहास पाहता असे दिसून येते की, त्याचा दरडोई उत्पन्न वाढीशी आणि औद्योगिक विकासाशी घनिष्ट संबंध आहे म्हणून आर्थिक विकासाचा उच्च दर गाठण्यासाठी अर्थतज्ज्ञ औद्योगिकरणाची शिफारस करतात.

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये त्या देशाच्या औद्योगिकीकरणाची भूमिका ही अत्यंत महत्वाची समजली जाते. भारत हा विकसनशील देश असून स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारताने औद्योगिकीकरणाची कास धरली. स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळेस भारतातील जूट, कापड, साखर, कोळसा आणि पोलाद उद्योग हे महत्वाचे उद्योग होते. ब्रिटिशांचे एकंदरीत धोरण भारतातून कच्चा माल इंग्लंडमध्ये नेणे आणि त्या मालावर प्रक्रिया करुन उत्पादित झालेला माल भारतीय बाजारपेठेत आणून विकणे असे होते देशाच्या औद्योगिकीकरणाला त्यामुळे फारशी चालना प्राप्त झाली नाही. स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळेस भारत औद्योगिकदृष्ट्या मागास देश म्हणून ओळखला जात असे. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून औद्योगिकरणाला सुरूवात झाली आणि त्यानंतरच्या काळात भारताने प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरु केली. औद्योगिकीकरणामुळे देशाचा विकास जलद गतीने साधता येतो. औद्योगिकीकरणाचे समाजाला आणि देशाला अनेक फायदे होतात. औद्योगिकरण आणि उद्योगीकरणाची संकल्पना स्पष्ट करताना असे म्हटले की औद्योगिकरण म्हणजे विविध उत्पादन फल आणि बदल घडविणारी प्रक्रिया होय. औद्योगिकरणामध्ये सखोल व विस्तृत प्रमाणात वापर केला जातो.

**विषयाची निवड व व्याप्ती:**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात औद्योगिक वसाहतीची स्थापना होऊन औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात झालेले दिसून येते.स्वदेशी उद्योगाबरोबर परकीय उद्योग मोठ्या संख्येने भारतात येत आहे. परंतु शासनाच्या विविध सोयी सुविधा व सवलती असून आद्योगिक वसाहतीमधील उद्योग नगण्य असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाची भावी दिशा कोणत्या तत्वावर ठरविण्यात आली हे जाणून घेण्याच्या दृष्टीने स्थापने पासुन औद्योगिक विकासाची केलेल्या कार्याचे अध्ययन करणे ज्या नवीन योजना कार्यान्वित करण्यात आल्यात. त्या योजनांची फलश्रृती आणि लाभदायकता, महामंडळाची कार्यपध्दती, वैशिष्टे व त्रृटी, तसेच उद्योजकांच्या दृष्टिकोनातून ह्या संस्थेच्या विविध योजना अधिक लाभदायक होण्यासाठी औद्योगिक विकास महामंडळ कितपत यशस्वी झाले. याचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची आवश्यकता वाटली त्यासाठी याचे अध्ययन करण्यासाठी संशोधकाने अमरावती औद्योगिक क्षेत्राच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे योगदान एक व्यष्टी अध्ययन (१९९१ ते २०१०) या विषयावर अध्ययन केले.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे महाराष्ट्रातील तसेच अमरावती औद्योगिक क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणे.

२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उद्दिष्टांचे अध्ययन करणे.

३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे औद्योगिक वसाहतीसाठी प्रदान केल्या जाणाऱ्या सुविधांचे अध्ययन करणे.

४) औद्योगिक वसाहतीच्या अमरावती औद्योगिक क्षेत्राच्या विकासातील योगदान अभ्यासणे.

५) उद्योगाव्दारे उत्पादित होणाऱ्या उत्पादन व विपणन विषयक समस्याचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये:**

१ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे महाराष्ट्रातील तसेच अमरावती औद्योगिक क्षेत्रातील कार्य समाधानकारक आहे.

२ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे निर्धारित उद्दिष्ट्ये साध्य केली आहेत.

३ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे औद्योगिक वसाहतीसाठी अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्यात.

४ औद्योगिक वसाहतीचे अमरावती औद्योगिक क्षेत्राच्या आर्थिक विकासात योगदान आहे.

५ उद्योगांना उत्पादन व विपणनासंबंधी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनात व्यष्टी अध्ययन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधकाने अमरावती औद्योगिक क्षेत्र हे एकक मानून या एककाचे एम. आय. डी. सी. चे आर्थिक विकासात योगदान अध्ययन करण्यासाठी संशोधनाच्या व्यष्टी अध्ययन पध्दतीने संशोधन केले आहे. त्याच प्रमाणे प्रस्तुत विषयाच्या संशोधनाची पध्दत व संशोधन क्षेत्र व त्यामध्ये करावयाचे कार्य यांच्या उद्दिष्टावर अवलंबून असल्यामुळे प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व

दुय्यम प्रकारच्या माहितीचे संकलन करण्यात आले.

संशोधनाचा आराखडा निश्चित करण्यासाठी प्रथम भागात म्हणजेच ग्रंथालयीन संशोधनामध्ये औद्योगिक विकास महामंडळाच्या वर्ष १९९१ ते २०१० या अभ्यास कालावधीतील कार्याचे वार्षिक अहवालावरुन व उपलब्ध माहिती संकलित करून तसेच औद्योगिक नियतकालिके, विदर्भातील उद्योगासंबंधी उपलब्ध माहिती, वर्तमान पत्रे, अर्थतज्ज्ञांचे लेख याचा समावेश करून निष्कर्ष तयार करण्यात आले आहेत. तसेच द्वितीय भागात म्हणजे प्रत्यक्ष पाहणी व चर्चेमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमधील उद्योजकांशी प्रत्यक्ष चर्चा करून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात येऊन संशोधनाचा आराखडा प्रत्यक्ष माहितीच्या आधारावर व चर्चा सत्राद्वारे निश्चित करण्यात आला आहे. संशोधनासाठी प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण आणि पृथक्करण करण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. १) विविध उद्दिष्टे व योजना आणि इतर स्वरुपातील माहितीचे सारणीवार विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. २) सारणी मधील सादर केलेली माहिती योग्य प्रकारे प्रकाशित करण्याकरिता आलेख, छायाचित्रे यांचा उपयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्याशी संबंधित असल्यामुळे तुलनात्मक विश्लेषण या तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात प्रकरण २ मध्ये संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये विषयाशी संबंधित शोधप्रबंध, प्रकल्प अहवाल, पुस्तके, त्रैमासिके व मासिके, अहवाल, वृत्तपत्रातील लेख इत्यादिंचा आढावा घेण्यात आला आहे. प्रकरण ३ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे महाराष्ट्र व अमरावती औद्योगिक क्षेत्रातील योगदान यामध्ये स्वातंत्र्य पूर्वकाळातील महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा इतिहास व स्वातंत्र्यानंतरच्या आर्थिक विकासाबाबत सविस्तर विवेचन करण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनात प्रकरण ४ मध्ये अमरावती जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन यामध्ये अमरावती जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी अमरावती जिल्हा कसा आघाडीवर राहिलेला आहे. याचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अमरावती जिल्ह्यात उद्योजकांना केलेली मदत व त्या अनुषंगाने जिल्ह्याचा विकास होवून औद्योगिकरणाला मिळालेली चालना व प्रगतीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण ५ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महाराष्ट्र व अमरावती मध्ये केलेल्या विकासात्मक कार्याचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आले आहे.

प्रकरण ६ मध्ये उत्पादन व विपणन विषयक समस्या या मध्ये ज्यामुळे व्यवसायाची दृष्टी प्राप्त होते अशा विपणनाच्या चार मूल घटकांचा जसे उत्पादित वस्तू किंमत बाजारपेठ, आणि विक्रयवृध्दी अवलंब उद्योजकामध्ये विपणन दृष्टिकोन निर्माण करण्यात सहाय्यक ठरतो याचा उहापोह सदर प्रकरणात करण्यात आला. तसेच

द्वितीय भागात म्हणजेच प्रत्यक्ष पाहणी व चर्चेमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमधील उद्योजकाशी प्रत्यक्ष चर्चा करून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात येऊन संशोधनाचा आराखडा प्रत्यक्ष माहितीच्या आधारावर व चर्चा सत्राद्वारे निश्चित करण्यात आला आहे.

संशोधनासाठी प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण आणि पृथक्करण करण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

१) विविध उद्दिष्टे व योजना आणि इतर स्वरुपातील माहितीचे सारणीवार विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

२) सारणी मधील सादर केलेली माहिती योग्य प्रकारे प्रकाशित करण्याकरिता आलेख, छायाचित्रे यांचा उपयोग करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधन औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्याशी संबंधित असल्यामुळे तुलनात्मक विश्लेषण या तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात प्रकरण २ मध्ये संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये विषयाशी संबंधित शोधप्रबंध, प्रकल्प अहवाल, पुस्तके, त्रैमासिके व मासिके अहवाल वृत्तपत्रातील लेख, इत्यादिंचा आढावा घेण्यात आला आहे.

**निष्कर्ष:**

१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राज्यातील विकसित भागात २००९-१० पर्यंत ४४०४०.३९ कोटी रुपये खर्च केल्याचे दिसून येते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राज्यातील विकसनशील भागात २००९-१० पर्यंत १३४६४.४९ कोटी रुपये खर्च केल्याचे दिसून येते.

२) निर्यात प्रवर्तन औद्योगिक उपवन, सुशिक्षित बेरोजगारांसाठी सहाय्य योजना, सुवर्ण लघु उद्योग योजना, माहिती तंत्रज्ञान व उद्यान, हिरे आणि जड-जवाहीर संकुल, अन्न प्रक्रिया पार्क, जैवतंत्रज्ञान उद्यान, द्राक्ष प्रक्रिया उद्यान, पुष्प संवर्धन उद्यान, चर्म उद्योग, वस्त्रोद्योग प्रक्षेत्र विणकाम व तयार कपडे इत्यादी योजना औद्योगिक विकास महामंडळाने विविध ठिकाणी राबल्याचे दिसून येते. परंतु सदर योजना अमरावती जिल्ह्यात राबविण्यात आल्या नाहीत.

३) विकासात्मक स्थितीत १९९१ ते २०१० या कालावधीत महाराष्ट्रातील ताब्यात असलेल्या भूसंपादनाच्या संख्येत ज्या प्रमाणात वाढ होत आहे त्या प्रमाणात अमरावती शहरातील औद्योगिक वसाहतीच्या ताब्यात असलेल्या भूसंपादनाच्या प्रतिशत वाढीचे प्रमाण अत्यल्प आहे.

४) महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत अमरावती शहरातील उद्योगाच्या संख्येचे प्रमाण अत्यल्प आहे. विकासात्मक स्थितीत उद्योगाच्या संख्येच्या प्रमाणात वाढ होत असून अमरावती शहरातील औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांच्या प्रतीशत वाढीचे प्रमाण कमी आहे.

५) महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत अमरावती शहरातील पाणी वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या अत्यल्प आहे. तसेच विकासात्मक

स्थितीत महाराष्ट्रातील पाणी वापरणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत वाढ होत असून अमरावती शहरातील औद्योगिक वसाहतीमधील पाणी वापरणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत वाढ झाली असून प्रतीशत वाढीचे प्रमाण महाराष्ट्राच्या तुलनेत जास्त आहे.

६) विकसित भागाची प्रगती ५ ते १० टक्के मोठ्या उद्योगांमुळे होत असून त्या उद्योगांना सामान पुरविण्याचे काम ९० ते ९५ टक्के लघुउद्योग करतात मोठ्या उद्योगावर आधारित लघु उद्योग म्हणावे तसे अमरावती शहरात स्थापन झाले नाही.

७) विकसनशील भागात शेती क्षेत्रातून बऱ्याच मोठ्या संख्येने श्रमिकांना औद्योगिक क्षेत्रांकडे वळविल्यास त्यांच्या कडून बराच काळापर्यंत औद्योगिक उत्पादनात वाढ होऊ शकते. त्याकरिता विकसनशिल भागात प्रचंड प्रमाणात आढळून येणाऱ्या बेरोजगारीवर व गरिबीवर परिणामकारक उपाय म्हणून शासनाने अमरावती औद्योगिक क्षेत्रात प्रभावी उपाय योजना केली नाही.

८) अमरावती जिल्ह्यातील सोयाबीन व संत्रा हे महत्वाचे पीक आहे. संत्रा पिकाचे नुकसान होत असतानाही कोट्यवधी रुपयाच्या योजना घोषित होतात, परंतु त्याचा पाठपुरावा झालेला दिसत नाही.

उपाययोजना:

१) उद्योजक हा संपूर्ण आर्थिक घडामोडीचा मुख्य आहे त्याचा औद्योगिक वसाहतीच्या विकासामध्ये महत्वाचा वाटा आहे. औद्योगिक वसाहत ही उद्योजकासाठी आहे आणि म्हणूनच जिज्ञासा असलेल्या उद्योजकांना प्रोत्साहन औद्योगिक विकास महामंडळाने दिल्यास औद्योगिक वसाहतीच्या यशस्वीतेसाठी महत्वाचे ठरेल.

२) १९८५ चे केंद्रीय औद्योगिक धोरणात असे म्हटले आहे की, विभागीय असमतोल दूर करण्यासाठी किंवा मागास औद्योगिक विकास करण्यासाठी औद्योगिकरण गरजेचे आहे. त्यामुळे मागास भागात औद्योगिक विकास करण्यात येत आहे. याच बाबीवर महाराष्ट्र सरकारने राज्यातील उद्योगांना मुंबई -पुणे इत्यादी ठिकाणी परवानगी न देता अविकसीत भागात उद्योगांना सुरूवात करणे गरजेचे आहे.

२) मुंबई, पुणे सारख्या शहरी भागात उद्योगांची होत असलेली वाढ थांबवावी.

३) मागास भागात नव्याने सुरू होणाऱ्या मोठे मध्यम व लघु उद्योगांना प्रोत्साहन द्यावे.

४) मुंबई पुणे सारख्या विकसित भागात नवीन औद्योगिक क्षेत्राला व छोट्या उद्योगांना देखील अशा क्षेत्रात जागा उपलब्ध असली तरीही परवानगी देऊ नये.

५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वसाहतीतील उद्योजकांशी संपर्क ठेवल्यास उद्योजकांच्या समस्या सोडविण्यास मदत होईल.

(प्रस्तुत पीएच्.डी. प्रबंधासाठी डॉ. आर वाय. माहोरे यांनी मार्गदर्शन केले आहे.)

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### ३९ वे राष्ट्रीय अधिवेशन, बारामती

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे वार्षिक अधिवेशन अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि.पुणे येथे दि.१६, १७ व १८ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. संगमनेर येथील डॉ.सुहास आव्हाड हे अध्यक्षस्थान भूषवतील. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर आणि स्थानिक कार्यवाह डॉ.रामभाऊ खाडे (भ्रमणध्वनी:९९२२८९५५४६) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार.

२) पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन.

३) महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रृती.

वरील विषयांचे टिपण *अर्थसंवाद* च्या जानेवारी-मार्च २०१५ या अंकामध्ये दिले आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

दि.५ सप्टेंबर २०१५ ही निबंध स्विकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीत जास्त २००० शब्दात मांडावयाचे असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. MS-Word मध्ये टाईप करू नयेत. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज मा. अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे. निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

डॉ. आव्हाड सुहास धोंडिबा,
ज्ञानदीप, गोल्डन सिटी, अकोले बायपास रोड,
संगमनेर-४२२ ६०५, जिल्हा अहमदनगर
भ्रमणध्वनी: ९९२२४३५८७१

- डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.६,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !


डॉ. सुहास आव्हाड,
अध्यक्ष
ज्ञानदीप, गोल्डन सिटी,
अकोले बायपास रोड, संगमनेर,
जिल्हा अहमदनगर, ४२२ ६०५
भ्रमणध्वनी: ९९२२४३५८७१

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

# मराठी अर्थशास्त्र परिषद

# ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, बारामती

## अधिवेशन तारखेतील बदल

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि.पुणे येथे दि.१६, १७ व १८ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. (यापूर्वी आपणास अर्थसंवाद जानेवारी-मार्च २०१५ च्या माध्यमातून दि.१९, २० व २१ नोव्हेंबर २०१५ असे कळविण्यात आले परंतु तांत्रिक अडचणीमुळे अधिवेशनाच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आपल्या गैरसोयीबद्दल क्षमस्व.) संगमनेर येथील डॉ. सुहास आव्हाड हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.१२००/- आहे. जे परिषदेचे आजीव सदस्य नाहीत त्यांना साधारण शुल्क रु.३००/- अतिरिक्त भरून सहभागी होता येईल. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार.

२) पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन.

३) महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रुती.

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेचे मा. अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. आयत्या वेळेच्या विषयासाठी शोधनिबंध मागवले जात नाहीत. अधिवेशनास उपस्थित राहून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

| | |
|---|---|
| डॉ. सुहास आव्हाड,<br>अध्यक्ष | प्रा. चारुदत्त गोखले,<br>कार्याध्यक्ष |
| प्राचार्य डॉ. चंद्रशेखर [illegible],<br>स्थानिक कार्याध्यक्ष | डॉ. [illegible]. भाडवलकर,<br>कार्यवाह-खजिनदार |
| डॉ. रामभाऊ खाडे,<br>स्थानिक कार्यवाह | डॉ. [illegible] निकम,<br>प्रमुख संपादक |
| भ्रमणध्वनी:९९२२८९५५४६ | अर्थसंवाद |

